# १

# वस्ती भूगोलाचा परियच

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ वस्ती भूगोल : व्याख्या

१.३ वस्ती भूगोल - स्वरुप आणि व्याप्ती

१.४ वस्तीचे प्रकार

१.५ वैशिष्ट्ये

१.६ वस्तीच्या वितरणावर परिणाम करणारे घटक

१.७ वस्ती भूगोलाचे महत्व


## १.० उद्दिष्टे

- वस्ती भूगोल : व्याख्या - स्वरुप आणि व्याप्ती समजण्यास विद्यार्थ्याला मदत होईल.
- वस्तीचे प्रकार – वैशिष्ट्ये - फरक याची विद्यार्थ्याला ओळख होईल.
- वस्तीच्या वितरणावर परिणाम करणारे घटक - उदा. पर्यावरण, सामाजिक, आर्थिक स्थिती इ. समजण्यास मदत होईल.

## १.१ प्रस्तावना

पृथ्वीच्या निरनिराळ्या भागातील पर्यावरण आणि मानव यांच्यातील परस्पर सहसंबध मानवी भूगोलात अभ्यासला जातो. अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. या गरजाही त्या प्रदेशातील पर्यावरणावर अवलंबून असतात. मानवाला जीवन जगण्यासाठी अन्नाची गरज आणि सुरक्षित जीवन जगण्यासाठी निवार्याची गरज आहे. उन, वारा, पाऊस या घटकापासून सुरक्षित राहण्यासाठी मानवाने निवारा निर्माण केला. पुढे काळानुसार या निवार्यामध्ये बदल होत गेलेले आढळतात. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. तो आपले जीवन एकठ्याने जगू शकत नाही. म्हणूनच मानवाने वस्ती निर्माण केली. मानवी वस्तीचे स्वरूप काळानुसार विकसीत होत गेलेले आढळते. वस्ती निर्माण होण्याचा मुख्य हेतू सुरक्षित निवारा हा आहे. म्हणूनच गुहेत राहणारा आदिमानव असो किंवा विकसीत शहरातल्या टोलेजंग इमारतीच्या आलिशान पlल@टमध्ये राहणारा सुसंस्कृत मानव असो,

munotes.in



पूर्वी गृहा आता – आधुनिक इमारती


त्याच्या वस्ती करण्यामागे सुरक्षित निवारा हा उद्देश असतो. मानवी वस्तीचा पर्यावरणानुसार होणारा बदल आणि विकास तसेच मानवी वस्तीचा इतिहास म्हणजेच वस्तीचा आरंभ हा मानवा इतकाच प्राचीन आहे. कारण पृथ्वीतलावर आलेल्या मानवाला पोट भरणे ही जशी गरज होती तितकीच गरज निवार्याची होती. आदिमानव अन्नाच्या शोधात सातत्याने भटकत होता. अन्नामुळे त्याचे जीवन अस्थिर होते. सातत्याने भटकत असल्यामुळे त्याला विश्रांतीची गरज होती. शिवाय ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक घटकाबरोबर मानवाला जंगलातील हिंस्त्र श्वापदांपासूनही सुरक्षितता गरजेची होती. यासाठी मानवाने नैसर्गिक निवारा मिळविला मग तो गुहेत राहिला, झाडाझुडपामध्ये राहिला याच मानवाने आपल्या कौशल्याच्या जोरावर आजुबाजुच्या नैसर्गिक संपत्तीचा वापर निवार्यासाठी करायला सुरूवात केली. झाडाच्या फांद्या, पाने वापरून झोपडी तयार केली. शिकार केलेल्या प्राण्याच्या कातडीचा वापर तंबू तयार करण्यासाठी केला. अशा पध्तीने मानवाचे जीवन हळुहळु स्थिर होऊ लागले. मानवाने शेतीमध्ये केलेला विकास हा मानवाच्या स्थिर जीवनाचे प्रमुख कारण आहे. जीवनाच्या ध्येयाबरोबर मानवाचे घर ही संकल्पना ही दृढ झाली. उपलब्ध मातीचा वापर करून माणसाने भिंती तयार केल्या आणि लाकडाचा, पानाचा वापर करून छत तयार केले. आणि खर्या अर्थाने मानवाचा सुरक्षित निवारा तयार झाला. मानवाच्या स्वभाव वैशिष्ठ्यानुसार अनेक घरे एकत्र वसली गेली आणि मानवी वसाहत निर्माण झाली.

मानवी वस्तीचे प्रामुख्याने दोन प्रकार केले जातात.

१) ग्रामीण वसाहत

२) नागरी वसाहत

munotes.in



ग्रामीण वसाहत नागरी वसाहत

## १.२ वस्ती भूगोल : - व्याख्या

भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. वस्ती भूगोलात मानवी वस्त्यांचा अभ्यास केला जातो. जगातल्या कोणत्याही प्रदेशातील वस्तीच्या स्वरूपावर त्या प्रदेशातील पर्यावरणाचा सखोल असा परिणाम होत असतो. वस्ती भूगोलात मानवनिर्मित अशा खेडी, नगरे आणि शहरे यांच्या अभ्यासास महत्त्व आहे. स्थलानुसार आणि कालानुसार विविध प्रदेशात होत असलेल्या प्रगतीचा परिणाम मानवी वस्त्यावर होत असतो व त्याला अनुसरून वस्त्यांचे स्वरूप बदलत असते. म्हणून स्थलानुसार व कालानुसार विविध क्षेत्रात होत असलेली प्रगती वस्तीमधून प्रतिबिंबित होत असते. वस्तीमध्ये मानवाचा पर्यावरणाशी असलेला संबंध प्रतिबिंबित होतो. एवढेच नाही तर मानवी समाजाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रथा किंवा चालीरीतीही प्रतिबिंबित होत असते.

**व्याख्या (Definitions of Settlements):**

हवा, पाणी, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मानवाच्या मूलभूत गरजा म्हणून सद्य:परिस्थितीत ओळखल्या जातात. प्राचीन काळात मानवाला फक्त हवा, पाणी आणि अन्न याच गोष्टींची आवश्यकता होती. नंतरच्या काळात मानवामध्ये जसजसा बौद्धिक विकास होत गेला तसतसे त्याच्या गरजात भर पडत गेली. त्यातूनच 'निवारा' ही मानवाची एक महत्त्वाची गरज ठरली. निवारा ही गरज मानव वस्तीमधून पूर्ण करत असतो. वस्तीचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठी वस्तीची व्याख्या पाहणे आवश्यक ठरते.

१. "मानवाच्या आश्रयस्थानास वस्ती असे म्हणतात." "मानवाने निवाऱ्याकरिता केलेल्या घरांच्या समूहाची मांडणी म्हणजे वस्ती होय."

२. "गृहसमूह, रस्ते, वाड्या, चौक आणि समाज यांचे संकलित रूप म्हणजे वस्ती होय."

डिकिन्सन या वस्ती भूगोल तज्ज्ञाने वस्तीची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे."

"शेतवाड्या, गृहसमूह, नगरे इ. मानवी समाजास आवश्यक असलेल्या सामाजिक, भौगोलिक घटकांची क्षेत्रीय व्यवस्था म्हणजे वस्ती होय."

munotes.in

वस्तीच्या वरील वेगवेगळ्या व्याख्यावरून असे स्पष्ट होते की, मानवाने निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी केलेली घरांची मांडणी म्हणजे वस्ती असते. दिवसभर श्रम केल्यानंतर मानवास विश्रांतीची गरज असते आणि ती गरज तो वस्तीमधून पूर्ण करत असतो. मानसिक शांतता व स्वास्थ्य लाभण्यासाठी विश्रांती किंवा आश्रय आवश्यक असतो. त्यामुळेच मानवाच्या आश्रयस्थानास वस्ती म्हणतात. वस्ती हे घरे आणि समाज यांचे संकलित रूप असून ती सामाजिक व भौगोलिक घटकांची क्षेत्रीय व्यवस्था असते.

मानव हा समाजशील प्राणी आहे. तो समूहाने जगणे पसंत करतो. यातूनच सामाजिक बांधिलकी व सामाजिक गरजा निर्माण होतात. सामाजिक गरजेतून लोक एखाद्या ठिकाणी एकत्रित येऊन विशिष्ट पद्धतीने घरे बांधतात. अशा घरांच्या मांडणीलाच वस्ती म्हणतात. बस्ती ही अतिशय साधी किंवा विशेष असू शकते. तसेच ती तात्पुरती किंवा कायमस्वरूपी असू शकते. वस्ती ही कशीही असली तरी तिचा मुख्य उद्देश निवारा असतो. वस्ती भूगोल : व्याख्या :

१. "वस्तीचा (ग्रामीण आणि नागरी) भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे वस्ती भूगोल होय."

२. "वस्तीच्या अभिक्षेत्रीय भिन्नतेचे विश्लेषण करणारे शास्त्र म्हणजे वस्ती भूगोल होय."

३. "स्थल व काल संदर्भात केला जाणारा वस्तीचा अभ्यास म्हणजे वस्ती भूगोल होय."

४. वस्ती भूगोल म्हणजे, "ग्रामीण व नागरी वस्त्यांचे स्थान, स्थिती, प्रकार, कार्ये व स्वरूप यांचा अभ्यास करणारे शास्त्र होय."

## १.३ वस्ती भूगोल : - स्वरूप आणि व्याप्ती:

ग्रामीण वस्तीचे स्वरूप पर्यावरणानुसार निरनिराळे असते. तसेच वस्तीचा जसजसा विकास होत जातो तसतसे वस्तीचे स्वरूपही बदलत जाताना आढळते. पृथ्वीवरील प्राचीन मानवाचे जीवन भटक्या स्वरूपाचे होते. स्वतःचे अन्न मिळविण्यासाठी तसेच पाळलेल्या पशूंच्या चार्यासाठी, पाण्याच्या शोधार्थ मानव भटके जीवन जगत होता. त्यावेळी तो गटागटाने राहत होता. पण त्याची राहण्याची जागा स्थिर नव्हती. त्यामुळे तो एकाच जागेवर कायम स्वरूपाची वस्ती करून राहत नव्हता. त्यानंतर तो एकाच जागेवरची शेती करू लागल्यानंतर मानवी जीवनाला स्थैर्य आले. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा एका ठिकाणीच भागत असल्याने मानवाला स्थायी स्वरूपाचे सुरक्षित जीवन मिळाले. याचवेळी ग्रामीण वसाहतीचे स्वरूप केंद्रीत स्वरूपाचे होवू लागले कारण मानव एकट्याने राहण्यापेक्षा समूहात राहणे पसंत करतो. अशा एकत्रित वस्तीमुळे मानवाला सुरक्षितता मिळते. तसेच एकमेकांमध्ये वस्तूची देवाण-घेवाण करता येते. भौगोलिक घटकांचा परिणाम वसाहतीच्या स्वरूपावर होत असतो. त्यामध्ये विशेषतः प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, नदी किनारे, समुद्र किनारे इ. वसाहतीचे स्वरूप केंद्रीत असणे किंवा विखुरलेले असणे हे भौगोलिक घटकांवर अवलंबून असते. तसेच मानवाने निर्माण केलेले रस्ते, कालवे या सांस्कृतिक घटकांचा परिणाम होतो. म्हणून जगातील प्रत्येक भागात असणाऱ्या ग्रामीण वसाहतीचे स्वरूप सारखे आढळत नाही.

आधुनिक काळात कृषी क्षेत्रात, औद्योगिक क्षेत्रात तसेच त्या अनुषंगाने असणाऱ्या इतर क्षेत्रात झपाट्याने होत असलेला बदल व विकास याचा परिणामही ग्रामीण वसाहतीच्या स्वरूपावर होत आहे. यामुळेच ग्रामीण वस्तीचे स्वरूप दाट असल्यास ते विखुरलेले होते किंवा विखुरलेले असल्यास दाट होते. कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आधुनिकता आलेली दिसते. यांत्रिकीकरणाचा वापर मोठ्या प्रमाणात होताना आढळतो. त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण वस्तीचे स्वरूप बदलत आहे. उदा. छोटे शेतकरी आपल्या शेत जमिनी मोठ्या शेतकर्यांना विकतात व जवळच्या शहरांकडे स्थलांतरीत होतात. विकसीत देशांमध्ये जलसिंचनासाठी आणि जलविद्युतच्या निर्मितीसाठी नद्यांचे पाणी अडवून धरणे बांधली जातात. अशा ठिकाणी अस्तित्वात असलेल्या ग्रामीण वसाहतीचे स्वरूप बदलते. कारण जेथे धरण बांधले जाणार आहे त्या प्रदेशातील ग्रामीण वस्त्या हटविल्या जातात व त्यांचे पुनर्वसन इतर ठिकाणी केले जाते. त्यामुळे नवीन वस्तीचे स्वरूप वेगळ्याच प्रकारचे तयार होते. खेड्याचे शहरात रूपांतर होण्याची प्रक्रिया सुध्दा ग्रामीण वस्तीचे स्वरूप बदलण्यास कारणीभूत ठरते. एखाद्या मध्यवर्ती ग्रामीण वस्तीचे रूपांतर आठवडा बाजार किंवा हळूहळू शहराकडे होत जाते. छोटी खेडी रस्त्यामुळे खेड्याचा जास्त विकास विकास-आठवड्याचा मोठी वस्ती बाजार एखाद्या ग्रामीण भागात खनिज संपत्तीचा शोध लागल्यास खनिजाचे उत्खनन सुरू झाल्यास तेथे नव्याने ग्रामीण औद्योगिक वसाहत निर्माण होवू शकते.

पर्यटनासारख्या नवीन उद्योगामुळे अनेक ग्रामीण वस्त्यांचे स्वरूप बदलत आहे. उंच पर्वतांमध्ये असणारी थंड हवेची ठिकाणे विकसीत होत आहेत. समुद्र किनार्यावरील लहान-लहान ग्रामीण वस्त्या विकसित होताना आढळतात. इतकेच नाही तर कृषी पर्यटन व ग्रामपर्यटन यांच्या माध्यमातून ग्रामीण वसाहतीच्या स्वरूपात अमुलाग्र बदल झालेले आढळतात.

शासनाच्या प्रादेशिक समतोल साधण्याच्या धोरणाचाही परिणाम ग्रामीण वस्तीच्या स्वरूपांवर होतो. खेड्याकडे चला हा नारा पुन्हा एकदा जोर धरू लागलाय. ग्रामीण वसाहतीचे स्वरूप स्थानिक पर्यावरणाला अनुसरून आणि विकासाच्या माध्यमातून सतत बदलत जाणारे असते.

नागरी भूगोल ही वस्ती भूगोलाची शाखा आहे. वस्ती भूगोल ही सामाजिक भूगोलाची शाखा. परंतु सामाजिक भूगोल ही मानवी भूगोलाची शाखा असल्याने नागरी भूगोल ही मानवी भूगोलाची शाखा समजली जाते. मानवी भूगोलात भौगोलिक घटकांचा, मानवाचे राहणीमान, त्यांचा आहार, कपडे, घरबांधणी, मानवी वसाहत, व्यवसाय इ. वर परिणाम होतो.

नागरी वस्ती ही एक वैशिष्ट्यपूर्ण पण एकमेकांशी संबंधीत असलेल्या विविध घटकांचे संकलन असते. नागरी वस्तीच्या अभ्यासकाला या घटकांचे आणि त्याच्या रचनेचे नीट निरीक्षण व परिक्षण करावे लागते. शंपूर्ण नगर दृष्यांचा विचार केल्यास नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणाशी असलेला बदलता संबंध अभ्यासावा लागतो. नगरे लहान मोठ्या आकाराची असतात. त्यांची रचना, कृती, कार्य या गोष्टीही भिन्न स्वरूपाच्या असतात. घरासाठी वापरले जाणारे साहित्यही भिन्न – भिन्न स्वरूपाचे असते. नागरी वस्तीतील लोकांना अनेकदा समान व भिन्न प्रश्ननाना तोंड द्यावे लागते. प्रत्येक नगराचे स्वतंत्र प्रभाव

क्षेत्र असते. आजूबाजूच्या ग्रामीण व अर्धनागरी परिसरावर त्यांचा प्रभाव आढळतो. प्रत्येक शहरांचा त्या-त्या विभागाच्या राज्यात ठसा उमटलेला असतो. विभागाच्या राज्याच्या विकासात त्याचा हातभार लागलेला असतो. उदा. मुंबई शहराचा ठसा महाराष्ट्र व गुजरातमधील विकासावर, घरबांधणीवर, वाहतुकीवर पडलेला दिसून येतो.

जगातील सर्वत्रच लोकसंख्यात्मक बदल दिवसेंदिवस झपाट्याने होत असल्याने नागरीकरण हे एक ठळक वैशिष्ट्य बनत चालले आहे. काही नगरे व वस्त्या सर्व दिशांना वाढत आहेत. तर काही नागरी वस्त्या शेजारच्या नागरी वस्तीच्या मदतीने संकलित स्वरूप धारण करीत आहेत. येथे लोकसंख्येचे दाट जाळे निर्माण करत आहेत. नागरी वस्तीचे स्थान आकृतीबंध आणि रचना यांचा भोवतालचे प्राकृतिक पर्यावरण न मानवी संस्कृती याच्या इतिहासाशी एक प्रकारचा अन्योन्न संबंध असतो. म्हणून नागरी वस्तीचा अभ्यासात पुढील ४ प्रमुख घटकांचा समावेश होतो.

१) नागरी वस्तीचे स्थान व स्थिती

२) नागरी वस्तीचा इतिहास

३) नागरी वस्तीची संरचना व आकृतिकी

४) सीमा

तुमची प्रगती तपासा :

१) ग्रामीण वस्तीचे बदलते स्वरुप स्पष्ट करा.

२) नागरी भूगोलाचे स्वरुप व व्याप्ती स्पष्ट करा.

## १.४ वस्तीचे प्रकार

मानवी वस्तीचे प्रामुख्याने दोन प्रकार केले जातात.

१) ग्रामीण वसाहत

२) नागरी वसाहत

ग्रामीण वसाहत: व्याख्या

पुराणात खेड्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे-

“तथा शूद्रजनप्राया सुखसमृध्दकृषीवला।

क्षेत्रोपभोगभूर्मध्ये वसतिर्ग्राम संज्ञिता।।”

शेती व वसाहतीसाठी योग्य जमीन असणाऱ्या अशा शेतकरी आणि मजुरांच्या वस्तीला ग्राम म्हणतात.

munotes.in

मुखर्जी यांच्यामते, गाव म्हणजे असा मानवी समूह की ज्यांच्या ठिकाणी साक्षेप सांस्कृतिक व सामाजिक साम्य आढळते. ज्यांचे स्वरूप अनौपचारिक व प्राथमिक समूहासारखे असते. लोकसंख्या घनता कमी असून शेती हा मुख्य व्यवसाय असतो.

**व्याख्या :**

१) ज्या वसाहतीत प्रामुख्याने शेती, मासेमारी, खाणकाम व जंगलावर आधारित प्राथमिक व्यवसाय चालतात. अशा वसाहतींना ग्रामीण वसाहती म्हणतात.

२) ज्या वसाहतीमधील मुख्य व्यवसाय प्राथमिक स्वरूपाचे असतात. त्या वसाहतींना ग्रामीण वसाहती म्हणतात.

३) लोकसंख्येची घनता कमी असलेल्या वसाहती म्हणजे ग्रामीण वसाहती होय.

४) लोकसंख्येची घनता कमी असलेली व नैसर्गिक घटकावर अवलंबून असलेला अधिवास म्हणजे ग्रामीण वसाहती होय.

**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण वसाहतींची व्याख्या द्या.

**ग्रामीण वसाहतीचे महत्व**

१) जगातील नागरी संस्कृतीचा उगम ग्रामीण वसाहती मधूनच झालेला आहे.

२) ग्रामीण वसाहत स्थापन झाली आणि मानवाची भटकी अवस्था संपुष्टात आली.

३) ग्रामीण वसाहतीचा संबंध थेट निसर्गाशी येतो. त्यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यात अतुट नाते निर्माण होते. निसर्गशक्तीवर विस्वास असतो.

४) जगातील प्रत्येक व्यक्तीची अन्नाची गरज ग्रामीण वसाहती मधूनच भागविली जाते.

५) संस्कृतीत समाविष्ट असणाऱ्या जैविक व अजैविक घटकांचा प्रभाव मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणावर आढळतो. धार्मिक चालिरीती, रूढी, परंपरा येथेच जोपासल्या जातात.

६) ग्रामीण वसाहतीमध्ये लोकसंख्या कमीच / विरळ असते त्यामुळे शुध्द व मोकळी हवा, शांतता, स्वस्थता याचा पुरेपुर उपभोग घेता येतो.

७) ग्रामीण वसाहतीतील आंतरक्रिया प्रत्यक्ष स्वरूपाच्या आढळतात कारण या वसाहतीचा आकार लहान असतो. प्रत्येक व्यक्तीचा एकमेकांशी परिचय असतो. त्यामुळे परस्परांशी जवळचे व घनिष्ट सहसंबंध प्रस्थापित होत असतात.

८) नागरी वस्तीच्या मुलभूत गरजा ग्रामीण वसाहती मधूनच भागविल्या जातात. त्यादृष्टीने ग्रामीण वसाहती प्रमुख स्त्रोत आहेत.

९) पर्यावरणाचा समतोल ग्रामीण वसाहतीमधून राखला जातो.

**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण वस्त्यांचे महत्त्व स्पष्ट करा.

## १.५ ग्रामीण वसाहतीची वैशिष्टे

१) आकार लहान असतो.

२) वसाहतीतील घरे लहान असतात.

३) घरांच्या बाधकामासाठी स्थानिक पर्यावरणातील घटकांचा वापर केला जातो.

४) घरांची बांधणी किंवा रचना योजनाबध्द नसते.

५) व्यक्तीच्या निरोगी आरोग्यबाबतच्या विचार घरे बांधताना केला जात नाही त्यामुळे घरांना दारे खिडक्या कमी असतात.

६) ग्रामीण वसाहती रूढीप्रिय व परंपरानिष्ठ असतात.

७) पक्क्या रस्त्यांचा अभाव असतो.

८) दळणवळणाच्या साधनांचा अभाव आढळतो.

९) रस्ते अरूंद असतात.

१०) सामाजिक सोयी-सुविधांचे प्रमाण कमी असते.

११) ग्रामीण वसाहती तांत्रिकदृट्या मागसलेल्या आढळतात.

१२) प्राथमिक व्यवसायांचे प्रमाण जास्त असते.

१३) ग्रामीण वसाहती स्वयंपूर्ण असतात.

१४) ग्रामीण वसाहतीतील एकूणच जीवनशैलीवर व संस्कृतीवर शेतीचा प्रभाव दिसून येतो.

१५) ग्रामीण वसाहतीत परस्परावलंबन, सामुहिकता व एकतेची भावना आढळते.

**तुमची प्रगती तपासा :**

१. ग्रामीण वसाहतीची वैशिष्टे सांगा.

munotes.in

**नागरी वस्तीच्या व्याख्या**

**१) ग्रिफिथ टेलर :-**

नागरी वसाहतीत शहराचे स्थान, विकास, प्रारूप आणि वर्गीकरण यांचा अभ्यास केला जातो.

**२) हेरॉल्ड मेयर :-**

नागरी वसाहतीत या प्रारूपांच्या संबंधाचा अभ्यास केला जातो की ज्यामध्ये शहरी क्षेत्रे एका बाजूला आणि दुसर्या बाजूला अशहरी क्षेत्रे यांच्या दरम्यानच्या प्रदेशाला शहरी सेवेचा लाभ मिळतो.

**३) स्टॅम्प: -**

नागरी वसाहतीत म्हणजे भौगोलिक स्वरूपात शहराचा सखोल अभ्यास व त्याचा सर्वांगीण विकास होय.

**नगर किंवा शहर म्हणजे काय?**

शहर म्हणजे काय व ते खेड्यापासून कसे भिन्न असते ते आपण सहज ओळखू शकतो. पण शहर या वस्तीची व्याख्या करणे तेवढे सोपे नाही. भारतीय परंपरेने मोठ्या वस्तीसमुहांना पुर, पुरा, नगर व शहर अशा प्रकारची संबोधने वापरण्यात आल्यामुळे त्या वस्तीचा नागरी दर्जा कळू शकतो.

भारतीय जनगणना जेव्हा (१८७५) रूढ झाली तेव्हापासून १९६१ पर्यंत ज्या वस्तीची लोकसंख्या ५००० किंवा त्यापेक्षा जास्त असेल त्यांना शहर संबोधले जावे असे ठरले गेले. यावरून वस्ती समुहाचा लोकसंख्येशी संबंध आहे हे सिद्ध होते. तथापि ५००० लोकसंख्या हा निकष सर्व राष्ट्रांमध्ये रूढ नसून याबाबतीत राष्ट्रा - राष्ट्रामध्ये महत्वाचे फरक आढळून येतात. उदा. डेन्मार्कमध्ये २०० वर लोकसंख्या असलेले गाव शहर मानण्यात येते व कनडामध्ये २१००० लोकसंख्येला शहराचा दर्जा दिला जातो. संयुक्त संस्थानात २५०० व फ्रान्समध्ये २००० लोकवस्तीला शहर संबोधले जाते. याप्रमाणे राष्ट्रा-राष्ट्रामध्ये भिन्नता आढळून येते. याचे कारण म्हणजे शहर ही संकल्पना केवळ भौगोलिक घटकांवर आधारलेली नसून ऐतिहासिक वाढ, सांस्कृतिक महत्व, प्रशासकीय कार्य, आर्थिक भरभराट यांचा याबाबतीत विचार करणे प्रत्येक राष्ट्राला त्यांच्या राष्ट्र परंपरेनुसार इष्ट वाटते.

नगरांचे /शहरांचे निरिक्षण करून अनेक शास्त्रज्ञांनी वस्तीविषयी आपल्या व्याख्या दिलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

**१) लुईस विर्थ :-**

सामाजिक विषमरूपता असलेल्या वस्तीच्या सापेक्ष दृष्टीकोनातून मोठा, दाट व स्थायी स्वरूपाचा घरांचा समूह म्हणजे वसाहत होय.

**२) लिडमन : -**

ज्या वस्तीची लोकसंख्या दाट असते, तेथील लोक परस्परांशी संबंधीत कृषी व्यतिरिक्त कार्यात मग्न असतात. ज्यांच्या द्वारा विविध स्वरूपात व्यापक क्षेत्रामध्ये होणार्या क्रियांचा अनेक क्षेत्रात कार्य करणार्या लोकांबरोबर संबंध प्रस्थापित होतो. त्या वसाहतीला नगर/ शहर म्हणतात.

**३) रॅटझेल :- यांच्या मतानुसार शहराची व्याख्या**

१) रहिवाशाचे उद्योगधंदे

२) घरांची दाटी व

३) रहिवाशांची किमान संख्या यावर आधरलेली आहे.

४) भारतीय जनगणना खात्यानुसार (नियोजन मंडळ) / शरगणती खात्यानुसार शहराची व्याख्या :

ज्या वस्ती समूहाची लोकसंख्या ५००० किंवा त्यापेक्षा अधिक आहे, लोकसंख्येची दर चौ. कि. घनता ४०० आहे व ज्या वस्तीत ७५ टक्के किंवा जास्त पुरूष शेतीशिवाय अन्य व्यवसायात गुंतलेले आहेत अशा वस्तीला नागरी वस्ती किंवा शहरी वस्ती असे म्हणतात.

जर शेतीशिवाय अन्य व्यवसायातील लोक ७५ टक्केपेक्षा अधिक असतील तर ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या विभागालाही नागरी विभाग म्हणण्यात यावे. असेही नियोजन मंडळाने मान्य केलेले आहे.

भारतीय जनगणना खात्याची व्याख्या अगर त्याप्रकरच्या इतर व्यवसायाच्या व्याख्या या व्यावसायिकदृष्ट्या उपयुक्त ठरतात. या व्याख्येच्या आधारावर दिलेली जनसंख्या मांडणी नागरी भूगोलाच्या दृष्टीने मूलस्वरूपाची व उपयुक्त असते. तथापी केवळ या संख्यावार माहितीद्वारे शहरांचे पूर्ण स्वरूप व्यक्त होत नसून वस्तीची खरी प्रादेशिक व्याप्ती, त्याचे बदलते पर्यावरण, शहरवासियांचे जीवन व जीवनक्रम या उपायांची जाणीव व अभ्यास या गोष्टी तितक्याच महत्वाच्या असतात हे लक्षात ठेवले पाहिजे.

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरी वस्तीची व्याख्या द्या.

**वस्तीची वैशिष्ठये / नागरी जीवनाची वैशिष्ठये :-**

ग्रामीण वस्तीपेक्षा शहरी /नागरी वस्तीची वैशिष्ठये पूर्णपणे भिन्न आढळतात. त्यातील काही प्रमुख वैशिष्ठये पुढीलप्रमाणे :-

१) प्राथमिक नियंत्रणाचा अभाव

२) दुय्यम समुह सहवास

३) सामाजिक विषमरूपता

४) व्यक्तिवाद

५) नियंत्रणाचा अभाव

६) सामाजिक सहनशीलता

७) विविध प्रकारची मंडळे

८) जागेचा प्रशन

९) झोपडपट्या

१०) क्षेत्रिय नियोजन

**१) प्राथमिक नियंत्रणाचा अभाव :-**

असंख्य लोकांच्या वास्तव्यास शहरी वस्ती असे म्हणतात. शहरातील कुटुंबे लहान- लहान असून स्वतंत्र असतात. त्यामुळे त्यांना गतिशिलता प्राप्त होते. विभक्त कुटुंबामुळे व्यक्तीचा विकास होत जातो. ग्रामीण भागात संयुक्त कुटुंब असल्याने व्यक्तिविकास आढळत नाही. शहरी भागात लोक वेगवेगळया व्यवसायात गुंतलेले असतात. त्यामुळे कळत नकळत शेजारी समुहाचे संबंध विकसीत होण्यास वाव मिळत नाही. कुटुंबाची सुख-दुःखे कुटुंबापर्यंत मर्यादीत राहतात. थोडक्यात कुटुंब हे प्रत्येकाचे विश्व निर्माण होते. नागरी वस्तीमध्ये सर्रासपणे विभक्त कुटुंब पध्दत आढळते. प्रत्येक कुटुंब हे आपापल्या कुटुंबाच्या विकासासाठी नेहमीच धडपडत असल्याने आजुबाजुच्या विकासाच्या दृष्टीकोनातून कधीही विचार केला जात नसल्याने त्या लोकांवर स्वतःचे नियंत्रण ठेवण्याचा प्रशन उद्भवत नाही. त्यातूनच कुटुंबप्रमुख व्यक्ती विभक्त कुटुंबपध्दती स्विकारतात. कुटुंबातील इतर माणसांवर नियत्रण ठेवण्याचा कधीही प्रयत्न करीत नाही. म्हणजेच तेथे प्राथमिक गटाच्या नियंत्रणाचा अभाव आढळतो.

**२) दुय्यम समुह सहवास :-**

शहरी वस्तीत लोकसंख्या वाढल्याने परस्परामध्ये ऐक्याची, आपुलकीची भावना निर्माण होत नाही. परंतु जी भावना निर्माण होते ती औपचारिक स्वरूपाची असते. कारण कामाच्या निमित्ताने अनेक भागातून लोक एकत्र आलेले असतात. हे लोक अनेक धर्माचे, वेगवेगळी भाषा बोलणारे वेगवेगळ्या आचार-विचाराचे असतात. त्यामुळे लोक तटस्थतेची भुमिका घेतात. त्यातून विजातीय समुह होत जातात.

नागरी वस्तीमध्ये विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांच्या निमित्ताने वेगवेगळ्या जातीचे, धर्माचे लोक एकत्र आलेले असतात. त्यामुळे नागरी भागात असलेला समुह सहवास दुय्यम दर्जाचा राहतो, प्रत्येक व्यक्ती ही आपापल्या कामापुरती इतरांशी असलेले संबंध ठेवत असतात. आपली गरज भागल्यानंतर निर्माण झालेले संबंध पुढे चालू ठेवतीलच याची खात्री नसते. म्हणजे तेथील सहवास हा अतिदृय्यम दर्जाचा मानावा लागतो. थोडक्यात एकूण शहराची रचना दुय्यम समुहास पोषक अशी तयार होते.

**३) सामाजिक विषमता :-**

अनेक भौगोलिक पर्यावरणातून आलेल्या लोकांचे केंद्रीकरण एकाच भौगोलिक पर्यावरणात होत रहाते. हे लोक धर्माचे, जातीचे, वंशाचे असतात. ते शहराच्या वेगवेगळ्या भागात काम करीत असतात. परस्परांचे कोणत्याही कारणाने संबंध न आल्याने आपुलकीची भावना त्यांच्या मनात निर्माण होत नाही. त्यामुळे लोकांमध्ये असलेले समंजस्य, एकता ही तेवढ्या पूरती रहात असल्याने तसेच प्रत्येकाच्या चालीरीती, पध्दती, आचार –विचार भाषा वेगवेगळ्या असल्याने एकूण नागरी जीवनात सामाजिक विषमवृत्तीचे स्वरूप पहावयांस मिळते. शहरातील काही भागात अत्यंत श्रीमंत असणारे तर त्याच शहरात पोट न भरण्या इतपत गरीबी असणारे लोक राहतात.

**४) व्यक्तीवाद –**

शहरातील वातावरण व्यक्तिवादास पोषक असते. यातून स्वयंकेंद्रीत जीवनपध्दतीचा उगम होतो. व्यक्तिच्या विकासासाठी लागणारी अनेक साधने असल्याने प्रत्येक व्यक्ती आपला विकास करण्याचा प्रयत्न करीत असते. परिणामी संपूर्ण समाज गतिशील बनत जातो. नागरी वस्तीत विभक्त कुटुंब पध्दतीतूनच व्यक्ती विकास उदयास आलेला असतो. प्रत्येक व्यक्ती स्वतःपुरतीचे विचार करत असतात. फारतर स्वतःच्या कुटुंबाचा विचार केला जातो. शेजारी अगर सोबत काम करणारे लोक यांना त्यांच्या दृष्टीने गौण स्थान दिलेले असते म्हणजेच नागरी जीवनामध्ये व्यक्तीवादाचा उदय झालेला आढळतो.

**५. नियंत्रणाचा अभाव -**

व्यक्तीवर नियंत्रण ठेवणार्या प्राथमिक संस्था किंवा गट शहरी भागात आढळत नाही. कारण कामाच्या निमित्ताने स्वतःच्या राहत्या घरापासून कुटुंबातील व्यक्तीला दूर जावे लागते. त्यामुळे व्यक्तीचा बराचसा वेळ घराबाहेर जातो. परिणामी त्या व्यक्तीचे आपले कुटुंबातील नियंत्रण सैल होते. या नियंत्रणांची जागा कायदा संस्था, वेगवेगळी मंडळे घेतात. त्या संस्थेमार्फत समाज नियंत्रण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. परंतु अनेक आचार-विचार असणारे लोक एकत्रित आल्याने त्याच्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. यातून नागरी जीवनाच्या नियंत्रणात शिथिलता येते.

नागरी वस्तीमध्ये दिवसे दिवस भरमसाठ संख्या वाढत असल्याने तसेच विविध प्रकारच्या रोजगाराची उपलब्धता नेहमीच होणारी असल्याने प्रत्येक गोष्टीवर नियंत्रण ठेवणे हा एक नागरी जीवनासमोरील प्रश्नन निर्माण झाला आहे.

**६ सामाजिक सहनशिलता :-**

शहरात गरीब, श्रीमंत , साक्षर , निरक्षर अशा अनेक प्रकारच्या व्यक्ती काम करत असतात. शहरात विविधता असल्याने आपलेपणाची जाणीव होत नाही. प्रत्येक दैनंदिन वस्तू मिळण्यासाठी संघर्ष व जास्त वेळ लागत असल्याने या लोकांमध्ये सहनशिलता मोठ्या प्रमाणात निर्माण होते. थोडक्यात शहरी समाज सहनशिलतेमध्ये परिपक्क होत जाते. नागरी वस्तीत श्रीमंत-गरीब अतिगरीब, अपेक्षित अशा प्रकारचे परस्पर विरोधी असलेल्या गटाचे लोक एकत्रितरित्या वावरताना आढळतात. जी परिस्थिती असले त्या परिस्थितीमुळे

मिळते –जुळते घेऊन काम करावे लागते. त्यामुळे या दोन परस्पर विरोधी असलेल्या लोकांमध्ये तटस्थतेची भावना निर्माण होत जाते.

**७) विविध प्रकारची मंडळे :-**

अनेक कारणामुळे प्रत्येकजण आपल्या कार्यात मग्न असल्याने इतरांकडे कमी लक्ष देतात. स्वतःचा विकास करण्यास प्रत्येकजण प्रयत्न करीत असतो. शहरात विविधता असल्याने त्यांची धोरणे वेगवेगळी असतात. नागरी जीवनाचे प्रत्येक माणूस त्या समाजामधील आपले स्थान दर्जा व प्रतिष्ठा नेहमीच उंचावण्यामागे सतत धडपडत असतात. व याच इच्छेपोटी नागरी समाजामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या मंडळाची स्थापना होते. या प्रत्येक मंडळाचे ध्येय व उद्दिष्ट साध्य व साधन वेगवेगळ्या प्रकारचे असते. विविध मंडळातील समान साध्य व उद्दिष्ट असलेल्या मंडळातील लोक एकत्र येऊन आपले ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने धडपड करताना आढळतात. उदा. कामागार संघटना, राजकीय पक्ष.

**८) जागेचा प्रशन -**

नागरी वस्तीचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे राहण्याच्या जागेची टंचाई हे होय. शहरातील कार्ये अनेक प्रकारची असल्याने वेगवेगळे व्यवसाय व त्यावर आधारित इतर व्यवसाय सुरू होतात. विविध उद्योगधंद्याची सतत वाढ त्यातून निर्माण होणारा रोजगार व आशा रोजगाराच्या आशेने आलेले भरमसाठ लोक या सगळ्या लोकांच्या रहाण्याच्या जागेचा प्रशन मर्यादित जागा असलेले नगर सोडवू शकत नाही. कमीत कमी जागेत अनेक व्यवसाय व अनेक मजली इमारती बांधल्या जातात. त्यामुळे त्या नगरातील लोकांसमोर राहण्याच्या जागेचा प्रश्न निर्माण होतो.

**९) झोपडपट्ट्या –**

राहत्या जागेचा प्रशन निर्माण झाल्यानंतर थोड्या फार प्रमाणात मिळेल त्या ठिकाणी मोकळ्या असलेल्या जागेत असे लोक आपल्या वस्त्या झोपडपट्यांमधून करू लागतात. हळूहळू झोपड्यांची संख्या वाढत जाते व एकवेळ अशी येते की, नियोजना अभावी उत्कृष्ट घरांची बांधणी होत नसल्याने गलिच्छ वस्त्या निर्माण होत राहतात. या क्षेत्रात कोणत्याही सुखसोई योग्य पध्तीने न झाल्याने सर्व विभाग गलिच्छ होतात. या झोपडपट्टी वस्तीमुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होऊ लागतात. नागरी जीवनाचा एक भाग म्हणजे गलिच्छ वस्त्या अशा प्रकारची परिस्थिती आज निर्माण झालेली पहावयास मिळते. झोपडपट्यांच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञ हंटर याने आपले मत प्रतिपादन केले ते असे की गलिच्छ वस्त्या या नागरी जीवनाला झालेला एक कन्सर होय. उदा. मुंबईमध्ये धारावी झोपडपट्टी ही आशिया खंडामधील सर्वात मोठी झोपडपट्टी आहे.

**१०) क्षेत्रीय नियोजन :-**

शहराच्या निरनिराळ्या भागात व्यवसायांचे, उद्योगधंद्याचे व इथर समुहाचे नियोजन झालेले असते. याला क्षेत्रीय नियोजन म्हणतात. नागरी वस्तीमध्ये सतत वाढणार्या लोकसंख्येच्या गर्दी बरोबर, दळणवळण, लहान मोठे उद्योगधंदे. इ. त भरमसाठ वाढ होत असते. यातूनच मुळात कमी असलेल्या जागेच्या नियोजनाचा मोठा प्रशन निर्माण होतो व त्यावर मात

म्हणून क्षेत्रीय नियोजनाची आवश्यकता भासते. शासकीय कार्यालये, बँक, पतपेढ्या इ. शहरांच्या मध्यवर्ती किंवा योग्य भागात केंद्रीत झालेली असतात. रहण्याचे ठिकाण विशिष्ट असते. परिणामी शहराचा विशिष्ट भाग विशिष्ट कार्यासाठी प्रसिध्द असतो. राहण्याच्या जागेसाठी उद्योगधंद्याच्या स्थापनेसाठी जागा मिळविण्यासाठी नेहमी स्पर्धा करताना आढळतात. अशा विविध भागात उद्योग धंद्याचे, व्यवसायाचे आणि समूहाचे नियोजन झालेले असते. त्याला क्षेत्रिय नियोजन म्हणतात.

**तुमची प्रगती तपासा :**

**१) नागरी वस्तीची वैशिष्टये स्पष्ट करा.**

**नागरी लोकसंख्येची वैशिष्टये**

ग्राम शहर व नगर या वस्ती प्रकारामध्ये असलेला भेद लोकसंख्येच्या सहाय्याने ताबडतोब स्पष्ट होतो. खेड्यापेक्षा नागरी लोकसंख्येची वैशिष्टये भिन्न आढळतात. त्यातील काही प्रमुख वैशिष्टये पुढीलप्रमाणे –

१) नागरी वसाहतीची लोकसंख्या जास्त असते. शहरामध्ये लोकवस्ती दाट आढळते. उदा. मुंबईतील लोकसंख्या घनता दर चौ. कि. मी. ५००० पेक्षा जास्त आढळते.

२) नागरी वसाहतीमध्ये कार्यक्षम वयोगटाचे प्रमाण ( तरूण वयोगटाचे) जास्त असते. कारण नोकरीधंदा अगर अन्य करणासाठी ग्रामीण भागतून शहरी भागाकडे तरूण वयोगटातील लोकांचे स्थलांतर होते. उदा. कोकण विभागातून मोठ्या प्रमाणात तरूण वर्ग कामाच्या निमित्ताने मुंबईला स्थलांतर झाल्याने मुंबईतच तरूण वयोगटातील लोकांचे प्रमाण जास्त आढळते.

३) शहरी लोकसंख्येत स्त्रियांपेक्षा पुरूषाचे प्रमाण जास्त असते. निर्वाहासाठी शहरी स्थलांतर करणे यामध्ये पुरूषांचे प्रमाण जास्त असते. ग्रामीण भागातून शहराकडे स्त्रियांपेक्षा पुरुषांचे स्थलांतर जास्त होत असल्याने शहरात पुरूषांचे प्रमाण जास्त असते.

४) शहरी रहिवाशांमध्ये कर्त्या पुरूष वर्गात विवाहीतापेक्षा अविविहीतांचे प्रमाण जास्त असते. याचे कारण नागरी जीवनात शिरण्यासाठी जो संघर्ष करावा लागतो व नोकरीची अनिश्चितता व रहण्याची कठीण परिस्थिती पुरुष सहन करू शकतो.

५) नागरी वसाहतीमध्ये अनेक धर्माचे, वंशाचे, जातीचे लोक राहताना दिसतात. कारण मोठ्या शहरात स्थलांतरीत लोकांचे प्रमाण तेथेच जन्मलेल्या रहिवाशांपेक्षा मोठे असते. स्थलांतरीत समुह निरनिराळ्या प्रांतामधून अथवा प्रदेशामधून आल्यामळे शहर हे बहुभाषिक तसेच बहुधर्मीय होते.

६) शहरी लोकसंख्येमध्ये शिक्षितांचे प्रमाण मोठे असते. शाळा, शिक्षणाच्या सोई मोठ्या प्रमाणात असल्याने शैक्षणिक पातळी उच्च दर्जाची असते.

७) नागरी वसाहतीमध्ये भिन्न धर्माचा अथवा भाषांचा समुह सहकार्याने रहातो.



munotes.in

८) शहरामध्ये प्राथमिक श्रेणीच्या व्यवसायापेक्षा द्वितीय / तृतीय व्यवसायात लोकांची संख्या जास्त आढळते . कारण शहरामध्ये व्यापार, वाहतूक व कारखानदारी यांचा विकास झालेला असतो.

९) शहरांमध्ये पुरूषांबरोबर स्त्रिया उद्योगधंदे, कार्यालये, शासन, शिक्षणसंस्था, बँक, हॉस्पिटल यासारख्या व्यवसायात काम करताना आढळतात.

१०) शहरामध्ये लोकांचा राहणीमानाचा दर्जा उच्च असला तरी शहरांमध्ये गरीब-श्रीमंत असाही भेद आढळतो. आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात आढळते.

११) शहरी लोकसंख्येचे महत्वाचे वैशिष्ट म्हणजे विभक्त कुटुंब पध्दती / लहान कुटुंब पध्दती मोठ्या प्रमाणात आढळते. कुटुंबात मातापिता व मुले इ. च आढळतात. जागेची टंचाई व वाढती महागाई यामुळे कर्त्या पुरूषास आपले लहान कुटुंब देखील कष्टदायक ठरते.

१२) नागरी लोकसंख्येत नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा वेग कमी असतो कारण नागरी जीवनातील पर्यावरणाचा कुटुंब नियोजनावर परिणाम होतो. आहार, राहण्याची मर्यादित व्याप्ती, मुलांच्या संगोपनाचा व शिक्षणाचा वाढता खर्च, मातेचा व्यवसायात जाणारा वेळ आपल्या मुलास चांगले वाढवले पाहिजे व आपल्या मुलास उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण मिळावे ही पालकांची आकांक्षा या सर्वाचा परिणाम मुले थोडीच असावीत या पालकांच्या इच्छेवर होतो.

१३) नागरी लोकांत एकमेकांविषयी आपुलकीची भावना नसते.

थोडक्यात दाट लोकवस्ती, तृतीय व्यवसायात जास्त लोक, स्त्रियांपेक्षा पुरूषांचे प्रमाण जास्त ही नागरी लोकसंख्येची प्रमुख वैशिष्टये होत.

**नागरी व ग्रामीण वस्तीतील फरक :-**

१) व्यवसाय

२) लोकसंख्या घनता

३) सामाजिक संघटना

४) पर्यावरण

५) सामाजिक गतिशिलता

६) सामाजिक दष्टीकोन

७) सामाजिक भिन्नता

८) सामाजिक संपर्क

९) सामाजिक थर

१०) श्रम विभागणी

नागरी / ग्रामीण वस्तीतील फरक स्पष्ट करत असताना काही भूगोलवेत्यांनी त्या भागाचे एकूण क्षेत्रफळ आणि क्षेत्रफळामध्ये राहणार्या एकूण लोकसंख्येद्वारे ग्राम व नगर .यामध्ये फरक स्पष्ट करता येत नाही कारण एखाद्या कमी आकाराने असलेल्या क्षेत्रात जास्त लोकसंख्या रहाते. परंतु ते नगर नसते. उलट आकाराने मोठे असलेल्या परंतु लोकसंख्या कमी असणारे भाग ग्राम नसतात. म्हणजेच केवळ लोकसंख्या आकारमान यावरून नगर व ग्राम यामधील फरक स्पष्ट करता येत नाही. नागरी व ग्रामीण समाजातील फरक स्पष्ट करण्यासाठी खालील काही मुद्यांचा उहापोह केलेला आढळतो.

**१) व्यवसाय –**

ग्रामीण व नागरी फरक स्पष्ट करत असताना व्यवसाय हा मुख्य घटक मानला जातो. ग्रामीण समाजामध्ये सर्रासपणे प्राथमिक श्रेणीचे व्यवसाय शेती व पशुपालन, खाणकाम इ. व्यवसाय केले जातात. की जे जास्तीत जास्त प्रमाणात मानवी श्रमावर आधारलेले असून पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असतात. म्हणजेच ग्रामीण समाजातील लोक बहुतांशी प्रमाणात प्राथमिक श्रेणीच्या व्यवसायांमध्ये गुंतलेले आढळतात.

या उलट नागरी वसाहतीचा विचार केल्यास त्यामध्ये विविध प्रकारचे उद्योगधंदे, व्यापार इ. द्वितीय व तृतीय श्रेणीचे व्यवसाय असलेले आढळतात. अशा व्यवसायामध्ये मानवी श्रमापेक्षा यांत्रिकीकरणाला महत्व दिलेले असते. या व्यवसायांमध्ये उत्पन्नबाबात मोठ्या प्रमाणात निश्चितता असते. ती ग्रामीण भागामध्ये आढळत नाही.

**२) लोकसंख्या घनता :-**

लोकसंख्या घनतेबाबत ग्रामीण वसाहत व नागरी वसाहत यामध्ये नेहमी तफावत आढळते. ग्रामीण वस्ती असलेली लोकसंख्या विखुरलेल्या स्वरूपात आढळते. ग्रामीण भागातील लोकांचे जमिनीशी अतूट नाते असल्याने जास्तीत जास्त जमीन कमीत कमी लोकांच्या मालकीची असते. यामुळे ग्रामीण भागात लोकसंख्या घनता साहजिकच कमी राहते.

याउलट नागरी वस्ती विविध प्रकारचे उद्योगधंदे, लघुउद्योग, दळवळण इ. भरमसाट वाढ झाली असल्याने इतर भागातील लोकांचा लोंढा अशा शहरी भागाकडे सतत वाढत असतो. त्यामुळे नागरी भागातील लोकसंख्या घनता कितीतरी पटीने वाढलेली आढळते.

**३) सामाजिक संघटना –**

सामाजिक संघटनाबाबत विचार केल्यास ग्रामीण व नागरी वस्तीमधील सामाजिक संघटनामध्ये फरक आढळतो. ग्रामीण भागामध्ये केले जाणारे व्यवसाय प्राथमिक श्रेणीचे असून मानवी बळावर आधारित असल्याने या वस्तीमध्ये एकत्र कुटुंब पध्दती पहावयास मिळते. म्हणजे सामाजिक संघटना जास्त आढळते.

याउलट नागरी वस्तीमध्ये यंत्रांचा भरणा झाला असल्याने प्रत्येक व्यक्ती विकासाच्या मागे धावत असताना आढळत. त्यातूनच एकत्र कुटुंब पध्दतीऐवजी नागरी समाजामध्ये विभक्त कुटुंब पध्दतीची प्रथा विकसीत पावून सामाजिक संघटनांचा अभाव आढळतो

**४) पर्यावरण –**

नागरी वस्तीमध्ये विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांची सततची वाढ, वाहतूक, दळणवळण साधनांचा अतिरेक इ. मुळे पर्यावरणातील जीवनावश्यक घटकाच्या स्वांतंत्र्यावर गदा येऊन त्या ठिकाणचा पर्यावरणाचा समतोल ढासळून अशुध्द हवा, जलप्रदूषण, ध्वनी प्रदुषण इ. सारख्या जीवघेण्या समस्यांना नागरी वस्तीला तोंड द्यावे लागते.

याउलट ग्रामीण वस्तीमध्ये नियंत्रण आधारित असलेल्या व्यवसायाची नेहमीच जोपासना केली जात असल्याने वरीलप्रकारचे तोटे आढळत नाही. तर शुध्द हवा. चांगले पाणी, ध्वनी यामुळे ग्रामीण वस्तीतील लोक चांगल्या मनःस्थितीत आढळतात.

**५) सामाजिक गतिशिलता –**

ग्रामीण व शहरामधील फरक पहात असताना सामाजिक गतिशिलतेबाबत असलेला फरक प्रकर्षाने जाणवतो. ग्रामीण वस्तीतील लोक जो व्यवसाय करत असतात. त्या व्यवसायांमध्ये बदल करू इच्छित नसतात. वंशपररंपरागत रूढी-परंपरेनुसार चालत आलेला व्यवसाय जोपासत असतात.

याउलट नागरी वस्तीतील प्रत्येक माणूस हा बदलत्या काळानुसार परिस्थितीनुरूप आपापल्या व्यवसायामध्ये त्या व्यवसायाच्या पध्दतीमध्ये लागलीच बदल घडवून आणतो.

**६) सामाजिक दृष्टीकोन –**

नागरी वस्ती व ग्रामीण वस्ती यामधील लोकांचा सामाजिक दृष्टीकोन वेगवेगळा आढळतो. ग्रामीण वस्तीतील लोक 'ठेविले अनंते तैसेची रहावे' अशा प्रवृत्तीचे असावेत . याउलट नागरी  वस्तीतील प्रत्येक माणूस व्यक्ती विकासासाठी घडपडणारा असल्याने समाजातील आपले स्थान वर्तमान काळाबरोबर, भविष्य काळात उच्च राखण्याचा प्रयत्न करत असतात. तसेच स्त्रियांबाबत  असलेल्या  दृष्टीकोनातही ग्रामीण वस्तीत व नागरी वस्ती मध्ये फरक आढळतो. तो असा ग्रामीम वस्तीमध्ये स्त्रियांना गौणस्थान असते. तर नागरी वस्तीत स्त्रियां पुरूषांबरोबर वावरताना आढळतात.

**७) सामाजिक स्तर (वर्ग)-**

ग्रामीण वस्तीमध्ये  सामाजिक स्तर दोनच असतात. एक गरीब व श्रीमंत. परंतु या दोनही थरांमधील लोकांचा नेहमी संपर्क असतो. त्यातूनच आपुलकीची भावना निर्माण होते. म्हणजे सामाजिक दृष्टीकोनातून ग्रामीण वस्ती मध्ये सामाजिक स्तराचा अभावच आढळतो. याउलट नागरी वस्ती यामध्ये सामाजिक स्तर प्रकर्षाने जाणवतात. नागरी भागात एकीकडे लक्षाधीश तर दुसरीकडे भिक्षाधीश अशी  परिस्थिती आढळते.

**८) सामाजिक भिन्नता –**

नागरी वस्ती मध्ये वेगवेगळ्या प्रकरच्या उद्योगंधंद्याचे एकत्रीकरण झालेले असते. अशा विविध व्यवसायामध्ये वेगवेगळ्या जातीचे, पंथाचे लोक एकत्रितरित्या काम करताना आढळतात. त्याच्यामध्ये  कोणत्याही प्रकारची सामाजिक भिन्नता नसते.

याउलट ग्रामीण वस्तीमध्ये ठरावीक व्यवसाय, उद्योगधंदे ठराविक अशा ठिकाणी विशिष्ट जातीच्या अगर धर्माच्या लोकांना करावयाचे असतात. अशाप्रकारची परंपरा, भावना, रूढी ग्रामीण भागात प्रचलित असल्याने ग्रामीण भागात सामाजिक भिन्नता तीव्रतेने जाणवते.

**९) सामाजिक संपर्क –**

ग्रामीण वस्तीमध्ये ठरावीक व्यवसाय केले जात असल्याने व त्याचबरोबर सामाजिक भिन्नता आढळत असल्याने तसेच ग्रामीण भागाचा विकास कमी झाल्याने ग्रामीण समाजात सामाजिक संपर्काचा अभाव आढळतो. ग्रामीण लोकांचा सामाजिक संपर्क तुटपुंजा असतो.

याउलट नागरी वस्तीमध्ये विविध उद्योग वेगवेगळ्या उलाढाली नाना तर्हेची करमणुकीची साधने, मुबलक सुखसोयी या सर्वामुळे एकाच ठिकाणी अनेक तर्हेचे लोक मोठ्या प्रमाणात एकत्रित आलेले असतात. त्यातूनच नागरी समाजामध्ये लोकांमध्ये असलेला सामाजिक संपर्क सतत वाढत जातो.

**१०) श्रमविभागणी –**

ग्रामीण वस्तीतील केले जाणारे सर्व व्यवसाय मनुष्य बळावर आधारीत असून निसर्गावर अवलंबून असतात. यामुळे त्याच्या केल्या जाणार्या त्या व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारची श्रमविभागणी झालेली आढळत नाही अनेक कामे एकच व्यक्ती करताना आढळतो.याउलट नागरी समाजामध्ये मनुष्यबळाऐवजी यांत्रिकीकरणाचा वापर होत असल्याने नागरी भागातील प्रत्येक उद्योगधंदे, व्यवसायामध्ये कुशल व अकुशल अशा कामगारांच्या कामाच्या वाटपाची विभागणी झालेली आढळते. यामध्ये एकच काम अनेक कामगार करतात. म्हणजेच श्रमविभागणीला प्राधान्य दिलेले आढळते.

वरीलप्रमाणे ग्रामीण नागरी वस्तीतील फरक विविध घटकांद्वारे स्पष्ट केला जातो की ज्याच्यामार्फत ग्रामीण व नागरी समाजाची कल्पना येऊ शकते.

**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण व नागरी वस्त्यांमधील फरक स्पष्ट करा.

## १.६ वस्तीच्या वाढीवर आणि वितरणावर परिणाम करणारे घटक:

ग्रामीण भागातील घरांच्या प्रकारावर विशेषतः पुढील घटकांचा प्रभाव जाणवतो -

१) पर्यावरण

२) सामाजिक व आर्थिक स्थिती

३) समाजाच्या तांत्रिक विकासाची पातळी

**१) पर्यावरण -**

ग्रामीण वसाहतीतील घरांच्या रचनेवर पर्यावरणाचा विशेष परिणाम आढळून येतो. सूर्यप्रकाश, वार्याची दिशा आणि पावसाचे प्रमाण हे पर्यावरणातील भौगोलिक घटक घरांच्या

रचनेवर प्रभाव टाकतात. उदा वाळवंटी भागातील घरे उन्हाळ्यात थंड व हिवाळ्यात उबदार राहण्यासाठी मातीपासून बनविलेली जाड भिंतीची असतात, त्यांना मोठ्या दरवाजाची व खिडक्यांची गरज नसते, छप्पर सपाट ठेवले जाते. जास्त पावसाच्या प्रदेशातील घरांच्या छपरांची रचना उतरती असते.

पर्यतीय प्रदेशातील घरांची रचना उताराला व सूर्यप्रकाशाला अनुसरून केलेली आढळते. म्हणूनच उत्तर गोलार्धातील पर्वतीय प्रदेशातील घरे दक्षिण उताराच्या दिशेने असतात तर दक्षिण गोलार्धातील पर्वतीय प्रदेशातील घरे उत्तर उताराच्या दिशेने असतात. कमी उंचीवरील हिमालयीन रांगेतील घरे पर्वत उतारावरील थोड्या सपाट भागात असतात जेथे दरड कोसळण्याचा धोका कमी असतो. मुबलक पाण्याची सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी घरे उभारली जातात. सुपीक जमिन हाही घर बांधणीवर परिणाम करणारा घटक आहे.

**२) सामाजिक व आर्थिक स्थिती -**

आर्थिक घटकाचा फार मोठा प्रभाव घरांच्या रचनेवर व स्थानावर होतो. विशेषतः ग्रामीण भागात आर्थिक  भेद म्हणजेच श्रीमंत व गरीब अशी दरी बघायला मिळते. ग्रामीण भागातील श्रीमंत लोकांची घरे आकाराने मोठी, विस्तृत, आधुनिक स्वरूपाची व रेखीव असतात. घराच्या बांधकामासाठी दर्जेदार साहित्याचा वापर केलेला असतो व घरांचे स्थानही कोरड्या, उंचावरच्या ठिकाणी असते. तर बेताची आर्थिक स्थिती असलेल्या लोकांची घरे मध्यम स्वरूपाची आढळतात. आणि गरीब लोकांची घरे पूर्णतः पर्यावरणातील घटकांचा वापर करून उभारलेली असतात. घराचे स्थानही गावाच्या एका बाजूला किंवा दलदलीच्या भागात असते. म्हणजेच त्यांच्यासाठी घर म्हणजे केवळ निवारा असतो. याचाच अर्थ घराच्या स्वरूपावरूनही ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक स्तर समजून येतो. सामाजिक घटकातील धार्मिक घटकाचा प्रभावही ग्रामीण भागातील घरांच्या रचनेवर / स्थानावर झालेला आढळतो. भारतीय समाजात आजही बर्याच ग्रामीण भागात जातवार गावाची रचना असलेली आढळते. त्याचाच परिणाम म्हणून विशिष्ट जातीची घरांची स्थाने गावाच्या विशिष्ट ठिकाणीच आढळतात.

**३) समाजाच्या तांत्रिक विकासाची पातळी-**

आधुनिक काळानुसार कोणत्याही प्रदेशातील तांत्रिक विकासाची पातळी हा घटक ग्रामीण भागातील घराचे स्थान, बांधकामाचे साहित्य व एकंदरीत घराची रचना या सर्वांवर पडत असतो. आजकाल नवनवीन बांधकाम साहित्य वापरले जाते. असे साहित्य कोणत्याही हवामान स्थितीत वापरले जावू शकते. छपरांसाठी वापरली जाणाऱ्या कौलांऐवजी अलिकडे पत्र्यांचा वापर केला जातो. भिंतीसाठी मातीऐवजी विटा किंवा दगड वापरले जातात. घराच्या रचनेवरही याचा प्रभाव हळूहळू पडू लागला आहे.

जगभर आढळणाऱ्या घरांच्या रचनेतही बरीच विविधता आहे. घराच्या रचनेत दिवसें दिवस झपाट्याने बदल होत असेल तरीही जगभर अनेक ठिकाणी बदललेल्या घराच्या नमुन्यावर देखील पुरातन नमुन्याची छाप पडल्याचे सहज लक्षात येते. आफ्रिकेतील कानो, नायजेरीयातून फिरताना जुनी मातीची घरे दिसतात. जगातील सर्व वस्त्यांची पारंपारिक

munotes.in

घरे, पारंपारिक सुधारिक, आधुनिक व प्रगत घरे इ. प्रकारे विभागणी करता येईल, उत्तर अमेरिकेतील घरे चौकोनी आयताकृती असतात. आफ्रिकेतील घरे गोल असतात. कमी पावसाच्या प्रदेशातील घरे सपाट छपरांची असतात. एकही मजला नसलेल्या घरांचे प्रमाण सगळ्यात जास्त असते. तरी एक व एकापेक्षा अधिक मजले असलेल्या घराची संख्या जगभर वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे व वाढत्या औद्योगिकरणामुळे वाढते आहे. एका कुटुंबाकरिता एक स्वतंत्र घर ही दिवसे दिवस चैनीची वस्तू होत आहे. त्यामुळे कॉलनी, सोसायट्या यांसारख्या हाऊसींग कॉम्प्लेक्समध्ये राहण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. अर्थात खेड्यांमध्ये अजूनही अशी प्रक्रिया तितकीशी वेगाने सुरू झालेली नाही.

**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण भागातील घरांवर पर्यावरण आणि तंत्रज्ञानाचा कसा परिणाम होते ते सांगा.

नागरी वस्तीची वाढ व नागरी वस्त्यांच्या विकास होण्यावर परिणाम करणारे घटक

नागरी वस्तीची / शहराची वाढ कोणत्या एका विशिष्ट घटकामुळे झाली हे सांगणे फारच कठीण आहे. कारण काही नागरी वस्तींची वाढ तेथील लोकसंख्येची वाढ झाल्यामुळे तर काही शहरांची वाढ कारखानदारीचा विकास व व्यापारातील वृद्धीमुळे झालेली असते. सर्वसामान्यपणे नागरी वस्तींची वाढ व विकास होण्यावर पुढील घटकांचा परिणाम होतो.

अ) भौगोलिक घटक

ब) सांस्कृतिक घटक

क) ऐतिहासिक घटक

ड) शासकीय व राजकीय घटक

**अ) भौगोलिक घटक :**

नागरी वस्ती केंद्राची वाढ व विकास हा प्रामुख्याने तेथील भौतिक परिस्थितींवर अवलंबून असतो. नगरे स्थापन होताना त्याच्या सभोवताली असणार्या साधन सामुग्रीचा त्याच्या विकासावर परिणाम होत असतो. भौतिक घटकांत पुढील घटकांचा समावेश होतो.

१) भूपृष्ठरचना

२) पाणीपुरवठा

३) हवामान

४) जमीन

५) खनिजसंपत्ती

६) स्थान व स्थिती

munotes.in

### १) भूपृष्ठरचना :

भुपृष्ठाचा प्रभाव, निवासस्थानास लागणारी जमीन, उद्योगधंदे, कारखाने, इमारती व वाहतुकीसाठी लागणारी जमीन ह्यावर होत असतो. त्यामुळे नागरी वस्तीचा विकास हा पर्वतीय प्रदेशापेक्षा मैदानी भागात जास्त होतो. मैदानी प्रदेशात सपाट भाग, मंद उतार असल्याने विस्तार विकासासाठी भरपूर वाव असतो. याच प्रदेशात वाहतूक मार्गही विकसीत होऊ शकतात. म्हणूनच या प्रदेशात नगराची वाढ व विकास जास्त होतो. उदा. कानपूर, मास्को, मिरज, जयपूर इ. पर्वतीय प्रदेशात शीघ्र उतार व दळणवळणाच्या अपुर्या सोई यामुळे नगराची वाढ व विकास होऊ शकत नाही. परंतु काही पर्वतीय प्रदेशात थंड हवामान असल्याने व आल्हाददायक असल्याने शहरांची वाढ झाली आहे.

### २) पाणीपुरवठा :

पाणी ही मानवाची मूलभूत अत्यावश्यक गरज आहे. म्हणून पाणीपुरवठ्याच्या साधनां शेजारीच मानवाची वस्ती निर्माण होते. अशा वस्तीचा जास्त विकास होतो. बहुतेक नागरी वस्तींचे स्थान नद्यांच्या, तलावांच्या, सरोवराच्या काठी / जवळपास आढळते. औद्योगिक नगरात कारखान्यांना भरपुर पाणी पुरवठ्याची आवश्यकता लागते. म्हणूनच नद्यांच्या किनार्यावर अनेक शहरांचा विकास झाला. उदा. इंग्लंडमध्ये थेम्स नदीवर लंडन, संयुक्त संस्थानात न्यूयॉर्क शहर, हडसन नदीच्या मुखावर, रशियात मॉस्को शहर व्होल्गा नदीवर, भारतात गंगा नदीच्या तीरावर कानपूर, बनारस, महाराष्ट्रात कृष्णा काठावर वाई, सांगली, कर्हाड यासारखी शहरे विकसीत झाली आहेत.

### ३) हवामान :

नागरी वस्तीच्या वाढीवर व विकासावर हवामानाचा बराच प्रभाव पडलेला दिसतो. अतीथंड व अतीउष्ण हवामान नगराच्या विकासाला प्रतिकूल असते. विषुववृत्तीय प्रदेशात उष्ण, दमट व रोगट हवामान असल्याने तसेच कायम दलदलीचे प्रदेश आढळत असल्याने नागरी विकासाला मर्यादित स्वरुपात वाव मिळतो. उष्ण वाळवंटी प्रदेशात वर्षभर तापमान जास्त असल्याने नगराच्या विकासात अडथळे निर्माण होतात. अतिशीत हवामानात शहरांचा विकास अत्यंत अल्प प्रमाणात झाला आहे. जगातील ६६ टक्के नागरी वस्त्या उष्ण व समशीतोष्ण कटिबंधात आढळतात.

### ४) जमीन :

ज्या प्रदेशात सुपीक जमीन आहे. अशा प्रदेशात शेतीची प्रगती जास्त होते. तेथे उत्पादनात भरपूर वाढ होते. आपोआपच दाट लोकवस्ती आढळते. शेतीवर आधारित कारखाने जेव्हा निर्माण होतात तेव्हा ग्रामीण वसाहतीचे रुपांतर शहरी वसाहतीत होते व त्या शहराचा विकास होत जातो. गंगा नदीचा त्रिभूज प्रदेश, इजिप्तमधील नाईल खोरे, चीनमधील यांगत्सेयांग नदीच्या खोर्यात कृषियोग्य उत्कृष्ट जमीन असल्याने अनेक शहरांची वाढ व विकास झाला आहे.

munotes.in

**५) खनिजसंपत्ती :**

खनिज संपत्तीचा परिणामही नागरी वस्तीच्या वाढीवर / विकासावर होतो. ज्या प्रदेशात खनिज संपत्ती सापडते. तेथे खनिज संपत्तीचे उत्पादन घेतले जाते. व त्यातून शहरांची निर्मिती होते. व कॅलिफोर्निया,ऑस्ट्रेलिया, उ. अमेरिका या प्रदेशात खनिज संपत्तीमुळे अनेक शहरांचा विकास झाला. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, पूर्व संयुक्त संस्थाने या देशात कोळसा सापडत असल्याने अनेक शहरांची निर्मिती कोळशामुळेच झाली आहे. अलिकडील काळात कुवेत, इराक, सौदी अरेबिया या वाळवंटी प्रदेशात खनिज तेल सापडते. त्यातूनच खनिज नागरी वस्त्यांमध्ये निर्मिती झालेली आढळते. खनिज संपत्तीचा अपुरा साठा असल्यास तो साठा अल्पावधीत संपुष्टात येतो व तेथील शहर निर्जन होते. याला भूत शहर (Ghost Town) असे म्हणतात.

**६) स्थान व स्थिती :**

नागरी वस्तीचा विकास प्रामुख्याने त्याच्या स्थानावर व स्थितीवर अवलंबून असतो. ज्या जागेवर शहरांची निर्मिती होते ते त्या शहराचे स्थान होय व त्याच्या सभोवतालच्या प्रदेश स्थिती होय. शहराचे स्थान हे नदीकाठावर / बेटावर असेल तर त्या शहराची वाढ अधिक होते. भारतात मुंबई, कलकत्ता व मद्रास यांचा विकास प्रामुख्याने त्यांच्या स्थानामुळे झाला आहे. नगरच्या सभोवतालच्या प्रदेश समृद्ध असेल तर त्यांचा परिणामही नगर विकासावर होत असतो.

**ब) सांस्कृतिक घटक :**

नैसर्गिक घटकाबरोबरच सांस्कृतिक / आर्थिक घटकांचा परिणामही नागरी वस्तीच्या वाढीवर किंवा विकासावर होतो. सांस्कृतिक घटकात पुढील घटकांचा समावेश होतो.

१) वाहतुकीच्या सोई

२) उद्योगधंदे

३) धार्मिक केंद्रे

४) शैक्षणिक केंद्रे

**१) वाहतुकीच्या सोई :**

वाहतुक सोईमुळे नागरी वस्तीचा खूपच विकास होतो. वाहतूक प्रकारात बदल होतो. त्या ठिकाणी तसेच दोन किंवा अधिक मार्ग एकत्रित येतात तेथे शहरांची निर्मिती झालेली आढळते. पर्वतीय व पठारी प्रदेशापेक्षा मैदानी प्रदेशात रस्ते, लोहमार्ग यांच्या सोईसाठी अनुकूल भौगोलिक परिस्थिती असल्यामुळे त्यांचा खूप विकास होतो आणि त्याबरोबरच नागरी वस्तीचा देखील विकास होतो. दोन किंवा अधिक व्यापारी मार्ग परस्परांना मिळतात तेथे शहरांची निर्मिती होते. भारतातील आग्रा, नागपूर, उ. अमेरिकेतील सेंटलुईस, शिकागो, युरोपमधील पॅरीस, बर्लिन ही यांची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

**२) उद्योगधंदे :**

उद्योगधंद्यांना आवश्यक असणारे घटक उपलब्ध असल्यास अशा ठिकाणी औद्योगिक केंद्राची निर्मिती होते व अशा केंद्रात अनेक उद्योग निर्माण झाल्याने लोकांना रोजगार उपलब्ध होतो. ग्रामीण भागातील लोकांचा लोढा या भागाकडे आकर्षिला जातो व नगराचा विकास होतो. भारतातील जमशेदपूर, बोकारो, मिलाई, दुर्गापूर, भद्रावती ही प्रमुख शहरे लोह-पोलाद केंद्रामुळे विकसीत झाली. अहमदाबाद, सोलापूर, नागपूर ही नगरे कापसावर चालणार्या कापड गिरण्यांमुळे उभारली गेली. मुंबई, कलकत्ता, मद्रास, बेंगलोर यासारख्या शहरात अनेक औद्योगिक कारखान्यांची निर्मिती झाल्यानेच शहर वसाहतीचा विकास झाला आहे. युरोपमधील प्रदेशात औद्योगिक कारणामुळे अनेक वस्त्यांची निर्मिती व वाढ झाली.

**३) धार्मिक केंद्रे :**

बरीच शहरे / नागरी वस्त्या धर्म भावना व्यक्त करण्यासाठी निर्माण होतात यालाच आपण धार्मिक केंद्रे असे म्हणतो. अशा धार्मिक स्थळाला सभोवतालचे लोक सतत भेटी देत असतात. भारतात अशा शहरांची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली आहे. काशी, हरिद्वार, पंढरपूर, शिर्डी, नाशिक यासारख्या शहरांचा विकास धार्मिक दृष्टीकोनातून झालेला आहे. काही धार्मिक केंद्राच्या ठिकाणी मोठमोठ्या यात्रा व कुंभेमेळे भरतात. त्यामुळे अशा केंन्द्राकडे दरवर्षी हजारो लोक आकर्षित होतात. येणार्या यात्रेकरुंच्या सोई करण्याच्या दृष्टीने अशा शहरांचा विकास अधिक प्रमाणात होतो. पाश्चिमात्य देशात अशा पवित्र शहरांना संडे हाऊस असे म्हणतात. त्याठिकाणी लोक प्रार्थनेसाठी एकत्रीत येतात. परगावाहून येणार्या लोकांच्या राहण्याच्या सुविधा, जेवणाची सोय इ. साठी इतर लोक येऊ लागतात आणि शहरांची निर्मिती होते. उदा. पोपचे वास्तव्य असलेले व्हेटीकन सिटी हे तिर्थक्षेत्र व अरबस्थान मधील मक्का हे मुस्लिम बांधवांचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे.

**४) शैक्षणिक केंद्रे :**

काही शहरी वस्त्यांना शैक्षणिक महत्व असल्याने त्यांची वाढ व विकास होतो. काही शहरात विश्वविद्यालये स्थापन झालेली आहेत. उदा. इंग्लंडमधील ऑक्सफर्ड, केंब्रिज, स्वीडनमध्ये लुंड व उपसाला भारतातील बनारस, शांतीनिकेतन, पुणे ही शैक्षणिक केंद्रे म्हणून प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी विश्वविद्यालयाच्या इमारती, महाविद्यालये, ग्रंथालये यांचा ठसा पहावयास मिळतो. विद्यार्थी व व्याख्याने यांच्या निवासासाठी हॉटेल्स, रेस्टॉरंट उभारली जातात  शहरी वस्त्यांचा विकास होतो.

**क) ऐतिहासिक घटक :**

काही घटक ऐतिहासिक महत्त्व असल्याने तेथे शहरी वस्तीची निर्मिती होते व शहरी वस्तीचा विकास होतो. पानीपत, या शहरी वस्तीचा विकास ऐतिहासिक दृष्टीकोनातून झालेला आहे. अहमदनगर, औरंगाबाद, सातारा, विजापूर, हैदराबाद या शहरांचा विकास होण्यास अनेक ऐतिहासिक घटना कारणीभूत ठरलेल्या आहेत.

munotes.in

**ड) राजकीय घटक :**

इतर घटकांप्रमाणे राजकीय घटकांचा परिणाम ही शहरी वस्तीच्या वाढीवर व विकासावर होतो. देशाच्या किंवा प्रदेशाच्या राजधानीचे ठिकाण असल्यास त्या देशात अनेक शासकीय कार्यालये उभारली जातात. आपोआपच अशा राजधानीच्या शहरांचा विकास होतो. दिल्ली, मुंबई, मॉस्को, टोकियो, लंडन यासारख्या शहराचा विकास होण्यास राज्यधान्यामुळेच झालेला आहे. काही ठिकाणला संरक्षणाच्यादृष्टीने खूपच महत्त्व असल्याने अशा शहरांचा विकास होतो. उदा. भारतातील मिरत ही वसाहत छावण्यामुळेच विकसीत झाली आहेत.

थोडक्यात शहरी वस्तीची वाढ व विकास होण्यास विविध घटकांचा परिणाम होत असतो. काही शहरी वस्तीच्या बाबतीत एखादे दुसरा घटक महत्त्वाचा असतो. तर काही शहराच्या बाबतीत अनेक घटकांचा संयुक्तरित्या परिणाम होत असतो.

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरी वस्तीच्या वाढीस कोणत्या घटकांचा हातभार लागतो ते सांगा.

## १.७ वस्ती भूगोलाचे महत्व

मानवाने त्यांच्या पर्यावरणाशी अनेक वर्षांपासून, जैविक आणि गैर-जैविक दृष्ट्या चांगले जुळवून घेतले आहे. तथापि, मानवांना जगण्यासाठी घटकांचा आश्रय आवश्यक आहे. बहुतेक वाळवंट जगण्याच्या सल्ल्यानुसार योग्य निवारा मिळवणे हा जंगलात यशस्वीपणे जगण्याचा सर्वात महत्त्वाचा भाग असतो. संपूर्ण इतिहासात, मानवाने स्वतःला आश्रय देण्याचे अनेक मार्ग दाखवले आहेत. प्राचीन गुहेतील निवासस्थान आणि तंबू, लॉग केबिन आणि किल्ल्यांपर्यंत, आज मानव वापरत असलेल्या निवासस्थानांची समृद्ध विविधता आहे.

मानवी वसाहती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणी मानवांनी ऐतिहासिकदृष्ट्या त्यांची घरे बांधली आहेत. मानवी वस्तीची व्याख्या म्हणजे विशिष्ट ठिकाणी मानवी वस्तीचा संघटित समूह. हे गट मानवी जीवनातील महत्त्वाच्या पैलूंवर लक्ष केंद्रित करतात, जसे की अर्थशास्त्र, वाहतूक, घरगुती राहणीमान, दळणवळण, मनोरंजन आणि शिक्षण. हा धडा आज जगभरात दिसणाऱ्या मानवी वसाहतींच्या सामान्य प्रकारांची चर्चा करतो आणि मानवी वसाहतींच्या कार्याविषयी माहिती प्रदान करतो, तसेच सेटलमेंटच्या प्रत्येक स्वरूपाशी संबंधित आव्हानांची माहिती समाविष्ट करतो.

**तुमची प्रगती तपासा :**

१. वस्ती भूगोलाचे महत्व सांगा

❖❖❖❖

munotes.in

# २

# ग्रामीण वस्ती भूगोल

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ ग्रामीण वस्त्यांचे प्रकार

२.३ ग्रामीण वस्तीच्या स्थानानुसार प्रकार

२.४ ग्रामीण वस्तीच्या स्थैर्यानुसार प्रकार

२.५ ग्रामीण वस्तीचे आकारानुसार प्रकार

२.६ ग्रामीण वस्त्यांचे घरांच्या अंतरावरुन प्रकार

२.७ ग्रामीण वस्तीचे स्वरुपानुसार प्रकार

२.८ ग्रामीण वस्तीचे कार्यानुसार प्रकार

२.९ भारतातील ग्रामीण वस्ती

२.१० स्वाध्याय

## २.० उद्दिष्टे

- ग्रामीण वस्त्यांचे प्रकार समजून घेणे
- ग्रामीण वस्त्यांच्या प्रकारांची माहिती मिळवणे.
- भारतातील ग्रामीण वस्त्यांमधील विविधता अभ्यासणे.

## २.१ प्रस्तावना

मानवी वसाहतीच्या विकासात वसाहतीचे स्थान व स्थिती या दोन घटकांना अनन्यसाधारण महत्व आहे. स्थान हे ती वसाहत ज्या ठिकाणी स्थापन झाली आहे. त्या भूमीशी निगडीत असेल तर स्थिती ही वसाहतीच्या सभोवतालच्या विस्तृत प्रदेशांतील प्राकृतिक, सांस्कृतिक पर्यावरणाशी निगडीत असते. संरक्षणाच्या दृष्टीने एखाद्या टेकडीवर, उदा. प्रतापगड, सिंहगड, रायगड, विशालगड, वसाहती स्थापन होतात. यामध्ये स्थानाला अधिक महत्व असते. तर संरक्षणाशिवाय उपजिवकेची साधन , इतर सेवा सुविधा या

munotes.in

दृष्टीकोनातून पर्वतीय पठारी, मैदानी प्रदेशात किंवा किनार्यावरील वसाहती यामध्ये स्थितीला अधिक प्राधान्य दिले जाते. म्हणजे वसाहतीचे स्थान व स्थिती या निरपेक्ष व सापेक्ष अर्थाने वापरण्यात येणाऱ्या संज्ञा असून त्यांना मानवी भूगोलामध्ये वसाहतीच्या दृष्टीने अधिक महत्त्व दिले जाते.

मानवी वासाहतीचे स्थान हे नैसर्गिक किंवा सांस्कृतिक परिस्थितीच्या विशिष्ट घटकांशी म्हणजे उपलब्ध भूमी, पाणीपुरवठा, नैसर्गिक साधनसंपत्ती या घटकांशी संबंधित असते. मैदानी अथवा डोंगराळ भागातील वसाहती या वसाहतीची स्थिती वर्णन करतात. परंतु त्यांचे अचूक स्थान वेगळे असू शकते. उदा. डोंगर माथ्यावरील, डोंगर उतारावरील, डोंगर पायथ्याच्या वसाहती, खिंडीतील वसाहती, खोर्यातील वसाहती, दोन नद्यांच्या संगमावरील वसाहती,नदीच्या मध्यभागातील अथवा धनुष्याकृती सरोवराच्या बाजूच्या वसाहती या वसाहतीचे स्थान वर्णन करतात. मानवी वसाहतीची निर्मिती व विकास हा अनेक सामुहिक घटकाचा परिणाम म्हणून उदयास येतात.

## २.२ ग्रामीण वस्त्यांचे प्रकार

उदरनिर्वाहासाठी मानव सतत धडपडत असतो. उदरनिर्वाहाचे निश्चित साधन मानवाला जोपर्यत साध्य झाले नव्हते. तोपर्यंत मानवाची अखंड भ्रमंती चालू होती. कंदमुळे फळे व निसर्गातील इतर उपलब्ध वस्तूंवर त्याची गुजराण चालू होती. जीवनावश्यक अशा मुलभूत गरजा भागविण्यासाठीच मानवाची धडपड चालू होती. सतत प्रयत्नशील अशा मानवाला हळूहळू उदनिर्वाहाची साधने गवसल्यावर त्याच्या आयुष्यात एक प्रकारची स्थिरता आली. त्याचे प्रत्यंतर निरनिराळ्या युगातील मानवाच्या आर्थिक क्रियाच्या स्वरूपावरून येते. आद्यपाषण युगात निसर्गातील खाद्य वस्तुचा संग्रह करून जीवन निर्वाह करण्याची मानवाची पध्दती होती. नवपाषाण युगात पशुपालन व वनस्पतीची लागवड या प्रकारांना सुरूवात झाली तर नंतरच विविध धातूंच्या युगामध्ये अनेक उद्योगधंदे अस्तित्वात आले. थोडक्यात मानवाची जसजशी प्रगती होऊ लागली व प्रगत तंत्राचे कसब त्याला जसजसे अवगत होऊ लागले. तसतसे त्याचे उदरनिर्वाहाचे साधन निश्चित होऊ लागले व शेती व पशुपालन या आर्थिक क्रियांनी मानवाची सतत चालू असलेली भ्रमंती संपुष्टात आणली. नांगराचा शोध लावून शेती या उदरनिर्वाहाच्या साधनात क्रांतिकारक बदल घडून आले. जमिनीची नांगराच्या मदतीने मशागत करून शेती  उत्पादनात वाढ होऊ लागली. इतकेच नव्हे तर शेतीच्या अतिरिक्त  उत्पादनाचा साठा करून नंतर त्याचा वापर करणे शक्य  झाल्याने भटक्या समाजाचे पाय एके ठिकाणी स्थिर झाले व मानवी संस्कृतीच्या विकासाची बीजे रोवली गेली. प्राचीन देशातील संस्कृतीच्या विकासाचा इतिहास  असाच आहे.

मानवी संस्कृतीच्या विकासातील खेडे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. मानवाच्या भटक्या व अस्थिर अशा जीवनाला पूर्णविराम मिळून मानवाच्या भटक्या व अस्थिर अशा जीवनाला पूर्णविराम मिळून मानवाच्या स्थिर जीवनाची सुरूवात होऊन खेड्यांचा उदय झाला. निश्चित अशा भूप्रदेशावर वस्ती करून मानव राहू लागला व आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती व इतर व्यवसाय करू लागला स्थिर समाज व शेतीव्यवसाय याचे निदशर्क म्हणजे खेडे होय. अर्थातच त्या त्या भूप्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीप्रमाणे खेड्याच्या रचनेत जाणीवपुर्वक योग्य ते बदल केलले दिसतात.

जगाच्या भूभागावर जरी वेगवेगळी खेडी दिसून आली तरी सुध्दा या खेड्यांमध्ये समानता फार क्वचित आढळून येते. भौतिक पर्यावरणाप्रमाणे प्रत्येक खेड्याचा आकार, वस्ती, जीवनपध्दती, सामाजिक जीवन वेगवेगळे असते. प्रत्येक खेड्यातील लोकांचा जीवनविषयक दृष्टीकोण, धर्माची कल्पना, रूढी, शासनपध्दती यामध्ये वेगळेपण आढळून येते. त्याच बरोबर खेड्याची भौतिक रचनाही वेगळी असल्याचे दिसून येते.

आद्य पाषाण युगात अन्न संकलन करून म्हणजेच शिकार, मासेमारी, कंदमुळे, फळे गोळा करून जगणाऱ्या आदिम मानवाला नवपाषण युगात पशुपालन व शेतीचा शोध लागला. या शोधांचा जगभर प्रसार होवून ग्रामीण वस्त्या विकसित झाल्या. अशा ग्रामीण वस्त्यांचा आकार लहान असतो. त्यांचे नैसर्गिक पर्यावरण वेगवेगळे आढळते. उदा. किनारपट्टीतील ग्रामीण वस्त्यांचे पर्यावरण, वाळवंटातील वस्त्यांचे पर्यावरण, मैदानी प्रदेशातील वस्त्यांचे पर्यावरण तसेच पर्वतीय प्रदेशातील वस्त्यांमधील असणारे पर्यावरण यामध्ये भिन्नता अढळते. ग्रामीण वस्तीमध्ये आर्थिक , राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक जीवनात भिन्नता आढळते. ग्रामीण वस्तीचे वर्गीकरण वेगवेळ्या निकषांच्या आधारे केलेले आहे. ते निकष पुढीलप्रमाणे-

**स्थानानुसार -** १) ओलीत /आर्द्र स्थान  २) शुष्क स्थान

**रचनेनुसार -** १) रेषीय  २) गोलाकार  ३) चौकोनी  ४) पंखाकृती

५) जाळीकृती  ६) ताराकृती  ७) बाणाकृती

**आकारानुसार -** १) वाडी  २) लहान खेडे  ३) मोठे खेडे

**कार्यानुसार -** १) शेती  २) मासेमारी  ३) खाणकाम  ४)लाकूडतोड

५) धार्मीक  ६) ग्रामोद्योग  ७) हस्तकलाप्रधान

**लोकसंख्येनुसार -** १) कृषिपुरा  २) ग्रामराज  ३) महाग्राम  ४) खेटकास

**स्थैर्यानुसार -** १) अस्थायी वसाहत  २) अंशतःस्थायी वसाहत

३) पूर्णतः स्थायी वसाहत

**अंतरानुसार -** १) केंद्रिय  २) विखुरलेली  ३) पुंजकेदार

**जमीन मालकीच्या स्वरूपानुसार-**

१) जमीनदार वसाहत  २) रयतवारी वसाहत  ३) सहकारी वसाहत.

**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण वस्त्याचे वर्गीकरण द्या.


munotes.in

## २.३ ग्रामीण वस्तीच्या स्थानानुसार प्रकार

### १) ओलीत / आर्द्र स्थान -


असा वस्त्या पाणीपुरठ्याच्या शेजारी विकसित होतात. म्हणजेच अशा वसाहतींच्या आजुबाजुच्या भागात पाणीपुरवठा असतो व तेथिल कोरड्या जागेत अशा वसाहती स्थापन होतात. उदा. झर्याच्या शेजारी किंवा वाळवंटात ऑअसिस च्या शेजारी असणाऱ्या वस्त्या. जिथे पाण्याचा तुटवडा असतो अशा ठिकाणी पाणी आढळल्यास त्या पाण्याच्या सभोवताली लोक वस्त्या करतात. नदीच्या काठावरील वस्त्या सुध्दा ओलीत वस्त्याच असतात.

याप्रकारच्या वस्त्या कायमस्वरूपी एकाच जाग्यावर स्थिर असल्या तरीही काही वेळा त्यांचे स्वरूप अस्थायी देखिल असते. उदा. वाळवंटातील वस्त्या पाण्याच्या स्त्रोताबरोबर स्थलांतरीत होतात.




### २) शुष्क स्थान -

अशा वस्त्या ओलीत वस्त्यांच्या अगदी विरूध्द स्थापन झालेल्या आढळतात. जिथे पाणथळ जागा किंवा दलदलीची जागा असते तेथिल कोरड्या जागेत शुष्क वस्त्या विकसित होतात. पूर परिस्थिती निर्माण होणाऱ्या प्रदेशातही कोरड्या जागेत अशा वस्त्यांची निर्मिती झालेली आढळते.



munotes.in

**तुमची प्रगती तपासा :**

१) आर्द्रस्थान व शुष्कस्थान वस्त्यांमधील फरक सांगा.

## २.४ ग्रामीण वस्तीच्या स्थैर्यानुसार प्रकार

भटक्या जीवनापासून ते वसाहतीच्या स्थिर जीवनातील झालेल्या विविध स्थित्यंतराच्या प्रकारावरून वसाहतींचे तीन प्रकार पडतात.

### १) अस्थायी वसाहत -

या वसाहतीत लोक कायम वस्ती करून राहत नाहीत. ते फार थोड्या काळापर्यंत एकाच जागी वस्ती करून राहतात. त्यांचे एके ठिकाणी वस्ती करून राहणे हे त्याना मिळणाऱ्या खाद्य संकलनावरच अवलंबून असते. पाषाण युगामध्ये मानवाचे खाद्य संकलन हेच उपजिविकेचे प्रमुख साधन होते. पाने कंदमुळे व फळे या वनस्पतीजन्य पदार्थाचा साठा संपुष्टात आल्याबरोबर ही खेडी उठवत असत व ज्या ठिकाणी या खाद्य संकलनाचा साठा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी स्थानांतर करत. जगाच्या भूभागावर आढळून येणारे आदिम लोक आजसुध्दा अशा भटक्या अवस्थेत आढळून येतात. दक्षिण भारतातील कादर, मलपतरम्, पनियम, येनाडी मध्यप्रदेशातील बैगा, ओरिसातील जुआंग, बिहारमधील खडिया इ. वस्त्या ह्या अस्थायी वस्त्यांची उत्तम उदाहरणे आहेत.

### २) अंशतः स्थायी वसाहत :

या वसाहतीमध्ये लोक काही वर्षेच वस्ती करून राहतात. याचे एक प्रमुख कारण शेती व पशुपालन ही त्यांची उदरनिर्वाहाची साधने आहेत. त्यामुळेच यांच्या जीवनाला वास्तव्याच्या दृष्टीकोणातून थोडीफार स्थिरता आलेली असते. त्यांना मिळालेली स्थिरता ही दीर्घकालीन किंवा स्थायी स्वरूपाची नसते. याचे कारण म्हणजे शेती करण्याची पध्दती ही पूर्णतः अवैज्ञानिक असल्याने त्यातून येणारे उत्पन्नही तोकडे असते. स्थानांतरीत शेती हा प्रकार विशेषतः मागासलेल्या जातीत करताना आढळतात. या प्रकारात डोंगरावर जाऊन झाडे तोडली जातात. तोडलेल्या झाडाच्या फांद्या पाने व ओंडके डोंगरांच्या उतारावर आणून कडक उन्हात वाळवली जातात. पावसाळ्यातील जोरावर पावसाच्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाळलेल्या फांद्या , पाने, ओंडके इ. वाहत वाहत सपाट प्रदेशात येऊन स्थिर होतात. त्यानंतर वाळलेल्या ओंडक्यांना, फांद्याना आग लावली जाते व त्यातून तयार होणारी राख तेथे पसरली जाते. व याच राखेमध्ये बिया फेकल्या जातात. किंवा टोकदार काठीने राखेत भोके पाडून त्यात टाकल्या जातात. या पध्दतीने येणारे पीक अत्यंत थोडे व हलक्या प्रतीचे असते. शिवाय रान नांगरल्याने व खतपाणी न दिल्याने रानाची सुपिकताही टिकून राहत नाही. याला काही ठिकाणी सूम शेती, मरहन शेती, झूम शेती असे म्हणतात. आदिवासी लोकांच्यात अशा तर्हेची स्थानांतरीत शेती आढळून येते. जमिनीच्या पोटात शस्त्र खुपसावयाचे नाही या धार्मिक भावनेने जमीन नांगरली जात नाही. साहजिकच अशा पध्दतीच्या शेतीतून जोपर्यत धान्य उत्पादित होऊ शकते. तोपर्यतच हे लोक त्याठिकाणी वास्तव्य करून राहतात. नंतर मात्र अशाच तर्हेची शेती करण्यासाठी व वास्तव्यासाठी दुसरी जागा निवडतात परिणामतः अंशतः स्थायी खेडी अस्तित्वात येतात.

munotes.in

**३) पूर्णतः स्थायी वसाहत :**

या वसाहतीमध्ये लोक पिढ्यानपिढ्या एकाच ठिकाणी वस्ती करून राहतात. या ठिकाणच्या लोकांचे वास्तव्य हे कायम स्वरूपाचे असते. त्यांची शेती करण्याची पध्दती विकसनशील असते. शेजारच्या खेड्याबरोबर त्याचे सामाजिक संबंध प्रस्थापित झालेले असतात. वसाहतींचा कारभार पाहण्यासाठी वसाहतीची स्वतंत्र अशी स्थायिक यंत्रणाही असते. वसाहतीची रचना जरी भिन्न असली तरीसुध्दा वसाहतीतील लोकांचे वास्तव्य मात्र स्थायी स्वरूपाचे असते. अशा तर्हेच्या वसाहती भारत, अमेरिका, इंग्लंड व जर्मनी या राष्ट्रांत आढळून येतात. या वसाहतीतील लोकसंख्या सारखीच असते असे नाही उलट लोकसंख्येच्या बाबतीत भिन्नता आढळून येते. भारतामध्ये काही स्थायी वसाहतीत फारच थोडी घरे असतात. तर काही वसाहतीमध्ये १०,००० पर्यंत लोकसंख्या असते.

**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण वस्तीचे स्थैर्यानुसार प्रकार सांगा.

## २.५ ग्रामीण वस्तीचे आकारानुसार प्रकार

ग्रामीण वस्तीचा आकार सारखा नसतो. काही वस्त्या मोठ्या असतात किंवा काही आकाराने लहान असतात. या आधारावर ग्रामीण वस्तीचे तीन प्रकार पडतात.

**१) वाडी -**

मुख्य वसाहतीलगत शेतकर्यांची शेतजमिनीवर लहान वस्ती तयार होते. एकाच भावकीतले किंवा लागून जमीन असलेल्या लोकांची वस्ती हळूहळू गावाचे स्वरूप धारण करते. आणि त्यानंतर ते गाव वेगळेच गाव म्हणून ओळखले जावू लागते. शेजारील मुख्य वसाहतीवरच ही वाडी अवलंबुन असते. या वाडीला स्वतःचे मध्यवर्ती स्थान किंवा गावठाण असत नाही.

**२) लहान ग्रामीण वस्ती (लहान खेडे)-**

लहान खेडे वस्ती काही झोपड्या किंवा घरांची असते. गावाच्या मानाने ही वस्ती अतिशय छोटी असते. येथे बहुधा एकाच जातीचे आणि नात्याचे लोक राहतात. कधी कधी एकाच कुटुंबाचे लोक राहतात. मोठ्या खेड्यांच्या मानाने येथे काहीच सोयी नसतात. परंतु कृषीगृहापेक्षा थोड्या फार सोयी असतात. संयुक्त संस्थानात कृषीक्षेत्रात शेतकर्यांची अनेक कुटुंबे अशा वस्तीत राहतात. या वस्तीलाच लहान खेडे असे म्हणतात. अशा लहान खेडे वस्तीचा कोणताही क्रम नसतो. तसेच गल्या वगैरे काहीच नसतात.

**३) मोठी ग्रामीण वस्ती (मोठे खेडे) -**

छोट्या ग्रामीण वस्तीतूनच नंतर मोठ्या खेडे वस्तीचा विकास होत जातो. खेड्यात बहुधा शेतकरी राहतात. अशा वस्तीत व्यापार आणि इतर लहान - सहान व्यवसायही चालतात. येथे लोहार, सुतार, कुंभार, न्हावी धोबी इत्यादी जातीचे लोकही राहतात. लोहार, सुतार इ. लोक शेतकर्यांना लागणारी अवजारे तयार करतात. मोठी ग्रामीण वस्ती ही मैदानात नद्यांच्या खोर्यात तसेच पठारी प्रदेशात आढळते. या वस्तीचा विशिष्ट असा क्रम असतोच.

munotes.in

या वस्तीत गल्या असतात. शिवाय दुकाने, पोस्ट ऑफिस इ. सोयी असतात. या वस्तीतील घरे लहान मोठी दूर दूर किंवा जवळजवळ असतात.

**ग्रामीण वस्तीच्या लोकसंख्येनुसार प्रकार :**

**१) कृषिपुरा -** ज्या ग्रामीण वस्तीची लोकसंख्या ३००० व त्यापेक्षा अधिक असेल अशा ग्रामीण वसाहतींना कृषिपुरा असे म्हणतात.

**२) ग्रामराज -** ज्या ग्रामीण वसाहतीची लोकसंख्या २००० ते ३००० पर्यंत असते त्या वसाहतींना ग्रामराज असे म्हणतात.

**३) महाग्राम -** ज्या ग्रामीण वसाहतींची लोकसंख्या १००० ते २००० असते अशा ग्रामीण वसाहतींना महाग्राम म्हटले जाते.

**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण वस्तीचे आकारानुसार प्रकार सांगा.

## २.६ ग्रामीण वस्त्यांचे घरांच्या अंतरावरून प्रकार

१) विखुरलेली किंवा पसरलेली वस्ती

२) दाट किंवा जवळजवळ घरे असलेली वस्ती

३) पुंजकेदार किंवा चिकटलेली वस्ती

**१) विखुरलेली किंवा पसरलेली वस्ती :** विखुरलेल्या वस्तीत घरे दूर दूर आणि कमी असतात. एकाकी घर हे या वस्तीचा महत्वाचा गुणधर्म आहे. याप्रकारची वस्ती पर्वतीय भागात. पठारावर, जेथे पूराचा त्रास होतो. जंगलात आणि वाळवंटी भागात असते. ही प्राचीन वस्तीची उदाहरणे आहेत. उदा. ब्रझील, द आफ्रिका आणि भारतातील आसाम, बंगाल, बिहार, काश्मिर, राजस्थान परंतु काही सुधारलेल्या देशातही या प्रकारची विखुरलेली वस्ती आढळते. या वस्तीत घरे दूरदूर असल्याने हवेशीर असतात. विखुरलेली वस्तीत प्रत्येक कुटुंबाची घरे एकमेकांपासून अलिप्त असतात. या वस्तीतील घर कृषिस्थान किंवा कृषिगृह असू शकते.



munotes.in

**विखुरलेल्या वस्तीची कारणे :**

विखुरलेल्या वस्तीची कारणे निरनिराळ्या भागात निरनिराळी आहेत. मागासलेल्या प्रदेशात या वस्तीमागे निरनिराळे व्यवसाय कारणीभूत आहेत. उदा. मासे पकडणारे कोळी लोक मासेमारीच्या उद्देशाने दूर दूर घरे बांधून राहतात. लाकूड तोडे लोक लाकूड तोडण्याच्या हेतूने जंगलात दूर दूर घरे बांधून राहतात. परंतु संयुक्त संस्थाने, कॅनडा, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया इ. विकसीत देशात अशा वस्तीमागील कारणे वेगळी आहेत. तसेच ती पक्या रस्त्याने जोडलेली असतात. त्या अशाप्रकारे विखुरलेल्या वस्तीची कारणे वेगवेगळी असली तरी ओबडधोबड व विखंडीत भुपृष्ठ हे या वस्तीमागचे प्रमुख कारण आहे.

**विखुरलेल्या वस्तीचे गुणः-**

१) मनुष्य आपल्या व्यवसायाच्या क्षेत्राजवळ राहात असल्याने त्याला आपली कामे जास्त वेळ राहून करता येतात. उदा. मासेमारी करणारे व लाकूडतोड करणारे लोक तेथेच राहत असल्यास जास्त वेळ आपली कामे करू शकतात.

२) मनुष्य शेतात राहू लागल्याने त्याच्या वेळेत आणि पैशात बचत होते.

३) तो आपल्या शेतीत अधिक लक्ष घालून तिची जास्तीत जास्त प्रगती करू शकतो.

४) घरातील सर्व लोक शेतात राहात असल्याने प्रत्येकाची शेताच्या कामात मदत होऊ शकते.

५) तसेच मनुष्य गावातील राजकारण, भांडणे इ. पासून मुक्त होतो.

६) या वस्तीत घरे दूर दूर असल्याने आरोग्याच्या दृष्टीने ही वस्ती उत्तम असते.

**विखुरलेल्या वस्तीचे दोष :**


१) मनुष्य जेव्हा शेतात घर बांधून राहतो तेव्हा त्याचा गावातील लोकांशी संपर्क तुटतो. त्यामुळे सामाजिक जीवन विस्कळीत होते.

२) विखुरलेल्या वस्तीत घरे एकाकी असल्याने संरक्षणाच्या दृष्टीने ही वस्ती चांगली नसते.

२) दाट किंवा जवळजवळ घरे असलेली वस्तीः-

दाट वस्तीत घरे जवळ जवळ व संख्येने जास्त असतात. या वस्तीस निरनिराळ्या शास्त्रज्ञांनी निरनिराळी नावे दिली आहेत. उदा. फिंच त्रिवार्थाने घरे जवळ जवळ असलेल्या वस्तीस दाट वस्ती असे नाव दिले आहे. ब्रुन्सने यास केंद्रीत वस्ती असे संबोधले आहे.

या वस्तीत एक किंवा अनेक जातीचे लोक राहतात. हे लोक सामाजिक, धार्मिक व आर्थिक हेतूने एकत्र आलेले असतात. या वस्तीतील गल्या फारच अरूंद असतात आणि घरे अगदी एकमेकांस लागून असतात. दाट वस्तीत अधून मधून थोडी जागा असते व त्या भागात वस्ती होऊन वस्तीचे क्षेत्र वाढत जाते. अशा वस्तीत प्रत्येक भागाचा एक वेगळा इतिहास असतो. अशी वस्ती नायजेरिया, ऑस्ट्रेलिया आणि भारतातील उत्तर प्रदेशात आढळते.



विखुरलेली वस्ती केंद्रित वस्ती

**दाट वस्तीची कारणे :**

दाट वस्तीची विविध कारणे आहेत. योग्य भूपृष्ठ, अनुकूल हवामान, कृषीयोग्य जमीन, मुबलक पाणी पुरवठा, खनिजांचे उत्खनन, व्यापार उपजिविकेची अन्य साधने दळणवळण इ. या वस्तीच्या मागील मुख्य कारणे आहेत. याशिवाय संरक्षण, आरोग्य शिक्षण, सामाजिक व धार्मिक ही या वस्तीची इतर कारणे असू शकतात.

**दाट वस्तीचे गुण :**

१) संरक्षणाच्या दृष्टीने ही वस्ती चांगली असते. कारण घरे एकमेकांस लागून असल्याने संकटाच्यावेळी लोक एक दुसर्याच्या मदतीस धावून जातात.

२) अशा वस्तीत सामाजिक जीवन चांगले असते.

**दाट वस्तीचे दोष :**

१) या वस्तीत घरे एकमेकांस लागून असल्याने हवा खेळती राहत नाही. तसेच सूर्यप्रकाश मिळत नाही. त्यामुळे या वस्तीत रोग उद्भवतात.

२) अशा वस्तीत शुल्क कारणाने नेहमी भांडणे होतात.

३) पुंजकेदार वस्ती किंवा चिकटलेली वस्ती :

या प्रकारची वस्ती सर्वच भागात आढळत नाही ज्या भागात पाण्याची टंचाई असते अशा भागात पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी या वस्तीचा विकास होतो. मानवाr जीवनात पाण्याला अतिशय महत्व असल्यामुळे त्या पाण्याभोवती अशी वस्ती स्थापन होते. या वस्तीत घरे अतिशय जवळ जवळ व एकमेकांस लागून असतात. त्यामुळे ही वस्ती पुंजक्याप्रमाणे किंवा मधमाश्या पोवळ्यास चिकटतात त्याप्रमाणे या वस्तीतील घरे त्या पाण्याभोवती चिकटलेली दिसतात. व्हिडल-डी-ला ब्लाश या शास्त्रज्ञाने या वस्तीला पुंजकेदार वस्ती किंवा चिकटलेली वस्ती असे म्हटले आहे. राजस्थान मध्ये अशी वस्ती आढळते. या वस्तीत दुकाने, शाळा, देवालये इ. गोष्टी असतात.



**पुंजकेदार वस्तीची कारणे :**

पाणीपुरवठा, संरक्षण, आणि इतर सोयी ही या वस्तीची प्रमुख कारणे आहेत.

**गुण -**

१) संरक्षणाच्या दृष्टीने ही वस्ती चांगली असते.

२) या वस्तीत सामाजिक जीवन चांगले असते.

**दोष :**

१) आरोग्याच्या दृष्टीने ही वस्ती चांगली नसते.

२) क्षुल्लक कारणाने या वस्तीत नेहमी भांडणे होतात.

**तुमची प्रगती तपासा :**

१) विखुरलेल्या व पुंजकेदार वस्त्यांमधील फरक स्पष्ट करा व त्यांचे गुण दोष सांगा.

## २.७ ग्रामीण वस्तीचे स्वरूपानुसार प्रकार

भौगोलिक परिस्थितीचा ग्रामीण वस्तीवर मोठा प्रभाव पडतो. विशेषतः भूपृष्ठ, जमीन, हवामान, नद्या, समुद्र किनारे यांचा ग्रामीण वस्तीच्या आकारावर परिणाम होतो. रस्ते, कालवे इ. सांस्कृतिक घटकांचाही मानवी वस्तीवर परिणाम होतो. त्यामुळे प्रत्येक भागात ग्रामीण वस्तीचे स्वरूप सारखे आढळत नाही. या आधारावर ग्रामीण वस्तीचे पुढील प्रकार पडतात.

**१) रेषाकृती वस्ती :**


ही वस्ती मुख्यतः रस्त्याच्या दोन्ही बाजूस नदीच्या काठावर समुद्राच्या किनार्यावर किंवा पर्वताच्या पायथ्याशी आढळते. या पध्दतीत घरे एक रेषेत बांधलेली असतात. घराच्या दोन्ही बाजूस दुकाने असतात.

**१) घरे बहुधा एका रांगेत असतात.**

२) रस्त्याच्या बाजूस दुकाने असतात.

३) घरांची दारे एकाच दिशेला पण एकमेकांच्या समोरासमोर असतात.

४) या वस्तीचा विस्तार रस्त्याच्या दिशेने होतो.




**२) तारासदृश्य किंवा त्रिज्याकार वस्ती :**

ज्या ठिकाणी अनेक रस्ते येऊन मिळतात तेथे अशा प्रकारची वस्ती आढळते. हे रस्ते शेतीतील माल बाजारपेठेत पाठविण्याकरिता बांधण्यात आलेले असतात. त्यामुळे या ठिकाणी वस्ती होते. या वस्तीत सर्व रस्त्यांच्या बाजूने घरे बांधण्यात येतात.

- या वस्तीचा आकार तार्याप्रमाणे असतो.


- या वस्तीत घरे रस्त्याबरोबरच तयार होतात.

- या वस्तीतील मधल्या गल्या एकमेकांस समांतर असतात.

८) जेथे रस्ते येऊन मिळतात येथे दुकाने व उपहारगृहे असतात. कारण येणाऱ्या जाणाऱ्याना ही सोयीस्कर जागा असते.

**३) बाणाकृती वस्ती :**

ही वस्ती समुद्रात घुसलेल्या लांब अशा उंच भागात असते. समुद्र किनार्याचा असा भाग मासेमारी, व्यापारी, नौकानयन इ. करिता सोयीचा असतो म्हणून अशा ठिकाणी लोक वस्ती करून राहतात. उंचावरून या वस्तीकडे पाहिल्यास त्याचा आकार बाणाप्रमाणे दिसतो.




१) ही वस्ती जेथे होते तेथे समुद्राकडे जमिनीचा भाग निमुळता असल्याने समुद्राकडे घर लहान / कमी असतात. आणि जमिनीकडे ती विस्तृत जास्त असतात.

२) मागील बाजूस अंतर्गत भागाकडे वाहतुकीच्या सोयी असतात. त्या भागात शेती होते.

३) अशा ग्रामीण वस्तीचे काही काळानंतर शहरी विभागात रूपांतर होते.

**४) गोलाकार वस्ती :**

या पध्दतीस घरे सरोवराभोवती किंवा भव्य ठिकाणी वर्तुळाप्रमाणे गोल बांधलेली असतात. संरक्षण किंवा भव्य सोयीच्या दृष्टीने अशाप्रकारची घरे बांधलेली असतात. आफ्रिकेतील मसाई जमातीची वस्ती अशाप्रकारची असते. यास क्राल म्हणतात. मसाई लोक पशुपालनाचा व्यवसाय करतात. आपल्या गुरांचे जंगली प्राण्यापासून संरक्षण व्हावे म्हणून त्यांना मध्यभागी ठेवतात व त्याच्या आजूबाजुस घरे बांधून राहतात. इस्त्राईल मध्येही अशी वस्ती आढळते.





१) या वस्तीत घरांची तोंडे मध्यमागाकडे असतात.

२) घरांना एकच दार असते.

५) चौकोनी वस्ती :

ही वस्ती अशा भागात आढळते की जेथे वावटळ व धुळीपासून त्रास होतो. आणि चोरांपासून उपद्रव होतो. इजिप्त मध्ये अशी वस्ती आढळते.



munotes.in

१) वस्तीच्या चारही बाजूने तटबंदी असते. यामुळे वादळ, धूळ व चोरांपासून संरक्षण होते.

२) ही वस्ती एका प्राचीन किल्याप्रमाणे दिसते.

३) ही वस्ती उंच ठिकाणी असते त्यामुळे दुरून ती दृष्टीस पडते.

४) या वस्तीतील गल्ल्या एकमेकांस समांतर असतात. आणि एकमेकांस काटकोनात छेदतात.

५) या वस्तीची काही दिवसानंतर व्यापाराच्या दृष्टीने प्रगती होते. कारण या वस्तीत पैसा, माल इ. वस्तू सुरक्षित ठेवता येतात. उदा. जयसिंगपूर

**६) पंखाकृती वस्ती :**


एखाद्या प्रदेशात वाहणारी नदी असेल तर त्या नदीच्या अर्धवर्तुळाकृती काठावर वसलेल्या गावातील रस्ते जर त्या नदीपर्यंत येवून मिळत असतील तर अशा प्रकारची पंख्याच्या आकाराची वस्ती तयार होते. किंवा एखाद्या मध्यवर्ती ठिकाणापासून रस्ते बाहेर पडत असतील तरीही त्या वस्तीचे प्रारूप पंख्याच्या आकारांचे तयार होते.



**७) जाळीसदृश्य वस्ती :**

जेव्हा एखाद्या प्रदेशात केंद्रभागी एखादे मंदिर चावडी किंवा गांवातील मुख्य ठिकाण असल्यास तेथून गावाच्या सीमेपर्यंत चारही बाजूला जाणारे मार्ग तयार होतात व या मार्गाच्या दिशेत वसाहत विस्तारत जाते. हळू हळू एका वस्तीतून दुसऱ्या वस्तीपर्यंत जाणारे

मार्ग विकसीत होत जातात. व तिथेही वस्त्या तयार होतात. या वस्तीचा आकार कोळ्याने विणलेल्या जाळ्यासारखा दिसतो. अशा तर्हेने जाळी सदृश वसाहत तयार होते.



**८) पायऱ्यांची वस्ती :**

ही वस्ती मुख्यत पर्वतीय भागात आढळते. या भागात सपाट जमिनीचा अभाव असल्याने तेथे शिड्या तयार करून शेती केली जाते व त्यालगतच वसाहत निर्माण होते.


१) या पध्दतीत उतारावर पायर्याप्रमाणे जागा करून घरे बांधतात. वस्तीचा विकास वरच्या बाजूस होतो.

२) या वस्तीत घर व शेती दरम्यान लहान लहान वेडेवाकडे रस्ते व पाऊलवाटा असतात.

३) ही वस्ती पायऱ्यावर होत असल्याने घरांच्या अनेक रांगा असतात.

४) ही घरे मुख्यतः लाकूड, गवत व दगडापासून बनविलेली असतात.

५) घरे शेतीस अयोग्य असलेल्या जमिनीवर बांधलेली असतात.




**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण वस्त्यांचे स्वरुपानुसार प्रकार सांगा.

## २.८ ग्रामीण वस्तीचे कार्यानुसार प्रकार

**१) शेती कार्य :**

जगातील बहुतेक ग्रामीण वस्तीचे शेती हे एक प्रमुख व महत्वाचे कार्य आहे. कारण ग्रामीण वस्ती बहुधा शेतजमीनी शेजारीच स्थापन होते. अशा वस्तीत शेतकरी लोकांची सख्या जास्त असते. या वस्तीत राहणारे इतर लोकही शेतकर्यांना त्याच्या शेतीच्या कामात मदत करतात. त्यांना शेतमजूर म्हणतात. या शेतमजूरांना केलेल्या कामाच्या मोबदल्यात पैसे किंवा धान्य दिले जाते. या ग्रामीण वस्तीत सुतार व लोहारही राहतात. हे लोक शेतकर्यांना लागणारी अवजारे तयार करतात.

**२) मासेमारी कार्य :**

सर्व खेड्यांचा आधार प्रामुख्याने शेती नसतो. बरीचशी खेडी नद्या, सरोवरे आणि समुद्र किनार्याजवळ वसलेली आहेत. या ग्रामीण वस्तीतील लोक मासेमारी करतात. अशा वस्तीतील बरेचसे लोक पूर्णपणे मासेमारीत गुंतलेले असतात. काही थोड्या प्रमाणात शेती व थोड्या प्रमाणात मासेमारी करतात. अशा खेड्यातील काही लोक मासेमारीकरीता

लागणारी सामग्री (उदा. जाळे, बोट, इ.) बनविण्यात गुंतलेले असतात. येथील लोक मासे पकडून शेजारच्या शहरात नेऊन विकतात आणि आपला उदरनिर्वाह चालवितात. याप्रकारे बहुतांश मासेमारी व्यवसायात गुंतलेल्या वस्तीला मासेमारी खेडे म्हणतात.

**३) खाणकाम कार्य :**

जगाच्या काही ग्रामीण वस्तीत खाणकाम हा व्यवसाय चालत असलेला दिसतो. पण जगात अशी खेडी फार थोडी आहेत. प्राचीन काळात विशेषतः उत्तर इंग्लंड व दक्षिण बेल्जियममध्ये अशी खेडी अस्तित्वात आली होती. त्यावेळी दगडी कोळसा व इतर खनिजांचे कमी प्रमाणात उत्खनन होत होते. याप्रकारे खाणकामाच्या हेतूने स्थापन झालेल्या वस्तीस खाणकाम खेडे म्हणतात.

**४) लाकूडतोड कार्य :**

लाकूडतोडीच्या व्यवसायामुळे तेथे ग्रामीण वस्ती स्थापन होते. पण अशी वस्ती अस्थायी स्वरूपाची असते. ज्यावेळी जंगलात लाकूडतोड चालते त्यावेळी लाकूडतोड करणारे लोक तात्पुरती वस्ती करून राहतात. तेथील लाकूडतोड संपल्यावर ते दुसरीकडे जाऊन वस्ती करतात. पण जेथे मोठ्या प्रमाणात लाकूडतोड चालते तेथे मात्र कायमस्वरूपाची वस्ती आढळते. मध्य कटिबंधातील सूचिपर्णी जंगतात अशी वस्ती आढळते. याप्रकारे लाकूडतोड कार्य करणाऱ्या वस्तीला लाकूडतोड खेडे म्हणतात.

**५) ग्रामोद्योग व लघुउद्योग कार्य :**

काही ग्रामीण वसाहती ग्रामोद्योग व लघुउद्योग यासाठी प्रसिध्द असतात. किंबहुना तोच त्यांचा प्रमुख व्यवसाय असतो. अशा वसाहतीमध्ये विशेषतः शेतीपूरक व्यवसाय मोठ्या प्रमाणात विकसित झालेले आढळतात. उदा. कुकुटपालन, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय इ. असे व्यवसाय त्या वसाहतीतील लोकांचे प्रमुख व्यवसाय बनतात. उदा. गुजरात राज्यातील आणंद शहराजवळील ग्रामीण वसाहती दुग्ध व्यवसायासाठी प्रसिध्द आहेत.

**६) हस्तकलाप्रधान वसाहती :**

काही ग्रामीण वसाहतींचा मुख्य व्यवसाय पारंपारीक हस्तकला हाच आहे. हस्तकलेतून विविध वस्तू बनविल्या जातात. अशा काही वसाहती आहेत की ज्या तेथील हस्तकलेमुळे जगप्रसिध्द आहेत. उदा. महाराष्ट्रातील पैठण व येवला जवळील ग्रामीण वसाहती पैठणी साड्या तयार करण्यासाठी प्रसिध्द आहेत. वर्षानुवर्षे या वसाहतींमधून हा हस्तकला व्यवसाय चालू आहे. राजस्थानमधील जैसलमेरच्या वाळवंटी प्रदेशातील अनेक ग्रामीण परिसरातील वसाहती हात छापाचे रंगीत कापड तसेच नक्षीदार शोभेच्या वस्तू बनविण्यासाठी प्रसिध्द आहेत.

**ग्रामीण वस्तीतील इतर कार्य :**

**१) दुकानदारी :** ग्रामीण वस्ती पूर्णपणे स्वयंपूर्ण नसते. ग्रामीण वस्तीतील लोक स्वतःच्या गरजेपुरते धान्याचे उत्पादन काढतात. पण किरणा, कापड व इतर माल त्यांना विकत घ्यावा लागतो. याकरिता ग्रामीण वस्तीत दुकानदारी सुरू होते. दुकानदारी करणारे लोक

ग्रामीण वस्तीतील लोकांना लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तू इतर भागातून आणून त्याठिकाणी विकतात.

**२) सामाजिक सेवा :** ग्रामीण वस्तीत पोस्ट ऑफिस, थोड्या प्रमाणात वैद्यकिय सोयी असतात. यात शासकीय व खाजगी लोक आपापल्या सेवा बजावतात.

**३) धार्मिक कार्य :** काही ग्रामीण वस्तीत देवालय, मशीद व चर्च असतात. ते धार्मिक क्षेत्रातील आपापल्या धार्मिक सेवा बजावत असतात.

**४) शासकीय कार्य :** बहुतेक खेड्यात शासकीय कार्ये चालतात. त्या वस्तीत लोकातच निवडून आलेले लोक शासकीय सेवा बजावतात. बहुतेक ग्रामीण वस्तीत पंचायत असते. त्या पंचायतीतच ही कामे चालतात.

**ग्रामीण वस्तीचे जमीनमालकीच्या स्वरूपानुसार प्रकार :**

मानव शेती करू लागला तेव्हापासून जमिनीला फार महत्व प्राप्त होत गेले. किंबहुना जमिनीला संपत्तीचे स्वरूप प्राप्त झाले. जमिनीची मालकी, तिच्या वाटणीचे स्वरूप कसे असावे हे मानवाने ठरवून टाकले. हे स्वरूप काळानुसार बदलत गेले. जमीनमालकीच्या निरनिराळ्या काळात प्रचलित असलेल्या पध्दतीनुसार वसाहतीचे पुढील प्रकार केले जातात.

**१) जमीनदारी वसाहत -**

मोगल बादशहाच्या कारकिर्दीत जमीनदारी प्रथेचा उगम झाला. त्यांनी शेतसारा गोळा करणारा असा मध्यम वर्ग जमीनदार, इनामदार, तालुकदार यांच्या रूपाने निर्माण केला. जमीनदार गावचा प्रमुख किंवा मालक असल्याने तो इतरांवर व शेतकर्यांवर आपली सत्ता गाजवित असे. गावाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्याचे वर्चस्व होते. गावातील न्यायनिवाडा सुध्दा तोच करीत असे. साधारणतः १९५८ पर्यंत अशा ग्रामीण वस्त्या अस्तित्वात होत्या.

**२) रयतवारी वसाहत :**

ब्रिटीश सरकारने शेतसारा आकारणीच्या पध्दतीत बदल केले. रयतवारी पध्दतीत प्रत्यक्ष जमीन कसणारा शेतकरी हा शेतसारा प्रत्यक्ष सरकारशी संबंध ठेवून मध्यस्थाविना भरतो. या पध्दतीत सरकार शेतजमिनीचा दर्जा, सरकारी उत्पन्न आदी बाबींचा विचार करून सारा निश्चित करीत असे. जमिनीची मालकी मात्र लोकांची किंवा शेतकर्याचीच असे. अशा प्रकारच्या रयतवारी ग्रामीण वसाहती आजही प्रचलित आहेत.

**३) सहकारी ग्रामीण वसाहती :**

अशा ग्रामीण वसाहती मध्ये शेतकरी सहकारी पध्दतीने एकत्र येतात. आपली जमीन एकत्र करून सामुहीक किंवा ग्राममंडळाच्या मालकीची बनवितात. असे मंडळ सहकारी पध्दतीने जमिनीची मशागत करते. नंतर जमिनीच्या येणाऱ्या उत्पन्नाचे समान वाटप केले जाते. नफा

किंवा तोटा सर्वांकडून सारख्या पध्दतीने वाटून घेतला जातो. अशा वसाहतीची संख्या फार कमी प्रमाणात आढळते.

**तुमची प्रगती तपासा :**

१) ग्रामीण वस्त्यांचे कार्यानुसार प्रकार सांगा.

## २.९ भारतातील ग्रामीण वस्ती

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे भारतात ग्रामीण वस्तीचे प्रमाण जास्त आहे. भारतात जवळजवळ सव्वा सहा लाख खेडी आहेत. भारतातील ८० टक्के वस्ती ग्रामीण आहे. आणि या ग्रामीण वस्तीची लोकसंख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ८५ टक्के एवढी आहे. अशाप्रकारे भारतात ग्रामीण वस्तीचे प्रमाण खूप आहे. म्हणूनच ब्लाश या तज्ञाने भारताला ग्रामीण वस्तीचा देश म्हणून संबोधिले आहे.

भारतात सर्वत्र ग्रामीण वस्ती आढळत असली तरी सर्व भागात ग्रामीण वस्ती सारखी आढळत नाही. प्रत्येक भागातील ग्रामीण वस्तीचा आकार, रचना, स्वरूप इ. गोष्टीवर भौगोलिक घटकांचा परिणाम झालेला आढळतो. प्रामुख्याने राजस्थान, बंगाल, उत्तरप्रदेश, पंजाब, मध्यप्रदेश, हिमालय इ. भागात वैशिष्ठयपूर्ण वस्ती आहे.

**राजस्थान :**

राजस्थानमध्ये बहुतेक ग्रामीण वस्ती उंच भागावर आढळते. अशा वस्तीला तेथे गठ म्हणतात. उदा. मुकुंदगठ, महेंद्रगठ, सुजाणगठ इ. अशा वस्तीतील घरे ही उंचावर बांधलेली असतात. घराभोवती उंच भिंती असतात. अशाप्रकारे घरोभोवती भिंती असण्याचे कारण म्हणजे येथील हवामान. राजस्थानाचे हवामान शुष्क आहे. येथे धुळीची वादळे येतात. याप्रकारे धुळीची वादळे, तसेच चोरापासून बचाव व्हावा म्हणून अशी भक्कम घरे बांधण्यात येतात. घराचा आकार सर्वसाधारणपणे चौकोनी असतो. तेथे पावसाचे प्रमाण कमी असल्याने घरांचीछपरे साधारणतः सपाट असतात. उदा. मुकुंदगठ या लहानशा वस्तीत ५० रस्ते आहेत. राजस्थानमधील ग्रामीण वस्तीवर पाणीपुरवठ्याचाही परिणाम झालेला आढळतो. राजस्थानमधील पाण्याची टंचाई असल्याने ग्रामीण वस्ती दूर दूर असते पाण्याजवळ असते.

**पश्चिम बंगाल :**

बंगालमध्ये सुपीक जमीन व भरपूर पाऊस यामुळे ग्रामीण वस्ती जास्त आहे. पण येथे ग्रामीण वस्तीत घरे दूर दूर असतात. नद्याच्या पूरापासून संरक्षण व्हावे म्हणून घरे चबुतर्यावर बाधलेली असतात. येथे जमीन खणून चबुतरे तयार करतात. आणि अशा चबुतर्यावर घरे बाधतात. माती खणलेल्या ठिकाणी डबकी तयार होतात. अशा डबक्यात मासे आढळतात. येथील घरे वेळू, बांबू व गवतापासून तयार केलेली असतात. पावसाचे प्रमाण जास्त असल्याने घराची छपरे उतरती असतात.

**उत्तर प्रदेश :**

उत्तर प्रदेशातील ग्रामीण वस्ती प. बंगालपेक्षा भिन्न आहे. उत्तर प्रदेशातील ग्रामीण वस्तीतील घराच्या बांधणी मध्ये फरक आढळतो. उत्तर प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे वेळू व गवताचे प्रमाण कमी आहे. म्हणून येथिल घरे विटा व मातीपासून बनविलेली असतात. घराची छपरे जास्त उतरती नसतात.

**पंजाब :**

पंजाबमधील ग्रामीण वस्ती दाट आहे. पूर्वी येथे बाह्य आक्रमणाची भिती होती. वारंवार परकीय हल होत म्हणून पंजाबमध्ये बहुतेक वस्त्यांत घरे जवळजवळ असतात.

**मध्यप्रदेश :**

मध्यप्रदेशातही साधारणतः दाट वस्ती आढळते. विशेषतः उत्तर व वायव्य भागात अशी वस्ती आढळते. या भागात लुटमारीचे प्रमाण जास्त होते म्हणून या भागात दाट वस्ती दिसून येते.

**हिमाचल प्रदेश :**

भारतातील हिमाचल प्रदेशात आणि इतर काही पर्वतीय क्षेत्रात विखुरलेली वस्ती आढळते. या वस्तीतील घरांकरीता तेथील उपलब्ध साधनसामग्रीचा वापर केलेला आढळतो. घरे ओट्यावर किंवा उतारावर शिड्या तयार करून बांधलेली असतात. घराची छपरे उतरती असतात. तसेच घरे एका रांगेत बांधलेली असतात.

**महाराष्ट्र :**

महाराष्ट्रात सर्व भागात एकाच प्रकारची ग्रामीण वस्ती आढळत नाही. कारण महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीत भिन्नता आहे. महाराष्ट्रातील जास्त पावसाच्या प्रदेशातील घरे पक्या विटा किंवा दगडांनी बांधलेली असतात. घरांची छपरे कौलारू असतात. छपरे तीव्र उताराची असतात. कोकणामध्ये अशी वस्ती आढळते. महाराष्ट्रात कमी पावसाच्या प्रदेशात घरे मातीची असतात. घराची छपरे सपाट असतात. उदा. महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यतील सांगोला भागात विखुरलेली वस्ती आढळते.

**ईशान्य भारतातील नागा जमातीची वस्ती :**

आसामच्या नागा पर्वतीय क्षेत्रात नागा लोकांची वस्ती आढळते. नागा लोक प्राचीन काळापासून लढत आले आहेत त्यामुळेच शत्रुपासून बचाव करण्यासाठी यांच्या वस्तीतील घरे उंचावर असतात. वेळू आणि गवताचा वापर करून बांधलेल्या घरांचा आकार लहान असतो. वसाहत वसविताना जवळच असणारी कृषी योग्य जमीन, पाणीपुरवठा आणि बाह्य आक्रमणापासून सुरक्षित जागा या घटकांचा विचार केला जातो.

**तुमची प्रगती तपासा :**

१) भारताच्या विविध भागांमध्ये आढळणाऱ्या घरांची वैशिष्ट्ये सांगा.

munotes.in

## २.१० स्वाध्याय

१) टीपा द्या

१) महाराष्ट्रातील घरे

२) पुंजकेदार वस्ती

३) कार्यानुसार वस्त्यांचे प्रकार

४) अंतरानुसार वस्त्यांचे प्रकार

५) बांधकाम साहित्य

६) वस्तीवर परिणाम करणारे प्राकृतिक घटक

७) वस्तीवर परिणाम करणारे सांस्कृतिक घटक

❖❖❖❖

munotes.in

# ३

# भारतातील ग्रामीण वस्त्या

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ घर - बांधकाम साहित्य

३.३ भारतातील ग्रामीण भागातील वस्त्यामधील प्रादेशिक भिन्नता

३.४ भारतातील ग्रामीण वस्तीचे अंतर्गत रचना

३.५ स्वाध्याय

## ३.० उद्दिष्टे

- घर बांधण्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे आकलन करून घेणे.
- भारतातील गामिन भातील वस्त्याची माहिती मिळणे
- भारतातील ग्रामीण वस्तीचे अंतर्गत रचना

## ३.१ प्रस्तावना

भारतातील ग्रामीण वस्त्यावर मोठ्याप्रमाणे प्राकृतिक घटकांचा मोठा प्रभाव आहे. त्यानुसार विविध भागातवस्त्यांची रचना वेगवेगळी आहे. तसेच ग्रामीण वस्त्यामधील अंतर्गत रचना हि भिन्न भिन्न आहे.

## ३.२ घर - बांधकाम साहित्य

निवाऱ्याला मानवी जीवनात अग्रक्रमाचे स्थान आहे. विविध प्रकारच्या हवामान प्रदेशात राहणाऱ्या मानवी जमातीनी विविध प्रकारची घरे बांधली असून मनुष्य दैनंदिन जीवनक्रमाची ती मुख्य केंद्रस्थाने आहेत.

निरनिराळ्या प्रदेशात बांधलेली ही घरे प्रामुख्याने थंडी, ऊन, वारा यांपासून संरक्षण व्हावे म्हणून, अन्नधान्याची साठवण करता यावी म्हणून आणि सुखाचे जीवन जगता यावे म्हणून बांधलेली असतात.

एकाच ठिकाणच्या घरांच्या स्वरूपात बदलत्या चालीरीतीचे व आधुनिकिरणाचे ज्ञान होवू शकते. थंड प्रदेशातही काही ठिकाणी लाकडाचा उपयोग घरबांधणीत करता येतो. उदा.

सिक्कीम, दार्जिलिंग मधील घरे आतमधून लाकडाने शाकारलेली असतात. अलिकडच्या काळात जंगलांच्या घटत्या प्रमाणामुळे लाकडाच्या वापरावर मर्यादा आलेल्या आढळतात. त्यामुळे संपूर्ण लाकडाच्या घराऐवजी लाकडी चौकटी , दारे, खिडक्या एवढाच मर्यादीत वापर होतो.

**घर बांधणीसाठी वापरले जाणारे साहित्य -**

भूरचनाशास्त्र आणि भूरचना या दोन्ही घटकांचा फार मोठा प्रभाव घर बांधणी साहित्यावर पडतो. घर बांधणीसाठी वापरले जाणारे बांधकामाचे साहित्य दोन गटात विभागले जाते-

घराच्या भिंतीसाठी वापरले जाणारे बांधकाम साहित्य

घराच्या छपरासाठी वापरले जाणारे बांधकाम साहित्य

अर्थातच वरील घटकांबरोबरच व्यक्तीच्या आर्थिक स्थितीचा परिणामही घर बांधणीवर होत असतो. म्हणूनच दारिद्र्यरेषेखालील घरांवर हे घटक विशेष प्रभाव टाकतात.

**१) घराच्या भिंतीसाठी वापरले जाणारे बांधकाम साहित्य-**

घराच्या भिंतीसाठी वापरले जाणारे साहित्य अर्थातच पर्यावरणाला अनुसरूनच असते उदा. माती, दगड, स्थानिक मातीपासून बनविलेल्या विटा, लाकूड, नारळाच्या झावळ्या, गवत इ.

**२) घराच्या छपरासाठी वापरले जाणारे बांधकाम साहित्य-**


घराच्या छपरासाठी वापरले जाणारे साहित्य हे त्या त्या पर्यावरणातीलच वापरले जाते. तेच छपराचा विचार करताना तेथील हवामानाचाही विचार केला जातो. कारण पर्जन्य हा घटक छपरासाठी महत्वाचा आहे. उदा. मातीपासून बनविलेली कौले, वाळलेले गवत, बांबू, दगड, माती, लाकूड नारळाच्या झावळ्या इ. घराच्या बांधणीकरता गवत, विटा, माती, दगड यासारखे जे घटक वापरलेले असतात. त्यावरून त्याप्रदेशात कुठले पदार्थ मुबलक व स्वस्त मिळत असावेत ते समजू शकते. तसेच घरात राहणाऱ्याच्या आर्थिक परिस्थितीचाही अंदाज येऊ शतो. उष्णकटिबंधीय प्रदेशात उष्ण हवेपासून संरक्षण व्हावे म्हणून घरबांधणीत पाने, झाडांच्या फांद्या यासारख्या घटकांचा उपयोग अधिक केलेला दिसतो. थंड धृवीय प्रदेशात बर्फाचा उपयोग अधिक केलेला दिसतो. आपल्याकडे कोकणात विपुलतेने आढळणाऱ्या जांभ्या दगडाचा उपयोग घर बांधणीत करतात.

**१) गवत -** घरांच्या बांधकामासाठी गवताचाही वापर केला जातो. घरांची छते गवताने शाकारतात. आफ्रिकेतील झुलू लोकांची घरे गवताची असतात. आग्नेय आशियात घरासाठी बांबूचा वापर करतात. मनुष्यवस्तीवर त्या ठिकाणी उपलब्ध आसलेल्या साधन सामग्रीचाही परिणाम होतो. याचाच अर्थ असा की ज्या भागात जे साहित्य उपलब्ध असते त्यापासून लोक आपली घरे बांधतात.

munotes.in



**२) माती -** माती हा स्वतंत्र उपलब्ध होणारा घटक आहे. अर्थात सर्वच भागात घरे बांधण्याकरीता मातीचा उपयोग होत नाही. काही ठिकाणी घरकरिता पूर्णतः मातीचा उपयोग होत नाही. काही ठिकाणी अंशतः उपयोग होतो. जेथे पावसाचे प्रमाण जास्त आहे. तेथे मातीचा कमी प्रमाणात वापर होतो. उदा. इजिप्त, सुदान वगैरे शुष्क देशात बहुतेक घरे मातीपासूनच बनविलेली दिसतात. आर्थिक दुर्बल लोकांची घरे मातीचीच आढळतात.




**३) दगड -** ज्या भागात मोठ्या प्रमाणात दगड उपलब्ध असतात. तेथे घरे बांधण्याकरिता दगडांचा वापर होतो. दगडाबरोबर माती व इतरही घटक वापरले जातात. परंतु जेथे दगड विपुल प्रमाणात सापडतात तेथे घरांकरिता दगडाचाच जास्त वापर होतो. उदा. ग्रीस, रोम वगैरे देशातील प्राचीन वैभवशाली इमारती दगडानेच बांधलेल्या आहेत. भारतातील दख्खनच्या पठारावर कृष्ण प्रस्तर किंवा काळा दगड (ग्रेनाइट) मोठ्या प्रमाणात सापडतो. त्यामुळे दख्खनच्या पठारावरील इमारती दगडापासून बनविलेल्या आहेत. तरीही अलिकडच्या आधुनिक काळात पुन्हा एकदा पर्यावरण पूरक म्हणून मातीच्या भिंतीची घरे बांधली जातात.

**४) लाकूड -** घरे बांधण्याकरिता लाकडाचाही उपयोग होतो. घरांची दारे, खिडक्या, छपरे इ. गोष्टी लाकडापासून बनविण्यात येतात. जेथे लाकूड विपुल प्रमाणात उपलब्ध होते. घरे तर पूर्णपणे लाकडाची असतात. उदा. मध्य कटिबंधातील सूचीपर्णी जंगलातील घरे पूर्णतः लाकडापासून बनविलेली आढळतात.

**५) आधुनिक सामुग्री -** सध्या घरे बांधण्याकरिता आधुनिक साधनसंपत्तीचा वापर होत नाही. ही संपत्ती स्थानिक भागात उपलब्ध असते किंवा बाहेरून आणावी लागते. यात विटा, सिमेंट, सिमेंटच्या विटा, लोखंड, ॲस्बेस्टॉस, आधुनिक टाईल्स इ. साहित्याचा समावेश होतो. अर्थातच ज्याची आर्थिक स्थिती चांगली आहे व असेच लोक आधुनिक सामुग्रीचा घरे बांधणीकरीता उपयोग करू शकतात.

घराच्या बांधणीतून आणि रचनेवरून घरात राहणार्यांच्या संस्कृतीबद्दल आणि आजूबाजूच्या भौगोलिक परिस्थितीबद्दल बरेच काही सांगता येते. विशेषतः ग्रामीण भागातील घरे भौगोलिक घटकांशी आणि पर्यावरणाशी जवळीक साधणारी असतात. वास्तुशास्त्राच्या दृष्टीकोनातून ग्रामीण वसाहतीतील घरे अतिशय साधी आढळतात.

**तुमची प्रगती तपासा :**

१) विविध प्रकारच्या बांधकाम साहित्याची माहिती द्या.

**भारतातील ग्रामीण वास्त्यामधील भिन्नता**

ग्रामीण वस्त्या हे भारताचे प्रमुख वैशिष्ठ आहे. ग्रामीण वस्तीमध्ये असलेली घरे विविध प्रकारची असतात. त्यांच्या रचनेवर आणि आकारावर प्रामुख्याने हवामान, पाण्याची उपलब्धता, जमिनीची सुपीकता, वाऱ्याची दिशा, धर्म, लोकांचा सामाजिक दर्जा आणि बांधकामासाठी उपलब्ध असलेले साहित्य याचा परिणाम झालेला असतो व त्या परिणामातूनच घराचा प्रकार व त्याची रचना ठरते. सर्वसाधारणत: भारतातील ग्रामीण वस्त्यामध्ये असलेल्या घरांचे तीन प्रकार पडतात.


**१) सपाट धाब्याची घरे :**

कमी पावसाच्या प्रदेशात या प्रकारची घरे आढळतात. उत्तर प्रदेश, कर्नाटक व राजस्थान या राज्यात याप्रकारची घरे आहेत.

**२) उतरत्या छपराची घरे :**

या प्रकारची घरे प्रामुख्याने डोंगराळ प्रदेश, जास्त पावसाचे प्रदेश तसेच हिमवर्षाव होणाऱ्या प्रदेशात आढळतात. या घराच्या छपरांचा उतार प्रदेशातील हवामानावर अवलंबून आहे. जास्त पावसाच्या प्रदेशात किंवा हिमवर्षाव होणाऱ्या प्रदेशात छपरांचा उतार तीव्र असतो तर इतर भागात तो मंद आढळतो.

काश्मीर, हिमालयीन प्रदेश, पश्चिम बंगाल, आसाम, ओरीसा, महाराष्ट्र, केरळ, मद्रास इ. राज्यात याप्रकारची घरे आढळतात. कोकणातील घरे याप्रकारची आहेत. घराच्या छपरांसाठी विविध ठिकाणी वेगवेगळे साहित्य वारतात. काही लोक काँक्रीटचा वापर करतात.


उतरत्या छपराचे घर

munotes.in

**३) गोलाकार विना शंक्वाकृती छपराची घरे :**

यांना कित्येकदा झोपडी या नावाने ओळखतात, प्रामुख्याने आदिवासी लोक या प्रकारची घरे बांधतात. त्यांचे अस्तित्वही कायमस्वरूपी नसते. जंगली प्रदेशात डोंगर उतारावर, राजस्थान, गुजरात, बिहार, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू या राज्यात याप्रकारची घरे आहेत.



**काही वैशिष्ट्यपूर्ण घरे :**

आसाममधील झाडावरची घरे : आसाममधील दलदलीच्या प्रदेशात झाडांवर घर बांधले जाते. अर्थात आकाराने लहान असलेले हे झोपडीवजा घर असते. लाकडाचा व गवताचा फांद्यांचा व पानाचा वापर करून, अशी घरे बांधतात

**आसाममधील घर**



munotes.in

ठाणे जिल्ह्यातील वारली या आदिवासी जमातीचे लोक मातीच्या भिंतीची घरे बांधतात. अशा भिंती शेणाने सारवून विशिष्ट प्रकारच्या चित्रकृती ने रंगविलेल्या असतात.

कोकण किनारपट्टीची घरे मातीच्या भिंतीपासून बनविलेली व छतासाठी नारळाच्या झावळ्यांनी शाकारलेली असतात.

निलगिरी पर्वतश्रेणीत राहणाऱ्या तोडा आदीवासींची घरे अर्धवर्तुळाकृती असतात. ती वेळू, ताडाची पाने व गवतापासून तयार केलेली असतात. घराच्या भिंती वेळू व ताडाच्या पानापासून बनवितात तर छप्पर, गवत व वेळूपासून तयार केलेले असते.

दख्खनच्या पठारावरील घरांची रचना आकाराने मोठी व सपाट छपराची असते.

माळवा पठारावरील घरे दगडांनी बनविलेली असतात.

ओरीसा प्रांतातील घरांची छपरे कौलारू आढळतात.

काश्मीरच्या पर्वतीय भागात घराच्या मागे व पुढे दगडाची उंच भिंत बांधली जाते. जेणेकरून दरड कोसळल्यास घराचे सरंक्षण व्हावे.

काश्मीरच्या दाल आणि वूलर सरोवरांमध्ये तसेच केरळच्या सरोवरांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण घरे (हाऊसबोट) पर्यटकांना पुरविली जातात. ज्यांना शिकारा असे म्हणतात.

हिमालयाच्या पायथ्याशी तराईच्या प्रदेशातील घरे लाकडाची असतात.

राजस्थान मधील घरे जाड भिंतीची कमी दारे-खिडक्या असणारी असतात. कारण तेथील अती थंडी व अती उष्णतेपासून सरंक्षण व्हावे यासाठी तसेच घरासमोर उंच भिंत असते. कारण धुळीच्या / वाळूच्या वादळापासून संरक्षण व्हावे असा हेतू असतो.

किनारपट्टीवरील घरांचे दरवाजे समुद्राच्या विरूध्द असतात. कारण समुद्री वाऱ्यापासून संरक्षण व्हावे यासाठी अशा प्रकारची रचना आढळते.

शेती समूहात असलेल्या भागातील घरे आकाराने खूप मोठी असतात. शेतीची अवजार ठेवण्यासाठी शेतमाल ठेवण्यासाठी, स्वयंपाक करण्यासाठी बैठकीसाठी अशा स्वतंत्र खोल्या असतात.

पूर परिस्थिती निर्माण होणाऱ्या प्रदेशात, विशेषतः गंगा नदीच्या पूरक्षेत्र भागात पूर तटावर उंच दगडी चबुतरा बांधून घरे बांधली  जातात.

पर्यटनाच्या नवीन व्यावसायीक क्रांतीचा परिणामही घराच्या रचनेवर झालेला आढळतो. उदा. तंबू निवास ज्यासाठी बांबू, लाकूड यापासून बनविलेल्या झोपड्या तयार केल्या जातात. झाडावरील मचाणासाठी झाडावरच बांबू, फांद्या, पाने याचा वापर केला जातो.

थोडक्यात भारताचा विस्तृत भू-प्रदेश हवामानातील व प्राकृतिक रचनेतील विविधता यांचा परिणाम भारतातील घरांच्या रचनेवर, आकारावर व घर बांधणी साहित्यावर झालेला आढळतो. त्यामुळे उत्तरेपासून दक्षिणेकडे आणि पूर्वे पासून पश्चिमेकडे घरांचे नानविध प्रकार आढळतात.

**तुमची प्रगती तपासा :**

१) सुबक आकृत्यांच्या सहाय्याने घरांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

## ३.३ भारतातील ग्रामीण वस्तीमधील प्रादेशिक भिन्नता

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे भारतात ग्रामीण वस्तीचे प्रमाण जास्त आहे. भारतात जवळजवळ सव्वा सहा लाख खेडी आहेत. भारतातील ऐंशी टक्के वस्ती ग्रामीण आहे. आणि या ग्रामीण वस्तीची लोकसंख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास

८५ टक्के एवढी आहे. अशाप्रकारे भारतात ग्रामीण वस्तीचे प्रमाण खूप आहे. म्हणूनच ब्लाश या तज्ञाने भारताला ग्रामीण वस्तीचा देश म्हणून संबोधिले आहे.

भारतात सर्वत्र ग्रामीण वस्ती आढळत असली तरी सर्व भागात ग्रामीण वस्ती सारखी आढळत नाही. प्रत्येक भागातील ग्रामीण वस्तीचा आकार, रचना, स्वरूप इ. गोष्टीवर भौगोलिक घटकांचा परिणाम झालेला आढळतो. प्रामुख्याने राजस्थान, बंगाल, उत्तरप्रदेश, पंजाब, मध्यप्रदेश, हिमालय इ. भागात वैशिष्ठयपूर्ण वस्ती आहे.

**राजस्थान :**

राजस्थानमध्ये बहुतेक ग्रामीण वस्ती उंच भागावर आढळते. अशा वस्तीला तेथे गठ म्हणतात. उदा. मुकुंदगठ, महेंद्रगठ, सुजाणगठ इ. अशा वस्तीतील घरे ही उंचावर बांधलेली असतात. घराभोवती उंच भिंती असतात. अशाप्रकारे घरोभोवती भिंती असण्याचे कारण म्हणजे येथील हवामान. राजस्थानाचे हवामान शुष्क आहे. येथे धुळीची वादळे येतात. याप्रकारे धुळीची वादळे, तसेच चोरापासून बचाव व्हावा म्हणून अशी भक्कम घरे बांधण्यात येतात. घराचा आकार सर्वसाधारणपणे चौकोनी असतो. तेथे पावसाचे प्रमाण कमी असल्याने घरांचीछपरे साधारणतः सपाट असतात. उदा. मुकुंदगठ या लहानशा वस्तीत ५० रस्ते आहेत.

राजस्थानमधील ग्रामीण वस्तीवर पाणीपुरवठ्याचाही परिणाम झालेला आढळतो. राजस्थानमधील पाण्याची टंचाई असल्याने ग्रामीण वस्ती दूर दूर असते पाण्याजवळ असते.




**पश्चिम बंगाल :**

बंगालमध्ये सुपीक जमीन व भरपूर पाऊस यामुळे ग्रामीण वस्ती जास्त आहे. पण येथे ग्रामीण वस्तीत घरे दूर दूर असतात. नद्याच्या पूरापासून संरक्षण व्हावे म्हणून घरे चबुतर्यावर बाधलेली असतात. येथे जमीन खणून चबुतरे तयार करतात. आणि अशा चबुतर्यावर घरे बाधतात. माती खणलेल्या ठिकाणी डबकी तयार होतात. अशा डबक्यात मासे आढळतात. येथील घरे वेळू, बांबू व गवतापासून तयार केलेली असतात. पावसाचे प्रमाण जास्त असल्याने घराची छपरे उतरती असतात.



**उत्तर प्रदेश :**

उत्तर प्रदेशातील ग्रामीण वस्ती प. बंगालपेक्षा भिन्न आहे. उत्तर प्रदेशातील ग्रामीण वस्तीतील घराच्या बांधणी मध्ये फरक आढळतो. उत्तर प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे वेळू व गवताचे प्रमाण कमी आहे. म्हणून येथिल घरे विटा व मातीपासून बनविलेली असतात. घराची छपरे जास्त उतरती नसतात.



**पंजाब :**

पंजाबमधील ग्रामीण वस्ती दाट आहे. पूर्वी येथे बाह्य आक्रमणाची भिती होती. वारंवार परकीय हल्ले होत म्हणून पंजाबमध्ये बहुतेक वस्त्यांत घरे जवळजवळ असतात.



**मध्यप्रदेश :**

मध्यप्रदेशातही साधारणतः दाट वस्ती आढळते. विशेषतः उत्तर व वायव्य भागात अशी वस्ती आढळते. या भागात लुटमारीचे प्रमाण जास्त होते म्हणून या भागात दाट वस्ती दिसून येते.



**हिमाचल प्रदेश :**

भारतातील हिमाचल प्रदेशात आणि इतर काही पर्वतीय क्षेत्रात विखुरलेली वस्ती आढळते. या वस्तीतील घरांकरीता तेथील उपलब्ध साधनसामग्रीचा वापर केलेला आढळतो. घरे ओट्यावर किंवा उतारावर शिड्या तयार करून बांधलेली असतात. घराची छपरे उतरती असतात. तसेच घरे एका रांगेत बांधलेली असतात.



**महाराष्ट्र :**

महाराष्ट्रात सर्व भागात एकाच प्रकारची ग्रामीण वस्ती आढळत नाही. कारण महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीत भिन्नता आहे. महाराष्ट्रातील जास्त पावसाच्या प्रदेशातील घरे पक्या विटा किंवा दगडांनी बांधलेली असतात. घरांची छपरे कौलारू असतात. छपरे तीव्र उताराची असतात. कोकणामध्ये अशी वस्ती आढळते. महाराष्ट्रात कमी पावसाच्या प्रदेशात घरे मातीची असतात. घराची छपरे सपाट असतात. उदा. महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यतील सांगोला भागात विखुरलेली वस्ती आढळते.





munotes.in

**ईशान्य भारतातील नागा जमातीची वस्ती :**

आसामच्या नागा पर्वतीय क्षेत्रात नागा लोकांची वस्ती आढळते. नागा लोक प्राचीन काळापासून लढत आले आहेत त्यामुळेच शत्रुपासून बचाव करण्यासाठी यांच्या वस्तीतील घरे उंचावर असतात. वेळू आणि गवताचा वापर करून बांधलेल्या घरांचा आकार लहान असतो. वसाहत वसविताना जवळच असणारी कृषी योग्य जमीन, पाणीपुरवठा आणि बाह्य आक्रमणापासून सुरक्षित जागा या घटकांचा विचार केला जातो.

**तुमची प्रगती तपासा :**

१) भारताच्या विविध भागांमध्ये आढळणाऱ्या घरांची वैशिष्ट्ये सांगा.

## ३.४ भारतातील ग्रामीण वस्तीचे अंतर्गत रचना

भारतातील ग्रामीण वस्तीचे अंतर्गत रचनेच्या आधारावर प्रकार पडतात,

१. प्राकृतिक अंतर्गत रचना

२. सामाजिक अंतर्गत रचना

३. डॉक्सियाडिस चे अंतर्गत रचना वर्गीकरण

अंतर्गत रचना म्हणजे गावाची अंतर्गत रचना किंवा बांधकाम आराखडा ज्यामध्ये रस्त्यांचा आणि रस्त्यांचा आराखडा, घरांची मांडणी, घरांचा नमुना, गाव आणि कृषी क्षेत्राचा भौमितिक आकार आणि आकार, जलकुंभाचे स्थान, धार्मिक स्थळ, यांचा समावेश होतो. किंवा गावच्या प्रमुखाचे घर. ग्रामीण आकारविज्ञान समाविष्ट आहे

१) प्राकृतिक अंतर्गत रचना

२) सामाजिक अंतर्गत रचना

1. मानवी वस्त्यांचे प्राकृतिक आकारविज्ञान

भौतिक आकृतीशास्त्रामध्ये खालील संबंधांचा अभ्यास समाविष्ट आहे:

**१. गल्ली ते गल्ली संबंध:**

हे लेनच्या भूमितीय व्यवस्थेचे वर्णन आहे. ते एकमेकांशी कसे जोडलेले आहेत आणि कोणत्या बिंदूवर समाप्त होतात. भारतीय गावांमध्ये, गल्ल्या अत्यंत अरुंद असतात आणि अचानक संपतात. हे भारतीय गावांचे अनियोजित स्वरूप दर्शवते.

**२. गल्ली ते घर संबंध:**

लेनची भूमिती घरांची व्यवस्था ठरवते कारण घरे गल्ल्यांमध्ये वाढतात. भारतात, गल्ल्या मोठ्या प्रमाणात अनियोजित आहेत आणि घरांची व्यवस्था गल्लीचा प्रकार ठरवते.

### ३. घर ते घर संबंध:

घरांमधील अंतरावरून भौतिक आकारविज्ञान देखील निश्चित केले जाते. गुच्छ असलेल्या गावांमध्ये, घरे असमान अंतरावर असतात किंवा त्यांची भिंत ते भिंतीची व्यवस्था असते. भौमितिक योजनेनुसार घरे फारच कमी आहेत आणि त्यांची सरासरी उंची बदलू शकते.

सामाजिक रचना/जाती व्यवस्थेवर आधारित घरांचे क्लस्टरिंग आहे.

कृषी क्षेत्राच्या भूमितीय आकाराची भूमिका देखील गावाचा नमुना ठरवते.

घराचा प्रकार 'पक्के' ते 'कच्चा' पर्यंत असू शकतो आणि गावांच्या जुन्या भागांमध्ये, छतावर वायुवीजन बंद असते (गाव विकसित आहे की नाही यावर अवलंबून)

२. सामाजिक अंतर्गत रचना:

हे जाती किंवा वर्गावर आधारित असलेल्या गावाच्या सामाजिक संरचनेचा संदर्भ देते.

भारतीय खेड्यांमध्ये, खेड्यांच्या आकृतिबंधात जातीची उतरंड दिसून येते.

कामाची विभागणी, अस्पृश्यता (आता तितकीशी ठळकपणे नाही), स्त्रिया आणि कनिष्ठ जातींच्या कामावर सामाजिक बंदी यासारख्या सामाजिक घटकांमुळे ग्रामीण वस्त्यांचे शहरी वस्त्यांपेक्षा वेगळे सामाजिक स्वरूप निर्माण झाले.

खालील घटक गावांच्या खालील आकृतिबंधावर परिणाम करतात:


- इमारतींची व्यवस्था
- रस्त्यांचा आणि शेतांचा नमुना
- सेटलमेंटची कार्यात्मक वैशिष्ट्ये.

उदाहरणार्थ, ब्राह्मण आणि राजपूत यांसारख्या उच्च जातीच्या लोकांची घरे मोठी असतील आणि खालच्या जातीतील लोकांसाठी झोपड्या, गुरेढोरे असलेली कच्ची घरे असतील.

धर्मनिरपेक्ष वर्चस्व मॉडेल: या मॉडेल अंतर्गत, सर्व जाती आणि धर्म जुन्या जजमानी प्रणाली अंतर्गत कार्यात्मक एकक म्हणून एकत्र आले. उदाहरणार्थ, जमिनीच्या मशागतीसाठी जमीन मालकांना भूमिहीन लोकांची सेवा आवश्यक होती.

अशा प्रकारे, ग्रामीण वस्तीची सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्ये देखील सेटलमेंट सिस्टममध्ये अभ्यासाचे एक क्षेत्र आहे.

munotes.in




### ३. डॉक्सियाडिस चे अंतर्गत रचना वर्गीकरण

ग्रामीण आकारविज्ञानाचे वर्गीकरण करण्याचा सर्वात पहिला प्रयत्न डॉक्सियाडीसने केला होता. त्यांनी ग्रामीण आकारविज्ञानाचे चार विभागांमध्ये वर्गीकरण केले:

एकसंध क्षेत्र किंवा ग्राम गाभा: यात गावाच्या मध्यवर्ती भागाचा समावेश होतो. त्यात धार्मिक स्थळ, जलकुंभ किंवा जमीनदार/गाव प्रमुखाचे घर किंवा सामुदायिक जमीन आहे. त्याच्या आजूबाजूला जमीनदार गावातील स्वतःच्या जातीचा माणूस आहे. हा सर्वात दाट लोकवस्तीचा प्रदेश आहे आणि गावाचा गजबजलेला भाग आहे जो पितृसत्ताक समाज आणि सुरक्षेच्या चिंता प्रतिबिंबित करतो.

संक्रमणकालीन झोन: हा भाग ग्रामसेवकांच्या ताब्यात आहे उदा. सोनार, लोहार, दूधवाला, विणकर इ. हा झोन गावाच्या गाभ्याशी जोडलेला आहे जिथे मध्यम जातीचे लोक गरीब उच्चवर्णीय लोकांमध्ये मिसळले जातात. हा झोन आर्टिसन्स झोन म्हणूनही ओळखला जातो.

**रक्ताभिसरण भाग:**

हा गावाचा बाह्य परिघ आहे जेथे नवीन घरे आणि स्थायिक गाभ्यावरील गर्दीमुळे स्थलांतरित झाले आहेत किंवा बाहेरून स्थायिक झाले आहेत.अशा प्रकारे, या झोनमध्ये सामाजिक रचनेच्या दृष्टीने मिश्रित जमीन वापर आहे.

**विशेष भाग:**

शेतात कामाच्या संधी आणि सामाजिक पृथक्करणामुळे शेतजमिनीजवळील गावाबाहेरील भूमिहीन मजुरांनी ते व्यापले होते.ते सहसा खालच्या जातीतील लोक असतात.

## ३.५ स्वाध्याय

१) टीपा द्या

१) महाराष्ट्रातील घरे

२) पुंजकेदार वस्ती

३) कार्यानुसार वस्त्यांचे प्रकार

४) अंतरानुसार वस्त्यांचे प्रकार

५) बांधकाम साहित्य

६) ग्रामीण भागातील वस्त्यांचे अतर्गत भूविज्ञान सांगा.

७) घर बांधण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यांचे वर्णन करा.

munotes.in

# ४

# नागरी वस्ती

**घटक संरचना :**

**४.०** उद्दिष्टे

४.१ नागरी वस्तीचे वर्गीकरण

४.२ नागरी वस्तीचे स्थान व स्थिती

४ .३ नागरी वसाहतीचे स्थानानुसार प्रकार

४.४ नागरी वसाहतींची स्थिती

४.५ नागरी वसाहतीची प्रारुपे

४.६ शहरांचे कार्यात्मक वर्गीकरण

## ४.० उद्दिष्टे

- नागरी वस्तीच्या प्रकारांचा अभ्यास करणे.
- शहरांचे कार्यात्मक वर्गीकरण अभ्यासणे.

## ४.१ नागरी शहरी वस्तीचे / नगराचे लोकसंख्येनुसार वर्गीकरण

नागरी वसाहतीमध्ये लोकसंख्या हा घटक अतिशय महत्त्वाचा असतो. लोकसंख्या हा घटक आधारभूत घेऊन नागरी वसाहतीचे पुढील प्रकार पाडता येतात.

१) नागरी वाडी / नागरी गृहसमुह

२) नगर ग्राम / नागरी खेडे

३) शहर

४) नगर

५) महानगर

६) संकलीत नगर / सन्नगर

७) प्रमहानगर / महाकाय नगर

**१) नागरी वाडी / नागरी गृहसमुह :**

ज्या वसाहतीची लोकसंख्या २०० पर्यंत आढळते. अशा नागरी वसाहतीला नागरी गृह समुह / नागरी वाडी असे म्हणतात. हा वैशिष्ट्यपूर्ण प्रकार उत्तम अमेरीकेतील संयुक्त संस्थाने या देशात आढळतो. यामध्ये ग्रामीण व नागरी कार्याचे एकत्रीकरण पहावयास मिळते. या नागरी वसाहती संयुक्त संस्थानात सर्वात लहान नगरे म्हणून ओळखली जातात. संयुक्त संस्थानात फार्मवर / मळ्यात अशा प्रकारच्या वस्त्या निर्माण होत असतात. या वसाहतीद्वारे तेथील लोकांना वैद्यकीय सोई, पोस्ट ऑफीसे, शाळा, वेगवेगळ्या प्रकारची दुकाने इ. प्रकारच्या सेवा पुरवल्या जातात. नागरी वसाहतीचा आकार मात्र लहान असतो.

**२) नगर ग्राम / नागरी खेडे :**

ज्या नागरी वसाहतीची लोकसंख्या २०० ते ५०० पर्यंत आढळते. अशा नागरी वसाहतीला नागरी भाग / नगर ग्राम / नागरी खेडे असे म्हणतात. या प्रकारच्या नागरी वसाहती संयुक्त संस्थाने, कॅनडा, सोव्हीएत रशिया व ऑस्ट्रेलिया सारख्या देशात आढळतात. हे एक प्रकारचे विकसीत ग्रामीण नगरच असते. अशा वस्तीमध्ये शेतीपेक्षा इतर उद्योगधंद्यात जास्त लोक असतात. या नागरी वस्तीमध्ये दुकानदार, अन्य कारागीर आणि व्यावसायिक लोक मोठ्या प्रमाणात आढळतात. हे लोक सभोवतालच्या ग्रामीण वसाहतींना त्यांच्या गरजा पुरवण्याचा प्रयत्न करतात. या प्रकारच्या नागरी वसाहती भारतात आढळत नाही.

**३) शहर :**

ज्या नागरी वसाहतीची लोकसंख्या सर्वसाधारणपणे ५०० ते १०००० पर्यंत आढळते. त्या वस्तीला शहर म्हणतात. शहरांची लोकसंख्या किती असावी यात मात्र मतभेद आहेत. काहींच्या मते शहराची लोकसंख्या ४०,००० ते ५०,००० असावी. भारतात शहराची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ज्या नागरी वस्तीची लोकसंख्या कमीतकमी ५००० असते व एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के लोकसंख्या शेतीशिवाय इतर उद्योग व्यवसायात गुंतलेले असतात. त्याला शहर असे म्हणतात. शहर म्हणजे महत्त्वाचे नगर होय. भोवतालच्या परिसरात त्याच्या इतकी महत्त्वाची कार्य करणारी व मोठी वस्ती अन्यत्र नसते. रस्ते / रेल्वेस्टेशन यांच्याजवळ या प्रकारच्या वस्तीचा विकास झालेला असतो. या वस्तीची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. निवासक्षेत्र व व्यावसायिक क्षेत्र असे दोन स्पष्ट भाग या वस्तीमध्ये आढळतात. बाजारपेठ, उद्योग, दुकाने, मंडई यासारख्यांचा समावेश व्यावसायिक क्षेत्रात होतो. निवास क्षेत्रात घरे, शाळा, दवाखाने, करमणूक केंद्रे आढळतात. अशा शहरी वस्तीमध्ये आठवड्यातून एखादा बाजार भरतो. तेथे मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री होते. रस्त्यांच्या दोन्ही बाजूला दुकाने असतात. व्यावसायिक क्षेत्र निर्माण झाल्यामुळे लोक आकर्षित होऊन शहरांची निर्मिती होते.

**४) नगर :**

या वस्तीची लोकसंख्या ५०,००० ते १,००,००० पर्यंत असते. भारतात ज्या वसाहतीची लोकसंख्या एक लाखापेक्षा जास्त आढळते त्याला नगर असे म्हणतात. १०,००,००० लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या नगराला दशलक्ष नगर असे म्हणतात. २० व्या शतकात अनेक दशलक्ष नगरे निर्माण झाली. लंडन हे जगातील पहिले दशलक्षी नगर असे म्हणतात.

munotes.in

१८५० साली परीसला तर १८६० साली न्युयॉर्कला दशलक्षी नगराचा मान मिळाला. सध्या दशलक्ष नगराची संख्या आशिया खंडात सर्वात जास्त आहे. एकूण जगातील दशलक्ष नगरापैकी ९० टक्के नगरे उत्तर गोलार्धात आहेत. त्यापैकी ४० टक्के शहरे ही शासकीय व राजधान्याची ठिकाणे आहेत. अशा नगरामध्ये सर्व प्रकारच्या नागरी सोई पुरवल्या जातात. या नगराचे कार्य बहुविध असते. उदा. निवास, विश्वविद्यालये, उच्च दळणवळण सुविधा, करमणुकीच्या सोई, उच्च न्यायालये इ.

**५) महानगर :**

ज्या नगरी वसाहतीची लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त असते तिला **महानगर** असे म्हणतात. महानगरे बहुधा प्रादेशिक राजधान्या / बंदरे / मोठी व्यापारी केंद्र असतात. उदा. तामिळनाडूची राजधानी मद्रास, गुजरातची राजधानी अहमदाबाद, आंध्रप्रदेशाची राजधानी हैदराबाद इ. या नागरी वसाहतीमध्ये विविध व्यवसायाचे केंद्रीकरण झालेले असते. या वसाहतीमध्ये अनेक लहानमोठ्या कारखान्याची निर्मिती झालेली आढळते. भारतात कलकत्ता, मुंबई, दिल्ली, हैदराबाद, बंगलोर, अहमदाबाद, कानपूर, जयपूर, भोपाळ, पाटणा यासारख्या शहरांचा समावेश महानगरामध्ये होतो. मॉस्को, पॅरिस, बर्लिन, हॅम्बुर्ग, लेनिनगॉड, सन फ्रॉनन्सिस्को, वॉशिंग्टन, बोस्टन, न्युयॉर्क, रंगून, लाहोर ही महत्त्वाची महानगरे होत. महानगराची लोकसंख्या वाढल्यास त्याला विशाल महानगर असे म्हणतात. उदा. न्यूयॉर्क, मुंबई, कलकत्ता इ. महत्त्वाची विशाल महानगरे आहेत. अशा महानगरामध्ये घाऊक, किरकोळ व्यापार, उच्च प्रतिच्या सेवा, कारखाने याचे केंद्रीकरण झालेले असते.

**महानगराची वैशिष्ट्ये :**

१) या नागरी वसाहतीची लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त असते.

२) या प्रकारची नगरे प्रादेशिक राजधान्याचे / व्यापाराचे मुख्य केंद्र असते.

३) या नागरी वसाहतीमध्ये लोकसंख्येची घनता दर चौ. कि.मी. जास्त असते.

४) या नागरी वसाहतीमध्ये अनेक व्यवसायाचे केंद्रीकरण झालेले असते.

५) या नगरात विविध विभाग असतात.

६) महानगरामध्ये अनेक निर्मिती उद्योग, व्यापार, वाहतुक, दळणवळण, व्यापारी व वित्तीय संस्था, शासकीय कचेर्या विविध प्रकारच्या सेवा केंद्रीत झालेल्या असतात.

७) श्रमिक वर्गाच्या घरांमुळे झोपडपट्ट्या निर्माण झालेल्या आढळतात.

८) उच्च प्रतीच्या सेवांची पूर्तता सर्व प्रदेशातील लोकांना पुरविली जाते.

९) सभोवतालच्या प्रदेशातून या महानगराकडे लोक आकर्षित होत असल्याने या शहरांची लोकसंख्या झपाट्याने वाढते.

### ६) संकलीत नगर / सन्नगर :

एखाद्या मोठ्या शहरा भोवतालच्या वसाहतीची खूप मोठ्या प्रमाणावर वाढ होते व तो मोठा भाग मुख्य शहराला जोडला जातो. त्यामुळे यातून मोठ्या वसाहतीचा पट्टा निर्माण होतो याला सन्नगर असे म्हणतात. १९३२ मध्ये प्रा. फॉसेट यांनी ग्रेट ब्रिटनमधील नागरी वस्तीचे वितरण या निबंधात संकलित शहराची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ज्या शहरात घरे, कारखाने, अन्य इमारती व शहरातील बागा, खेळाची मैदाने इ. दोन तीन शहरामध्ये सलगपणे आढळतात ती संकलीत शहरे होत. अशा शहरामध्ये कोठेही शेतजमीन नसावी. असा जरी सिद्धांत असला तरी आपल्याला प्रत्यक्षात मधून मधून शेते दिसून येतात. १९५१ साली इंग्लंडच्या मध्यवर्ती सांख्यिकी विभागाने संकलीत शहराची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. दोन तीन नागरीवस्त्या जेव्हा एकमेकांस सलगपणे जोडल्या जातात. तेव्हा त्या वसाहतीस संकलित नगर / सन्नगर असे म्हणतात. वरील सर्व व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की दोन / दोन पेक्षा जास्त नागरी वस्त्या एकत्र येऊन संकलित नगराची निर्मिती होते. अशा दोन तीन नागरी वस्त्यामध्ये व्यापाराच्या जागा, दुकाने, निर्मितीची ठिकाणे सामूहिक असू शकतात. पहिली नागरी वस्ती संपून दुसरी कोठे सुरु होते हे समजणे कठीण होते.

**संकलित नागरी वस्तीची वैशिष्ट्ये :**

१) दोन / दोनपेक्षा जास्त नागरी वस्त्या एकत्र येऊन संकलीत नगरांची निर्मिती होते.

२) शहरी वस्तीचा विकास बाहेरच्या बाजूला होत असतो.

३) अवजड उद्योगधंदे सभोवतालच्या ग्रामीण विभागात विभागले जातात. पुढे त्या ग्रामीण विभागाचे औद्योगिक विभागात रुपांतर होते. त्याचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होते. अशाप्रकारे नागरीकरणाची प्रक्रिया सुरु होते.

४) विभागातील रस्ते, रेल्वेमार्ग यांचा विकास होतो.

५) वाहतूक क्षेत्राच्या सभोवताली वसाहतीची वाढ होते. म्हणजे वाहतुकीच्या मार्गात जसजशी वाढ होत जाते तसतशी निवासस्थाने वाढत जातात. तेव्हा त्यास लागणार्या सुविधाही येथे नव्याने निर्माण होतात.

६) सभोवतालच्या ग्रामीण भागातील शेतीचे स्वरुप बदलत जाते. शहराला लागणारा भाजीपाला, दूध, उत्पादन इ. तेथे होऊ लागते.

७) निर्मिती प्रक्रिया सतत वाढत जात असल्याने या भागातील लोकसंख्या वाढू लागते. साहजिकच संकलित शहराचा त्या दिशेने विस्तार सुरु होतो.

**संकलित नागरी वस्ती विकसित होण्याची प्रक्रिया :**

शहरी वस्तीच्या सभोवताली ग्रामीण वस्तीत सुरुवातीला अवजड उद्योगधंदे सुरु होतात. आपोआपच शहरी वस्तीच्या बाहेर रस्त्याच्या / वाहतुक मार्गाचा विकास होतो. त्याच्या सभोवताली निवासस्थाने निर्माण होतात. आपोआपच सभोवतालच्या औद्योगिक भागाचे

munotes.in

स्वतंत्र विभाग न राहता त्याचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होते. सभोवतालच्या प्रदेशात नागरी वस्तीची वाढ होत असल्याने एकापेक्षा जास्त शहरे एकत्रित येतात. एक नागरी वसाहत कोठे संपते व दुसरी कोठे सुरु होते हे समजणे कठिण होते. त्याचे रुपांतर संकलीत नगरात होते. महाराष्ट्रातील पुणे व चिंचवड ह्या दोन्ही शहरी वस्तीच्या सभोवताली वाढ झाल्याने ही एक संकलित नागरी वस्ती तयार झाली आहे. मुंबई पासून कर्जतपर्यंत अनेक नागरी वस्ती एकत्रित येऊन एक सन्नगर तयार झाले आहे. सांगली-मिरज ही संकलित नगर वसाहत निर्माण झाली असून या दोन शहरी वस्तीच्या दरम्यान निवासस्थाने मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यामुळे मिरज शहर कोठे संपते व सांगली कोठे सुरु होते हे समजण्यास कठिण होत आहे. भारतात कलकत्ता-हावरा हे संकलित नगर हुगळी काठावर असून ताग, अवजड उद्योग, कापड, चहा, वितरण, रासायनिक उद्योग यामुळे त्याची वाढ झालेली आहे. मुंबई नवी मुंबई हे नवीन संकलीत नगर तयार झालेले आहे. औद्योगिक विकासाबरोबरच सामाजिक, राजकीय घटकही या संकलीत नगरास कारणीभूत झालेले आहेत. उत्तम वाहतुक व्यवस्था भरपूर पाणी व सपाट जागा, कुशल व शिक्षित मनुष्यबळ यामुळे ही संकलीत नगरे तयार होत आहेत. कर्नाटक राज्याची राजधानी बंगलोर हे एक संकलीत नगर आहे. कर्नाटक शासनाने नियोजनपूर्वक या शहराचे संकलीत नगरात रुपांतर केले आहे. सभोवतालच्या ७५ ग्रामीण वस्त्या यात सामावून घेतल्या आहेत. ग्रेट ब्रिटनमध्ये लॅकेशायर हे एक महत्त्वाचे संकलीत नगर आहे. येथे सुती वस्त्रोद्योगामुळे संकलीत नगराची निर्मिती झाली आहे. लोहपोलाद उद्योगधंद्याचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाल्याने बर्मिगहॅम हे संकलीत नगर निर्माण झालेले आहे. संयुक्त संस्थानात उद्योगधंद्यामुळे शिकागो गरी या संकलीत नगराची निर्मिती झालेली आहे. रशियातील कोळसा क्षेत्रात ५ शहरे एकत्रित येऊन मोठे सन्नगर तयार झाले आहे. फ्रॅंकफर्ट व त्याजवळील अनेक औद्योगिक नगरे एकत्रित येऊन मेन, हाईन नद्यांच्या संगमाजवळ प्रचंड संकलीत नगर तयार झाले आहे.

**७) प्रमहानगर / महाकाय नगर :**

ज्या नागरी वसाहतीची लोकसंख्या ५० लाखापेक्षा जास्त असते त्या नागरी वसाहतीला प्रमहानगर असे म्हणतात. यालाच विराट नगर/ अतिविशाल महानगर असेही म्हणतात. विशाल नगरे ही प्रामुख्याने बहुतेक बंदरे असतात. अशा नागरी वसाहतीमध्ये सागरीय व्यापार व अंतर्गत व्यापार यात सतत वाढ होत असल्याने प्रमहानगराची निर्मिती होते. या प्रकारच्या नगरात अनेक लहान मोठे व्यवसाय आढळून येतात. निवासस्थाने, प्रशासकीय विभाग, व्यापारी क्षेत्र इ. भाग वेगवेगळ्या ठिकाणी आढळून येतात. महाकाय नगराचे कार्य व्यापक स्वरुपाचे असल्याने कामाच्या निमित्ताने अनेक लोक एकत्रित येतात. यातून लोकसंख्येची घनता वाढत जाते. प्रचंड स्वरुपाची बाजारपेठ निर्माण होऊन अनेक प्रकारच्या उद्योगातून निर्माण होणारा माल या बाजारपेठेत विकला जातो. घाऊक व किरकोळ व्यापारी या प्रकारच्या शहरात मोठ्या प्रमाणात केंद्रीत झालेले असतात. काही विशाल नगरामध्ये विशिष्ट व्यवसायाचे विशेषीकरण झालेले आढळते. उदा. मुंबई - सुती कापड व्यवसाय, कलकत्ता - ज्युट उद्योग इ. अनेक नागरी क्षेत्राच्या एकत्रीकरणामुळे एका फार मोठ्या किंवा विशाल नागरी क्षेत्राचा उगम होतो. उदा. इशान्य संयक्त संस्थानाच्या सागरी किनार्यावर बोस्टन पासून दक्षिण वॉशिंग्टन पर्यंत एक विशाल नगरी क्षेत्र पहावयास मिळते. न्युयॉर्क हे याच पट्ट्यातील एक विशाल महानगर आहे. परीस, मुंबई, कलकत्ता,

munotes.in

शांघाय, टोकीयो, लंडन, मास्को, कैरो, पेकिंग ही अतिशय महत्त्वाची विशाल महानगरे होत. यातील बहतेक विशाल महानगरे राजधानीची ठिकाणे आहेत. उदा. चीनची राजधानी, पेकींग, जपानची राजधानी टोकीओ, रशियाची राजधानी मास्को इ.

**तुमची प्रगती तपासा :**

१) टीपा द्या.

१) प्रमहानगर

२) महानगर

३) नगर

## ४.२ नागरी वसाहतीचे स्थान व स्थिती

भूगोलाचा अभ्यास करत असताना वसाहतींना अग्रक्रम दिलेला आढळतो. व यालाच अनुसरुन नागरी भूगोलाचा अभ्यास व ग्रामीण वसाहती भूगोल यांचा अभ्यास केला जातो. अशा वसाहती भूगोलाचा अभ्यास करत असताना एखादे नगर कोणत्या स्थानी निर्माण झाले आहे व त्याच्या सभोवतालची परिस्थिती कशाप्रकारची आहे. म्हणजेच नगराचे स्थान व स्थिती या दोन घटकांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. नगराचे स्थान याचा अर्थ ज्या ठिकाणी ती नागरी वसाहत स्थापन झाली आहे त्या भूमिशी स्थानाचा अर्थ अभिप्रेत असतो. व स्थिती याचा अर्थ नागरी वसाहतीच्या सभोवतालच्या विस्तृत प्रदेशातील प्राकृतिक परिस्थितीशी अर्थ अभिप्रेत असतो. वरीलप्रमाणे स्थान व स्थिती यांचा अर्थ अभिप्रेत केल्यानंतर या दोन घटकांचा नगर वसाहत निर्मिती व नगर वसाहत विकास यासाठी काय वाटा आहे हे समजते. नागरी केंद्राच्या निर्मितीत व विकासात स्थान व स्थिती दोन्ही घटक अत्यंत महत्त्वाचे आहे. प्राचीनकाळाचा अभ्यास केल्यास नगराची होणारी निर्मिती ही संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण अशी होती. प्राचीन काळी निर्माण होणारी सर्वच नगरे, वसाहती या नद्यांच्या काठी स्थापन झालेली आढळतात. या मागचे कारण एकच आणि ते म्हणजे अशा वसाहतीना नैसर्गिक संरक्षण मिळते. नदीच्या जवळपास एखाद्या वसाहतीची निर्मिती झाल्यानंतर अशा वसाहतीवर शत्रूचे सहजासहजी आक्रमण होत नसते. कारण प्राचीन काळातील मानव हा प्रगत नसल्याने सहजासहजी नदी पार करुन येऊ शकत नाही. त्याप्रमाणे निर्माण केलेल्या वसाहतीच्या सभोवताली प्राचीन काळी कृत्रिम खंदकाची नि|मती केली जात असे. कारण संरक्षण करणे याच घटकाला प्राचीन काळामध्ये जास्त महत्त्व होते. परंतु अलीकडील विचार केल्यास वसाहतीच्या निर्मितीमागे आर्थिक घटकाला अधिक महत्त्व दिले गेलेले आढळते. आर्थिक घटकांची ज्या ठिकाणी जास्तीत जास्त उपलब्धता असणे शक्य आहे. अशा ठिकाणी सध्या शहराची निर्मिती झालेली आढळते. या बदलत्या दृष्टीकोनातून प्राचीन काळामध्ये निर्माण झालेल्या नगराची स्थाने बदलताना आढळतात. म्हणजेच सध्या अशा नगरांचे स्थलांतर होत आहे. हे बदलणार्या दृष्टीमुळेच होय. उदा. संयुक्त संस्थानमधील शिकागो हे शहर पूर्वी निशीगंध या सरोवराच्या अगदी जवळ स्थापन झाले होते. परंतु सरोवराला वारंवार येणार्या पुरामुळे

शहराचे नुकसान होवू लागले. त्यामुळे शिकागो या शहराची स्थापना सरोवरापासून दूर जमीन उंचावून त्यावर केलेली आढळते. त्याचप्रमाणे हे शहर ही पुर्नस्थापित आढळते.

**नागरी वसाहतीचे स्थान :**

नगर वसाहत स्थानाचा विचार करत असताना आपल्याला बर्याच गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. नगराचे स्थान निश्चित होत असताना त्यावर प्राकृतिक घटक वेगवेगळ्या प्रकारे परिणाम करताना आढळतात. मुबलक पाणी पुरवठा, समृद्धभूमी, एखादी महत्त्वाची नैसर्गिक साधनसंपत्ती इमारती बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या साधन सामुग्रीची सहज होणारी उपलब्धता नैसर्गिक आपत्ती पासून, शत्रुपासून लागणारे संरक्षण दळणवळणाच्या विविध सुविधा इ. घटकांच्या सहज उपलब्धतेच्या स्थानी ठिकाणी वसाहत निर्मिती झालेली आढळते. अशा वसाहतींचा होणारा विकास हा अतिशय जलद गतीने होणारा आढळतो. अलीकडच्या काळामध्ये नागरी वसाहती निर्मिती होत असते. अशी निर्मिती व्यापारी आणि औद्योगिक तत्वावर होते. अशा व्यापारी आणि औद्योगिक केंद्राची निर्मिती सध्या तरी दळणवळणाच्या मार्गावर झालेली आढळते. अशा वस्त्यांचा होणारा विकास हा जलद गतीने होत असतो व या होणार्या विकासातूनच अशा ठिकाणी उद्योगधंद्यामध्ये बर्याच प्रमाणात वाढ झालेली आढळते. ज्या ठिकाणी ग्रामीण वस्तीची निर्मिती झाली असेल अशा ग्रामीण वस्तीची नेहमीच ग्रामीण राहत नाही. कारण प्रत्येक केंद्राचा विकास हा होतच असतो. व या होणार्या विकासातून प्रथम निर्माण झालेल्या ग्रामीण वस्तीचे नागरी वस्तीत रुपांतर होवू लागते. याप्रकारे नगराच्या स्थानांवर विविध घटक वेगवेगळ्या परीने परिणाम करत असतात. नागरी भू-विज्ञानात नागरी वसाहत स्थानाचा अभ्यास करत असताना खालील घटक विचारात घ्यावे लागतात.

१) स्थानाच्या कोणत्या प्रमुख वैशिष्ट्यामुळे ती नागरी वसाहत त्या ठिकाणी स्थापन झाली आहे.

२) नागरी केंद्राच्या भुपृष्ठावर स्थानाचा कोणत्या विशेष रुपांचा प्रभाव पडला आहे.

३) त्या विशिष्ट स्थानाचा मूळ प्राकृतिक रुपाला बदलून मानवाने निर्माण केलेल्या नागरी केंद्राचे दृश्य कसे आहे.

## ४.३ नागरी वसाहतीचे स्थानानुसार प्रकार

नागरी वसाहती निर्मितीवर / विकासावर परिणाम करणारे विविध घटक आहेत. त्यानुसार नागरी वसाहती स्थानाचे खालील प्रकार पाडले जातात.

१) सुरक्षित स्थान / संरक्षित स्थान

    १) पर्वत / टेकडीवरील स्थान

    २) बेटाचे स्थान

२) साधनसंपत्ती स्थान

१) खनिजसंपत्ती स्थान

२) इतर संपत्ती

१) थंड हवेचे ठिकाण

२) नैसर्गिक जलउत्पत्ती स्थाने

३) सागर किनारा विश्राम केंद्रे

४) क्रीडा सुविधा

५) निसर्गदृश्य

६) धार्मिक / सांस्कृतिक केंद्रे

३) नदी किनार्यावरील नागरी केंद्रे

१) नद्याच्या संगमावरील नगरस्थाने

२) नद्याच्या वळणावरील नगरस्थाने

३) नद्याच्या उथळ स्थानावरील केंद्रे

४) नद्याच्या पुलाजवळील केंद्रे

५) नद्याच्या प्रवाहाच्या जलवाहतुक सीमेवर स्थापन झालेले केंद्र

६) जलविंदर

७) जलप्रपाताजवळील केंद्रे

८) नद्यांच्या सुपीक मैदानी प्रदेशातील नगरस्थाने

९) नदीच्या काठावरील जुळी शहरे

१०) सरोवराच्या किनार्यावरील नागरी केंद्रे

४) इतर नागरी स्थाने

१) सडकांची जंक्शने

२) रेल्वे जंक्शन

३) वायू मार्गावरील नगर स्थाने

४) सीमावर्ती स्थान

५) खिंड

munotes.in

६) तीर्थस्थाने

७) शैक्षणिक स्थाने

८) पर्यटन / स्वास्थ केंद्र

९) बंदरे

१०) राजधानी स्थाने

११) सैनिकी छावण्या

**१) संरक्षित स्थान :**

विविध नागरी वस्तीची होणारी निर्मिती ही एखाद्या ठिकाणावर अवलंबून असते. त्यामुळेच नागरी वसाहती निर्मिती स्थानाला, ठिकाणाला महत्त्व प्राप्त झालेले असते. स्थानावरुन नगराचे जे वेगवेगळे प्रकार पाडले जातात. त्यापैकी संरक्षित स्थान हा एक महत्त्वपूर्ण प्रकार होय. प्राचीन काळामध्ये ज्या वसाहती स्थापन होत होत्या अशा वसाहतींना संरक्षणाच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्त्व असे. अशा संरक्षणापोटीच वसाहतीची स्थापना गड, किल्ले, पर्वतीय भाग अशाच स्थानी झालेली आढळते. उदा. भारतामधील किल्ले - अहमदगड, वल्लभगड, महेंद्रगड इ. याचीच उदा. आहेत. काही वेळा संरक्षणाच्या दृष्टीकोनातून किल्यांना तटबंदी केली जात असे व त्यातून सुरक्षित स्थान निर्माण केले जाई. उदा. जयपूर, जोधपूर, आग्रा इ. तर काही वेळा संरक्षणाच्या दृष्टीकोनातून काही संरक्षण केंद्रे निर्माण केली जात असत. उदा. सुरत, पठाणकोट, अंबाला, पुणे इ. मुळे निर्माण केलेल्या संरक्षण केंद्राचे सध्याचे स्वरुप पाहिले असता त्याठिकाणी सैनिकी छावण्या निर्माण झालेल्या आढळतात. अशा वस्त्या निर्माण होण्यामागे त्या ठिकाणचे स्थान हाच घटक जबाबदार आहे. अशा संरक्षित स्थानाचे दोन प्रकार पडतात.

**अ) टेकडीच्या माथ्यावरील / पर्वतीय स्थान :**

प्राचीन काळ ज्या वसाहती अगर सैनिकी छावण्या निर्माण केल्या जात असत. त्याचे परकीय शत्रूपासून संरक्षण करता यावे यासाठी अशा वसाहती अगर सैनिकी छावण्या पर्वतीय भागामध्ये स्थापन केल्या जात असत. उदा. शिवाजी महाराजांनी केलेल्या छावण्या या सह्याद्री पर्वत रागांमध्ये आढळतात. तसेच स्काटलंडमधील एडीन बर्ग व स्टर्लिंग ही शहरे ज्वालामुखी उद्रेकापासून बनलेल्या शिखरावर स्थापलेली आहेत.

**ब) बेटाचे स्थान :**

संरक्षणाच्या दृष्टीकोनातून स्थानाला अतिशय महत्त्व प्राप्त होते. त्यामुळेच चारही बाजूंनी पाण्याने व्यापलेल्या भूखंडावर एखादे शहर / वसाहत स्थापन केली असता शत्रूपासून संरक्षण मिळू शकते. त्या उद्देशानेच नगर निर्मिती साठी बेटांचे स्थान निश्चित केले जाते. उदा. हिंदी महासागरातील बेटावर अमेरिकेने आपला लष्करी तळ उभारला होता. या लष्करी तळाच्या उभारणीसाठी भारताने कडवा विरोध दर्शविला होता. न्युयॉर्क, हाँगकाँग, सिंगापूर इ. शहरे ही या प्रकारची आहेत.

munotes.in

**२) साधनसंपत्ती स्थान :**

निसर्गामध्ये विविध प्रकारची संपत्ती उपलब्ध आहे. परंतु अशा निसर्गनिर्मित संपत्तीला साधनसंपत्ती ठरविणे हे मानवी कौशल्यावर व मानवी सांस्कृतिक पातळीवर अवलंबून असते. असे असले तरी काही संपत्ती निसर्गत:च निसर्गामध्ये उपलब्ध असते. अशा साधनसंपत्तीचा पूरेपूर वापर करण्याच्या उद्देशाने अशा सार्वजनिक संपत्तीच्या ठिकाणी मानव आपल्या वसाहती स्थापन करतो. यामुळेच त्या ठिकाणी निर्माण झालेल्या नगरांना साधनसंपत्ती स्थान या प्रकारात मोडता येते. उदा. विविध खनिजांवर आधारीत नगरे, मासेमारीवर आधारित शहरे यांची उदा. होय या साधनसंपत्ती स्थानाचे दोन प्रकार पडतात.

**अ) खनिजसंपत्ती / शक्तीसाधने :**

ज्या ठिकाणी विविध प्रकारचे धातू, खनिजतेल, रसायने इत्यादी भौतिक साधन संपत्ती मिळत असते अशा ठिकाणी भौगोलिक परिस्थिती कितीही प्रतिकुल स्वरुपाची असली तरी वसाहती स्थापन केल्या जातात. त्यांनाच खनिजसंपत्ती स्थाने म्हणता येईल. उदा. ऑस्ट्रेलियातील वाळवंटी प्रदेशात कुलगार्डी व कालगुर्ली या दोन ठिकाणी सोन्याच्या खाणी आहेत. त्यामुळे तेथे प्रतिकुल परिस्थिती असूनही शहरांची निर्मिती झाली आहे. उत्तर व कॅनडातील डसनासिटी इत्यादी शहरे तांब्याच्या खाणीने निर्माण झाली आहे. तर उत्तर व कॅनडातील नाटीलस्क हे निकेलच्या खाणीमुळे निर्माण झालेले शहर आहे. ज्या ठिकाणी लोह खनिज खाणी सापडतात त्या ठिकाणी वाहतुकीच्या समस्येमुळे खनिज मिळालेल्या ठिकाणी वसाहती स्थापन कराव्या लागतात. त्यातून साधनसंपत्ती स्थाने निर्माण होतात.

**ब) इतर संपत्ती :**

साधनसंपत्ती व शक्तीसाधने यांच्याशी नागरी वसाहती निगडीत असतात. त्याप्रमाणे काही ठिकाणी उत्तम समुद्र किनारे, अप्रतिम निसर्ग, मानवी जीवनास सौम्य व आल्हाददायक हवामान इ निसर्गातील घटकांच्या उपलब्धतेमुळे विविध ठिकाणी पर्यटन केले जाते. स्वास्थ केंद्रे निर्माण होतात व तीच नगरनिर्मितीच्या स्थानीय प्रकारात वर्गीकृत केली जातात ती खालीलप्रमाणे:-

**१) थंड हवेचे ठिकाण :**

उष्ण व समशितोष्ण कटिबंधातील पर्वतीय प्रदेशात काही ठिकाणी पर्यटन व स्वास्थ केंद्रे निर्माण झालेली असतात. कारण अशा ठिकाणी असणारे थंड हवामान मानवी जीवनास आल्हाददायक असते. यामुळे अशा ठिकाणी शहरे निर्माण होतात. उदा. भारतातील सिमला, मलेशियामध्ये व कॅमराल इ. थंड हवेची ठिकाण शहरे बनलेली आहेत.

**२) नैतिक जलउत्पत्ती स्थाने :**

बर्याच ठिकाणी खनिज झरे, उष्ण पाण्याचे झरे तर काही ठिकाणी आरोग्यवर्धक झरे यांची निर्मिती झालेली असते. अशा ठिकाणी वैद्यकिय लोक वेगवेगळ्या प्रकारची पाण्यातून औषधे मिळविण्यासाठी आपली वसाहत स्थापन करतात. या वसाहतीच्या ठिकाणी हळूहळू विकास होऊ लागतो. तसेच वरीलप्र कारचे प्रकार पाहण्यासाठी लोकांची ये-जा सुरु होते.

यातूनच अशा ठिकाणी स्वास्थ केंद्रे निर्माण होतात. उदा. जर्मनी मधील बडेन, महाराष्ट्रातील वज्रोश्वरी वरील प्रकारची उदाहरणे होय.

**३) सागर किनारा विश्राम स्थाने :**

काही देशांना उत्तम प्रकारचे समुद्र किनारे लाभलेले असून निसर्ग सौंदर्य अप्रतिम स्वरुपाचे असते. वेगवेगळ्या प्रकारचे बीच इत्यादी गोष्टी पाहण्यासाठी हजारो लोकांची ये-जा सुरु होते. अशा भागात शहराची निर्मिती होते. मुख्यत: थंड हवामानाच्या प्रदेशात पाश्चात्य राष्ट्रातील बरेच लोक ह्या सागर किनारावरील शहरात भरपूर सुर्यप्रकाश आहे. तेथे सुर्य स्नानासाठी जातात. यातूनच नगराचे स्थान निश्चित होते. संयुक्त संस्थानातील प्लोरीडा या शहरात समुद्रकिनार्यावर असे प्रकार आढळतात.

**४) क्रीडा सुविधा :**

एखाद्या पर्वतीय प्रदेशातील क्षेत्र हिवाळी खेळासाठी योग्य असेल तर खेड्याचे रुपांतर शहरामध्ये होण्यास कधीही वेळ लागत नाही. उदा. फ्रान्स, स्वीत्झर्लंड, ऑस्ट्रीया, इटली इ. ठिकाणी हिवाळी क्रीडा स्वास्थ केंद्राची स्थापना केलेली आढळते.

**५) निसर्गदृश्य :**

काही निसर्गरम्य ठिकाणे तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक ठिकाणे महत्त्वाची केंद्रे निर्माण केली जातात. उदा. परीस, रोम, सिंगापूर इ.

**६) सांस्कृतिक किंवा धार्मिक घटक :**

हा ही नागरी केंद्रावर परिणाम करणारे घटक आहे. मक्का, मदिना, जेरुसलेम ही जगातील मुस्लीम बांधवांची पवित्र क्षेत्रे आहेत. तर भारतातील काशी हे हिंदू धर्मातील लोकांचे सर्वात महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. याशिवाय मथुरा, कुरुक्षेत्र, नाशिक, पंढरपूर इ. केंद्रेसुद्धा याच प्रकारची उदाहरणे होय.

**३) नदी किनार्यावरील नागरी वसाहती :**

**अ) नद्याच्या संगमावरील :**

ज्या ठिकाणी दोन नद्या परस्परांना येऊन मिळतात. त्याच्या संगमावरील मध्यवर्ती स्थान नागरी वसाहतीच्या निर्मितीसाठी आदर्शस्थान म्हणून निवडले जाते. संयुक्त संस्थानमधील मिसीसिपी व मिसुरी नद्यांच्या संगमावरील सेंट लुईस, चीनमधील यांगात्सेयांग आणि हान यांच्या संगमावरील बूच्यांग, जर्मनीतील लहन, मोजेन नद्यांच्या संगमावरील कोबलेन्स ही स्थाने वरील प्रकारची आहेत.

**ब) नद्यांच्या वळणावरील नगर वसाहती :**

ज्या ठिकाणी नदीला मोठ्या प्रमाणात वळण प्राप्त झालेले असते किंवा नदीने आपला प्रवाह बदलेला असतो. अशा ठिकाणी एखाद्या नागरी वस्तीची निर्मिती होण्यास योग्य असे स्थान निर्माण झालेले असते. अशा भागात नदीप्रवाहाचा उतार त्यामुळे अशा ठिकाणापासून

उगमाकडील / मुखाकडील भागापर्यंत मालाच्या वितरणाची व्यवस्था करावी लागते. त्यामुळे तेथे व्यापार वाढीस लागते. म्हणजेच अशा भागात व्यापारी स्थानही निर्माण होते व त्याचे व्यापारी केंद्रात रुपांतर होते. उदा. ब्रिटनमधील डॉल नदीच्या वळणावरील सेफील्ड, चीनमधील हो हँग हो नदीच्या वळणावरील व कॅफन तर भारतात गंगा नदीच्या वळणावरील मिर्झापूर व पाटणा ही याच प्रकारची नागरी वसाहती होत.

**क) नदीच्या उथळ स्थानावरील नागरी वसाहती :**

ज्या ठिकाणी नदीचे पात्र उथळ असते, तेथून नदी सहजपणे पार करुन जाता येते. या एका तीरावरुन दुसर्या तीरावर होणार्या ये-जा मुळे अशा ठिकाणी व्यापार वाढण्याची शक्यता असते व त्यातूनच नागरी वसाहती निर्माण होऊ लागतात. उदा. जर्मनीतील हँबुर्ग, फ्रान्समधील रुआन, तर भारतातील वृंदावन, काल्पी, हमीतपूर इत्यादी केंद्रे याप्रकारची आहेत.

**ड) नद्याच्या पुलाजवळील नागरी वसाहत स्थाने :**

जलवाहतूक आणि त्याचबरोबर जमिनीवरील वाहतुकीचा विकास होण्यासाठी नद्यावर वेगवेगळ्याक ठिकाणी पूल बांधले जातात. असे पूल बांधलेल्या ठिकाणी जलवाहतूक व इतर वाहतूक यांचा संगम होतो व त्यामुळे अशा ठिकाणी नागरी केंद्राची निर्मिती होऊ लागते. उदा. रशियातील ओमस्क हे जगप्रसिद्ध उदाहरण आहे.

**इ) नदीप्रवाहाच्या जलवाहतुक सीमेवर स्थापन झालेली नागरी वसाहती :**

पर्वतीय भागातून वाहत येणारी नदी ज्यावेळी मैदानी प्रदेशात प्रवेश करते त्यावेली तिचा वेग मंद होऊन त्यापुढील पात्र ह्या अर्थाने जलवाहतुकीस योग्य ठरते. नदीप्रवाहात ज्या ठिकाणापर्यंत जलवाहतूक केली जाते त्या ठिकाणच्या सीमावर्ती भागात नागरी वसाहतीची स्थापना होते, त्यालाच नदी वाहतुक सीमेवर स्थापन झालेली नागरी वसाहत असे म्हणतात. उदा. माँट्रीयल, दिब्रुगड ही यांचीच उदाहरणे आहेत.

**फ) जलविंदर :**

नदी ज्या ठिकाणी पर्वतीय भागातील कड्यापासून जाते अशा ठिकाणी पर्वतीय प्रदेशातील अनेक मार्ग येऊन मिळालेले असतात. त्या ठिकाणी नागरी वसाहतीची निर्मिती होते. ग्रेट ब्रिटनमधील लिंकन शहर, विथम नदीच्या जलविदरावरच स्थापन झालेले आहे.

**म) जलप्रपातां जवळील नागरी वसाहत :**

नदी जेव्हा पर्वतीय प्रदेशातून वाहत असते तेव्हा तिच्या प्रवाह मार्गात अनेक जलप्रपातांची निर्मिती होऊ शकते. जलविद्युत प्रकल्प उभारण्यासाठी अशी स्थाने अत्यंत महत्त्वाची असतात. अशा ठिकाणीच बरेचसे जलविद्युत प्रकल्प उभारले जातात. त्यामुळे सभोवतालच्या प्रदेशाचा औद्योगिक विकास होऊ शकतो व नागरी केंद्राची स्थापना होते. संयुक्त संस्थानामधील पिडमॉंड पठारावरुन वाहत येणार्या नद्याच्या जलप्रपातांच्या ओळीतील नगरात लॉवेल लॉरेन्स ही महत्त्वाची नागरी केंद्रे आहेत.

**ल) नद्यांच्या सुपीक मैदानी प्रदेशातील नगरस्थाने :**

मानवी संस्कृतीचा उदय व विकास हा नद्यांच्या खोर्यातच झालेला आहे. नद्यांच्या गाळापासून बनलेली सुपीक जमीन शेतीस अत्यंत उपयुक्त समजली जाते. यामुळेच नद्यांच्या खोर्यात शेती हा व्यवसाय अधिक प्रगत झालेला आपणास पहावयास मिळतो. शेतीबरोबरच अशा ठिकाणी शेतमालावर आधारीत अनेक उद्योगधंदे स्थापन होऊ लागतात. नदीतून जलवाहतूकीचा फायदा मिळतोच. परंतु याशिवाय सपाट मैदानी प्रदेश असल्याने रस्ते व लोहमार्ग यांचा देखील चांगला विकास झालेला असतो. त्यामुळे व्यापार वाढण्यास मदत होते. आणि अशा ठिकाणी पूर्वीच्या ग्रामीण वसाहतीचे नागरी वसाहतीत रुपांतर होते किंवा नव्याने देखील नागरी वसाहतीची निर्मिती होते. ब्रिटनमधील ग्लासगो, फ्रान्सनमधील परीस, भारतातील कानपूर, बनारस या शहराची स्थाने याप्रकारची आहेत. महाराष्ट्रातील कोल्हापुर हे शहर पंचगंगा नदीच्या खोर्यात वसलेले आहे.

**व) नदीच्या काठावरील जुळी शहरे :**

काही नदीच्या दोन्ही किनार्यावर समोरासमोर दोन केंद्रांची स्थापना झालेली असते. भारतातमधील हुगळी नदीवर कलकत्ता व हावडा ही या प्रकारची शहरे आहेत.

**श) सरोवराच्या किनार्यावरील नागरी वसाहती :**

सरोवरामुळे स्वस्त जलवाहतुकीचा फायदा मिळतो. अशा ठिकाणी व्यापार, उद्योगधंदे वाढून नागरी वसाहतीची निर्मिती होते. संयुक्त संस्थानात पंचमहासरोवराच्या काठी अनेक महत्त्वाची नागरी केंद्रे आहेत. ही पंचमहासरोवरे सेंट लॉरेन्स नदीने अटलांटिक महासागराला जोडली गेली आहेत. यामुळेच संयुक्त संस्थानामध्ये अंतर्गत जलवाहतुक विकसीत झाली आहे व पंचमहासरोवराच्या काठी निर्माण झालेली काही नागरी वसाहती व्यापारी व औद्योगिक वसाहती प्रसिद्धीस आली आहेत. मिशीगन सरोवराच्या काठी शिकागो हे प्रसिद्ध व्यापारी केंद्र आहे. स्वित्झलँडमधील जिनीव्हा, ब्रिटनमधील केसविक ही या प्रकारची नागरी केंद्रे आहेत.

**४) इतर नागरी वसाहत स्थाने :**

**अ) सडकांचे स्थान / जंक्शने :**

दोन किंवा अधिक वसाहतीमधील संपर्क वाहतुक व्यवस्थेनेच साधलेला असतो. सर्व ठिकाणी सर्वच वाहतुक पद्धतीचा विकास झालेला नसतो. परंतु सर्वसामान्यपणे रस्ते किंवा सडकांची वाहतुक सर्व ठिकाणी उपलब्ध असते. पक्के रस्ते, हमरस्ते किंवा राष्ट्रीय महामार्ग यांच्या कडेला अनेक नागरी केंद्राची निर्मिती होते ज्या ठिकाणी अनेक दिशांना रस्ते येऊन मिळतात. त्या ठिकाणी मोठ्या व्यापारी वसाहतीचा विकास जलद गतीने होऊ लागतो. भारतात जबलपूर, नागपूर, अहमदाबाद, सोलापूर या शहरांना अशी स्थाने लाभलेली आहेत. या शहरांचा व्यापार दिवसेंदिवस वाढत आहे.

munotes.in

**ब) रेल्वे जंक्शन :**

जमिनीवरील वाहतुकीमध्ये लोहमार्गाना विशेष महत्व दिले जाते. अवजड व मोठ्या आकाराच्या मालाच्या वाहतुकीसाठी लोहमार्गाची वाहतुक अधिक सोईस्कर असते. ज्या ठिकाणी अनेक दिशांनी लोहमार्ग येऊन मिळतात. तेथे मोठ्या नागरी वस्त्यांची निर्मिती होते. असे स्थान व्यापारी दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. संयुक्त संस्थानामधील शिकागो हे शहर रेल्वे जंक्शनचे जगप्रसिद्ध उदाहरण आहे. तेथे अनेक दिशांनी रेल्वेमार्ग येऊन मिळाले आहेत. भारतात नागपूर, दिल्ली, मोगलसराई, कानपूर, लखनऊ, मिरज या शहरांची स्थाने या प्रकारची आहेत.

**क) वायू मार्गावरील नागरी वसाहती :**

हवाई वाहतुकीसारख्या सुधारित दळणवळणाच्या साधनांनी आज जग लहान होत चालले आहेत. आर्थिकदृष्ट्या प्रगत देशामध्ये हवाई वाहतूक अधिक विकसीत झालेली आहे. ज्या ठिकाणी वायु मार्गाच्या दळणवळण साधनाचा विकास झालेला असतो तेथे मोठ्या नागरी वसाहतींची निर्मिती होते. अशा वसाहती व्यापारी केंद्र म्हणूनच प्रसिद्धीस येतात. आंतरराष्ट्रीय वायुमार्गावरील लंडन, पॅरीस, फ्रॅंकफर्ट, टोकीयो, मॉँस्को, सिंगापूर, सिडनी, मुंबई, दिल्ली, कराची ही प्रसिद्ध नगरे आहेत.

**ड) सीमावर्ती स्थान :**

दोन प्राकृतीक किंवा राजकीय प्रदेशाच्या सीमा भागात अशी काही स्थानके असतात की ती नागरी वसाहतीच्या उत्पत्तीत व विकासात अत्यंत उपयुक्त ठरतात. अशी स्थाने व्यापार वृद्धीसाठी पोषक असतात. शिवाय अशा स्थानाला संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झालेले असते. एकाच प्रदेशातील भिन्न प्राकृतिक सीमेवर स्थापित वसाहती व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. पर्वतीय प्रदेश व मैदानी प्रदेश जेथे परस्परांना मिळतात. तेथे व्यापारी नागरी वसाहती निर्मिती होते. भारतातील हिमालयाच्या पायथ्यालगत देहरादून, पठाणकोट या शहरांची निर्मिती वरील प्रकारच्या सीमा प्रदेशात झालेली आहे. तसेच स्वित्झर्लंडमधील ज्युरक, अर्जेन्टिनामधील साल्टा ही शहरे देखील पर्वतीय व मैदानी प्रदेशाच्या सीमा भागातच स्थापन झालेली आहेत. याचप्रकारे वाळवंटी प्रदेश व गवताळ प्रदेश यांच्यातील सीमा देखील नगरवृद्धीस उपयुक्त असतात. आफ्रिकेतील फआ आणि जिंदर अशाच सीमा भागातील शहरे आहेत. वाळवंटी प्रदेशाच्या सुरुवातीच्या ठिकाणी शहरांची निर्मिती होते. आफ्रिकेतील सहारामध्ये सरोवराच्या काठावरील जलवाहतुकीमुळे टिंबक्टू शहराची निर्मिती झाली आहे. दोन देशाच्या राजकीय सीमा प्रदेशात देखील नागरीकेंद्राची निर्मिती झाली आहे. दोन देशाच्या राजकीय सीमा प्रदेशात देखील नागरी केंद्राची निर्मिती होऊ शकते. देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अशा ठिकाणाला अधिक महत्व येते. भारतातील अमृतसर व फिरोजपुर या शहरांना या गोष्टीमुळेच महत्व आले आहे.

**इ) खिंड :**

पर्वतीय प्रदेशातील मार्ग खिंडीतूनच काढलेले असतात. पर्वत ओलांडून जाण्यासाठी खिंडी अत्यंत उपयुक्त ठरतात. पर्वतीय प्रदेशात तेथील प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे दळणवळणाचा विकास फारसा झालेला नसतो. त्यामानाने खिंडीतून वाहतुक सुविधा

चांगल्या असतात. पर्वतीय प्रदेशातील खिंडी नगरांच्या विकासासाठी उपयुक्त स्थाने असतात. आणि तेथे मोठ्या व्यापारी नगरांची निर्मिती होऊ शकते. या खिंडी जर देशाच्या सीमा भागात असतील तर अशा ठिकाणाला संरक्षणाच्या दृष्टीने देखील अधिक महत्व असते. त्यामुळे येथे सैन्य ठेवले जाते. खिंडीतील स्थापित नगरामध्ये पाकिस्तानमधील पेशावर आणि भारतातील ईशान्य भागातील इम्फाळ ही महत्वाची नगरे आहेत.

**प) तीर्थस्थाने :**

काही ठिकाणांना धार्मिकदृष्ट्या महत्व प्राप्त झालेले असते. अशा ठिकाणी एखाद्या महापुरुषाचा जन्म झालेला असतो किंवा तेथे मंदिर, मशीद किंवा चर्च असतात. एखाद्या पवित्र नदीच्या काठावरील एखाद्या स्थानाला देखील तीर्थस्थान मानले जाते. अशा ठिकाणी धार्मिक प्रवृत्तीचे अनेक लोक भेटी देतात. त्यामुळे अशी स्थाने देखील नागरी वस्तीच्या विकासासाठी आदर्श समजली जातात. भारतातील बनारस, प्रयाग, गया, पाटणा, हरिद्वार, हृषिकेश, अमृतसर, जुनागड, मदुरा, रामेश्वर, द्वारका ही तीर्थस्थाने आहेत. आपल्या महाराष्ट्रातील पंढरपूर, नाशिक ही शहरे देखील या प्रकाराचीच आहेत. मक्का, मदिना जेरुसलेम, रोम ही जगातील महत्त्वाची तीर्थस्थाने आहेत. वरील सर्व नागरी वसाहती धार्मिक म्हणूनच प्रसिद्धीस आलेली आहेत. काही तीर्थ क्षेत्रात मोठमोठ्या यात्रा व कुंभमेळे भरतात. यामुळे अशा ठिकाणी व्यापार विकसीत झालेला आहे.

**फ) शैक्षणिक स्थाने :**

पूर्वी धार्मिक केंद्राजवळच शैक्षणिक केंद्रे असत. कारण शिक्षणावर धार्मिक विचारसरणींचा पगडा बसलेला होता. त्यामुळे अशा केंद्राना तर पूर्वीपासूनच महत्व आहे. परंतु अलिकडे काही शैक्षणिक केंद्रे केवळ शैक्षणिक उद्देशासाठी उभारली जात आहे. ज्या ठिकाणी एखादे विश्वविद्यालय / एखादी महत्वाची शैक्षणिक संस्था असते. अशा ठिकाणी अशा केंद्राची स्थापना होण्याची शक्यता असते. कारण तेथे हजारो लोक शिक्षण घेण्यासाठी येऊन राहतात. त्यांना योग्य त्या सुविधा पुरविण्यासाठी व्यापारी व इतर लोक येऊन राहतात व अशाप्रकारे तेथे नागरी केंद्राची निर्मिती होते. या केंद्रांना शैक्षणिक केंद्रे म्हणूनच प्रसिद्धी आलेली असते. जर्मनीतील इडेनबर्ग, इटलीमधील बोलौग्रा, इंग्लंडमध्ये ऑक्सफर्ड, कैब्रीज, संयुक्त संस्थानमध्ये प्रिकेटोन, हॉरवर्ड, भारतातील बनारस, अलीगढ, शांतीनिकेतन, पुणे ही शैक्षणिक केंद्रे म्हणून प्रसिद्ध आहेत.

**ब) पर्यटन केंद्रे :**

पर्वतीय प्रदेशातील थंड हवामानाच्या ठिकाणी किंवा जेथे उत्तम समुद्रकिनारा लाभलेला आहे. अशा ठिकाणी हजारो लोक पर्यटनासाठी व स्वास्थ प्राप्तीसाठी येऊन राहतात. तर काही हौशी लोक अशा ठिकाणाला भेटी देतात. या लोकांना योग्य त्या सुविधा पुरविण्यासाठी व्यापारी व इतर लोक येऊन राहतात. त्यामुळे अशा ठिकाणी नागरी केंद्राची निर्मिती होते. अशा शहरांना हॉलीडे कॅंप असेही म्हणतात. आपल्या भारतात सिमला, मसुरी, नैनिताल, दार्जिलिंग, महाबळेश्वर ही या प्रकारची शहरे आहेत. इटलीमधील जिनीव्हा, संयुक्त संस्थानमधील न्यूजर्सी ही जगातील अन्य काही उदा. आहेत.

**भ) बंदरे :**

जेथे जलवाहतुक साधने थांबविण्यासाठी सुविधा असते. अशा समुद्र किनारी बंदरांची निर्मिती होते. बंदरांच्या पार्श्वभूमीशी संपर्क साधण्यासाठी रस्ते, लोहमार्ग, रेल्वेमार्ग यांचे देखील जाळे विणले जाते. बंदरातूनच देशाचा आयात-निर्यात व्यापार चालतो. व्यापारी उलाढालीचे ते प्रमुख केंद्र बनते. न्युयॉर्क, लंडन, कोलंबो, सिंगापुर, याकोहामा, मुंबई, मद्रास, कलकत्ता ही जगातील प्रसिद्ध बंदरे आहेत.

**म) राजधानी छावण्या :**

एखाद्या देशाचे किंवा राज्याचे हे प्रशासकीय केंद्र असते. देशाच्या प्रशासनाचे कार्य तेथे चालते. दिल्ली, वॉशिंग्टन, मास्को, लंडन, कैरो ही जगातील काही महत्वाची देशांच्या राजधानीची ठिकाणे आहेत.

**य) सैनिकी छावण्या :**

भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी प्रत्येक देशाचे मिलीटरी कँपस असतात. अशा ठिकाणी देखील नागरी केंद्रांची निर्मिती होऊ शकते. भारतातील मिरज, अंबाला, दिल्ली, पुणे या ठिकाणी महत्त्वाच्या सैनिकी छावण्या आहेत.

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरी वस्त्यांच्या विविध स्थानांची माहिती द्या.

## ४.४ नागरी वसाहतीची स्थिती

एखाद्या नागरी वसाहतीच्या स्थापनेवर स्थितीचा अधिक परिणाम होत असतो. स्थिती म्हणजे ज्या ठिकाणी नागरी वसाहत स्थापन झाली त्या सभोवतालच्या प्रदेश म्हणजे नागरी प्रदेशाचा सभोवतालच्या प्रदेशाशी संबंध असतो. वसाहतीची सभोवतालच्या प्रदेशात प्राकृतिक परिस्थितीचा अर्थ येतो. त्याचप्रमाणे राजकीय भूविज्ञानाचा समावेश होतो. राजकीय भूविज्ञानात सीमाचा अभ्यास महत्त्वाचा असतो. नागरी केंद्राच्या अभ्यासात देखील नगराच्या सिमा महत्त्वाच्या असतात. कारण यावरच नगराचे कार्य अवलंबून असते. प्रत्येक नागरी वसाहती ही सभोवतालच्या प्रदेशाचे महत्त्वाचे केंद्र असते. त्यामुळे सभोवतालच्या प्रदेशाला नागरी वसाहतीचे फायदे मिळत असतात. याउलट त्या नागरी वसाहतीच्या स्थानाच्या सभोवताली असलेल्या विस्तृत प्रदेशाला उमलँड किंवा पार्श्वभूमी किंवा प्रभावक्षेत्र किंवा नागरीक क्षेत्र किंवा सहाय्यक क्षेत्र किंवा धारणा क्षेत्र किंवा भौगोलिक प्रांत असे म्हणतात. कोणत्याही नागरी वसाहतीचे प्रभाव क्षेत्र जितके समृद्ध असेल तितका तिचा अधिक विकास झालेला असतो.

१) रेषात्मक स्थिती :

अ) काफीला वस्ती-स्थाने

ब) मार्गरोधक

munotes.in

क) मार्गबदल केंद्रे

ड) मार्ग केंद्रीकरण

२) सीमावर्ती स्थिती :

अ) पर्वतीय व सखल प्रदेशीय सीमावर्ती स्थित नगरे

ब) वाळवंटी व गवताळ प्रदेशीय सीमावर्ती स्थित नगरे

क) किनारी स्थित नगरे

ड) विकसित व अधिविकसित प्रदेशाच्या सीमावर्ती स्थित नगरे

इ) सीमावर्ती राजधान्या

३) मध्यवर्ती स्थिती :

अ) कृषी क्षेत्र

ब) खनिज क्षेत्र

क) परिवहन केंद्र

ड) औद्योगिक केंद्रे

इ) प्रादेशिक केंद्रे

फ) मध्यवर्ती स्थित राजधान्या

**१) रेषात्मक स्थिती :**

एखाद्या महत्त्वाच्या व्यापारी मार्गावर बर्याचशा वसाहतीची निर्मिती होत असते. मालाची वाहतुक करीत असताना मार्गात एखाद्या वेळी मुक्काम पडण्याची शक्यता असते किंवा काही विशिष्ट ठिकाणापासून वाहतूक मार्ग प्रकारामध्ये बदल होतो किंवा काही ठिकाणी अनेक दिशांनी वाहतुक मार्ग येऊन मिळालेले असतात किंवा त्या ठिकाणापासून बाहेरत जातात अशा ठिकाणी नागरी केंद्राची निर्मिती होण्यास आदर्श परिस्थिती असते.

**अ) काफीला वस्ती :**

प्राचीन काळी वाहतुक व्यवस्थेमध्ये आजच्या इतकी प्रगती झालेली नव्हती. दिवसभर प्रवाशांचे तांडे किंवा काफिले रात्री मार्गावरील एखाद्या सोईस्कर ठिकाणी मुक्काम करीत असत. अशा ठिकाणी अन्न, पाणी, राहण्याची व्यवस्था, जनावरांना चारा, वस्तुच्या संग्रहासाठी गोदामे या सुविधा असत. यामुळे अशा ठिकाणी प्राचीन व्यापारी मार्गावर अनेक नागरी वसाहतीची निर्मिती झालेली आहे.

munotes.in

आधुनिक काळात जलद प्रवासाची सोय असली तरी प्रवासाने थकलेल्यांसाठी खाण्यापिण्यासाठी किंवा मुक्कामासाठी प्रवासी उतरतात. अशा ठिकाणी नागरी केंद्राची निर्मिती झालेली आहे.

**ब) मार्गरोधक :**

वाहतुक मार्गात अनेक कारणामुळे काही ठिकाणी अडथळे निर्माण होतात. पर्वतीय प्रदेशामध्ये खिंडीतून मार्ग काढलेले असतात. ती पर्वतरांगा ओलांडण्यासाठी खिंडीतून जावे लागते. त्यामुळे अशा खिंडीच्या ठिकाणी अनेक भागातून रस्ते येऊन मिळतात. किंवा काही सागर मार्गावर चिंचोळ्या समुद्र किनारी मुद्दाम बंदरे बांधलेली असतात. त्यामुळे जलवाहतुकीवर ताबा ठेवणे सोईस्कर होते. वरील दोन्ही जकातनाकी असतात. त्यामुळे अशा ठिकाणी प्रवाशांना किंवा व्यापार्यांना उतरुन तेथील जकात कर भरावा लागतो. त्यामुळे वरील ठिकाणी देखील नागरी वसाहतीची निर्मिती होते. कोपहेगेन, इस्तंबुल, सिंगापूर ही शहरे वरील प्रकारची नागरी वसाहतीची उदाहरणे आहेत.

**क) मार्गबदल केंद्रे :**

ज्यावेळी खुल्या महासागरावरील वाहतुक संपवून जहाजे जेव्हा, सागर किनारपट्टीवरील बंदराच्या ठिकाणी येतात तेव्हा तेथे माल उतरतात व तो भूमार्गाने (रस्ते, लोहमार्ग) देशाच्या अंतर्गत भागापर्यंत पाठवला जातो किंवा देशाच्या अंतर्गत भागातील माल विविध प्रकारच्या भूमार्गावरुन बंदराच्या ठिकाणी येतो व पुढे जलमार्गाने इतर देशांना पाठवला जातो. जेथे बंदराची निर्मिती होते तेथे मोठ्या नागरी वसाहतीची निर्मिती होते.

**ड) मार्ग केंद्रीकरण :**

दोन किंवा अधिक मार्ग ज्या ठिकाणी येऊन मिळतात, तेथे मोठ्या नागरी वसाहतींची निर्मिती होऊ शकते किंवा काही ठिकाणी नद्या, कालवे यामधून होणारी वाहतुक तसेच रस्ते, लोहमार्ग यातून होणारी वाहतुक व्यवस्था एखाद्या ठिकाणी उपलब्ध असते. अशा ठिकाणी देखील नागरी केंद्रांची निर्मिती होऊ शकते.

**२) सीमावर्ती स्थिती :**

दोन भिन्न प्राकृतिक रचना असलेल्या सीमा भागात काही नगरांची निर्मिती होते. अशा नागरी वसाहतींच्या भिन्न-भिन्न प्रदेशातील वस्तू येत असल्याने त्यामध्ये बरीच विविधता असते. परिणामी अशा नागरी वसाहती व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्धीस येतात. सीमावर्ती स्थिती असलेल्या नगरांची उदाहरणे खाली दिली आहेत.

**अ) पर्वतीय व सखल प्रादेशिक सीमावर्ती स्थित नगरे :**

ज्या ठिकाणी डोंगराळ किंवा पर्वतीय प्रदेश व सखल प्रदेश परस्परांना येऊन मिळतात. त्यांच्या सीमा भागात काही नागरी वसाहतीची निर्मिती होते. नगराची अशी स्थिती व्यापार वृद्धीसाठी आदर्श समजली जाते. पर्वतीय प्रदेशातील माल सखल प्रदेशात किंवा इतर प्रदेशात पाठवण्यासाठी तो माल प्रथम अशा नागरी केंद्रातच येतो. व पुढे त्याचे वितरण केले जाते. जर्मनीमधील हैनोव्हर, लिवाझिंग, ड्रेसनडन / संयुक्त संस्थानातील अपेलेशियन

पर्वताच्या पूर्व पायथ्यावरील फिलाडेल्फिया, बाल्टीमोर, रिचमॉंड आणि भारतातील हिमायलायच्या दक्षिण पायथ्याशी असलेली कालका, डेहराडून या प्रकारचीच नागरीकेंद्रे आहेत.

**ब) वाळवंटी व गवताळ प्रदेशीय सीमावर्ती स्थित नगरे :**

शुष्क व कोरडे हवामान विभाग असलेले वाळवंटी प्रदेश व गवताळ प्रदेश यांच्यातील सीमा भागात देखील नागरी केमद्रांची निर्मिती होऊ शकते. यामुळे दोन भिन्न हवामानाच्या प्रदेशातील वस्तूच्या उत्पादनाचे अशा केंद्रात प्रथम केंद्रीकरण केले जाते व पुढे त्याचे वितरण केले जाते. टिंबक्टू, कैरो ही अशाच प्रदेशातील स्थित नगरे आहेत.

**क) किनारी स्थित नगरे :**

ज्या भूमीला सागरी सीमा लाभलेली असते. तेथे अनेक लहान-मोठ्या नगरांची निर्मिती होते. सागरातून केली जाणारी मासेमारी व त्यावर प्रक्रिया करणारे विविध व्यवसाय अशा ठिकाणी वाढतात. तसेच सभोवतालच्या भूप्रदेशाला येणार्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे विविध व्यवसाय अशा ठिकाणी वाढतात. तसेच विविध कारखाने अशा वसाहतीत वाढीस लागतात. सागर किनार्यावरील काही शहरे महत्त्वाची बंदरे देखील असू शकतात.

**ड) विकसित व अर्धविकसित प्रदेशाच्या सीमावर्ती स्थित नगरे :**

एकाच देशातील सर्व प्रदेश सारख्याच प्रमाणात आर्थिक दृष्ट्या विकसीत झालेला नसतो. संयुक्त संस्थानाच्या पूर्व भागाच्या मानाने मध्य पश्चिम भाग फारसा विकसीत झालेला नाही. अशा भागाच्या सीमावर्ती प्रदेशात देखील नागरी वसाहतीची निर्मिती होते. संयुक्त संस्थानामध्ये पश्चिम मध्य भागातील अविकसीत गवताळ प्रदेश व पूर्वेकडील विकसित औद्योगिक प्रदेश यांच्या सीमा भागात अनेक नागरी वसाहती निर्माण झाल्या आहेत किंवा विकसित पश्चिम रशिया व अर्धविकसित पूर्व रशिया (सैबेरिया) यांच्या सीमा भागातील व्हरकोयान्सक, इर्कृतर्टस्क, क्रान्सोयॉस्क ही महत्त्वाची नगरे आहेत.

**इ) सीमावर्ती राजधान्या :**

काही देशांच्या राजधान्या सामाजिक सीमा प्रदेशात मुद्दाम स्थापन केलेल्या असतात. वास्तविक पहाता हे राजधानीच्या ठिकाण आदर्श वाटत नाही. कारण संरक्षणाच्या दृष्टीने असे ठिकाण आदर्श नसते. परंतु अशा स्थानाचे देखील काही महत्त्वाचे फायदे आहेत. त्यातला महत्त्वाचा घटक म्हणजे देशाच्या इतर भागाशी तुलना करता सीमावर्ती भागातून इतर भागाचे संरक्षण केले जाते त्यामुळे अशा भागांना महत्त्व येत जाते.

**३) मध्यवर्ती स्थिती :**

मध्यवर्ती किंवा केंद्रीय स्थिती यामध्ये तीन घटकांचा विचार केला जातो. साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या प्रदेशाच्या मध्यवर्ती ठिकाण तसेच देशातील मध्यवर्ती राजधानीचे ठिकाण किंवा देशाच्या मध्यवर्ती असलेली इतर ठिकाणे यांचा अभ्यास केला जातो.

munotes.in

**अ) कृषी क्षेत्र :**

सुपीक जमीन, अनुकुल हवामान व जलसिंचनाच्या सोई जिथे चांगल्या असतात तेथे शेतीचा चांगला विकास होतो. अशा प्रदेशातून विविध कृषी उत्पादने घेतली जातात. त्यांची खरेदी, विक्री करण्यासाठी तेथे नागरी केंद्रांची निर्मिती होते. उदा. संयुक्त संस्थानामधील मनफिस, जॅक्सन इ.

**ब) खनिज क्षेत्र :**

ज्या प्रदेशात खनिजाच्या उत्खननाला सुरुवात झालेली आहे. त्याच्या जवळपासच्या प्रदेशात नागरी केंद्राची स्थापना होते. अशा ठिकाणी खाणीत काम करणारे लोक राहतात. त्यांना आवश्यक त्या सेवा पुरवण्यासाठी व्यापारी व इतर लोक येऊन राहतात. याच क्षेत्रात खनिजांवर आधारीत नागरी वसाहतीची स्थापना होते. भारतातील राणीगंज, झारीया, ब्रिटनमधील शेफील्ड.

**क) परिवहन केंद्र :**

ज्या क्षेत्रामध्ये दळणवळणाच्या सोईंचा चांगला विकास झालेला असतो. तेथे नागरी वसाहतीची स्थापना होऊ शकते. या ठिकाणी मालाचे एकत्रीकरण, वितरण केले जाते. अशा ठिकाणी मालाची गोदामे असतात. तेथे मालाचे एकत्रीकरण, वर्गीकरण, पॅकींग, वितरण हे व्यवसाय चालतात.

**ड) औद्योगिक केंद्रे :**

ज्या प्रदेशात कृषी उद्योगधंद्याशिवाय विविध प्रकारची खनिजे मिळतात तेथे औद्योगिक वसाहतींचा विकास होऊ शकतो. ज्यावेळी एखादे नगर एखाद्या उद्योगधंद्यासाठी प्रसिद्धीस येते त्यावेळी तेथे विविध उद्योगधंदे स्थापन होऊ लागतात. अशी केंद्रे इतर प्रदेशातून कच्चा माल मागवतात. व त्याच्या मोबदल्यात तयार माल पाठवतात. जगातील प्रसिद्ध औद्योगिक क्षेत्रात मुंबई कापड उद्योग टाटानगर, लोखंड, पोलाद, कानपूर, चर्म उद्योग इ.

**इ) प्रादेशिक केंद्रे :**

काही नागरी वसाहतीची स्थापना ही त्याच्या जवळपासच्या प्रदेशाला आवश्यक त्या सेवा पुरवण्यासाठी झालेली असते. अशा नगरात जवळपासच्या प्रदेशातील वस्तु विक्रीस येतात किंवा सभोवतालच्या प्रदेशातील लोक येथून वस्तू खरेदी करतात. प्रादेशिक उत्पादनाची बाजारपेठ म्हणून अशी केंद्रे कार्य करतात. त्यामुळे प्रादेशिक उत्पादनालादेखील चालना मिळते. या प्रदेशात लोकसंख्या घनता जास्त आढळते.

**फ) मध्यवर्ती स्थित राजधान्या :**

काही देशाच्या राजधान्या देशाच्या मध्यवर्ती भागात असतात. त्यामुळे सरकारला देशाच्या इतर सर्व भागावर शासकीय नियंत्रण ठेवणे सोपे जाते. उदा. रोम, मॉस्को, दिल्ली.

munotes.in

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरी वसाहतींच्या स्थितीबद्दल माहिती द्या.

## ५.५ नागरी वसाहतीचे आकारानुसार प्रकार / नागरी वसाहतीची प्रारुपे

१) रेषाकृती वसाहती

२) वर्तुळाकृती वसाहती

३) चौकोनाकृती वसाहती

४) ताराकृती वसाहती

५) पंखाकृती वसाहती

६) शिड्याच्या आकाराच्या वसाहती

७) जाळीसदृश्य वसाहती

८) मिश्र स्वरुपाच्या वसाहती

**१) रेषाकृती वसाहती :**

अशा प्रकारच्या नागरी वसाहती रस्त्यांच्या दुतर्फा किंवा नदीच्या काठावर स्थापन झालेल्या असतात. या नगरांचा विकासही एका सरळ रेषेत होत असतो. नगरातील इतर रस्ते किंवा गल्ल्या या प्रमुख रस्त्याला किंवा नदीच्या प्रवाहाला समांतर असतात. उदा. गंगा नदीच्या किनार्यावरील वाराणसी.

**२) वर्तुळाकृती नागरी वसाहती :**

अशा नागरी वस्ती संरक्षणाच्या दृष्टीने स्थापन केलेल्या वसाहती आहेत. सभोवताली संरक्षक तटबंदी व त्यामध्ये वसलेले शहर यामुळे त्या शहराला आपोआपच वर्तुळाकार प्राप्त झालेला आढळतो. अशा वस्तीच्या विकास हा मर्यादीतच झालेला आढळला कारण सभोवतालच्या नैसर्गिक किंवा कृत्रिम तटबंदीमुळे वस्ती विकासावर मर्यादा येतात. पूर्वी राजे लोकांनी अशा प्रकारच्या वसाहतींची निर्मिती केलेली आढळते. अशा वस्तीत मध्यभागी राजाचा राजवाडा व त्याच्याभोवती इतरांची घरे असत. किंवा मध्यवर्ती भागात एखादा तलाव, मंदीर, क्रिडांगण असल्यासही सभोवताली वसाहत विकसीत होत जाते. अशा प्रकारच्या वस्ती भारतात औरंगाबाद, विजापूर, सावंतवाडी येथे आढळतात.

**३) चौकोनाकृती नागरी वसाहती :**

अशा वस्त्या प्रामुख्याने समतल अशा मैदानी प्रदेशात आढळतात. जेथे दोन रस्ते किंवा रेल्वेमार्ग परस्परांना ओलांडतात तेथे चौकोनाकृती वसाहतीची निर्मिती होते. अशा वसाहतीतील रस्ते मुख्य रस्त्याला समांतर असतात. अशा वसाहतीतील सर्वच मार्ग अगदी काटकोनात छेदल्यासारखे वाटतात. त्यामुळे या वसाहती नियोजित वसाहती

असल्यासारखे वाटते. प्राचीन भारतातील नगरे मोहोंजोदडो व हडाप्पा ही या प्रकारचीच नगरे होती. आजही काही नगरांची मूळ रचना याप्रकारची आढळते. उदा. भारतातील हैद्राबाद, लुधियाना महाराष्ट्रातील जयसिंगपूर इ. आधुनिक काळात जी नियोजित शहरे म्हनून वसवली गेलीत ती शहरे सुद्धा चौकोनाकृती आढळतात. उदा. चंदीगढ

**४) ताराकृती नागरी वसाहती :**

नगराच्या मध्यवर्ती भागातून बाहेर जाणार्या रस्त्यांच्या दुतर्फा जेव्हा घरे बांधली जातात तेव्हा त्या वसाहतींचा आकार तार्यासारखा दिसतो. विशेषत: अशी वसाहत जेव्हा विस्तारत असते तेव्हा तार्यासारखा आकार अधिक प्रभावीपणे जाणवतो. नगरांचा विकास हा नेहमी मध्यवर्ती भागाकडून बाहेरच्या बाजूला होत असतो.

**५) पंखाकृती नागरी वसाहती :**

समुद्र किनार्यावरील नगरे पंखाकृती आकाराची असतात. किनार्याला अनुसरुन इमारतींचे बांधकाम केलेले असते. नदीच्या किनार्यावरही अशा प्रकारची वसाहत निर्माण होते. एका बाजूला समुद्र किंवा नदी असल्याने काठाच्या बाजूनेच वस्तीचा विकास होत असतो. अशा वसाहतीतून येणारे सर्व रस्ते समुद्रापर्यंत येतात आणि या रस्त्यांच्या बाजूला घरांची किंवा इमारतींची निर्मिती होत जाते. त्यातूनच या वसाहतींना पंख्यासारखा आकार प्राप्त होतो.

**६) शिड्याच्या आकाराच्या नागरी वसाहती :**

पर्वतीय प्रदेशामधील वसाहती शिड्याच्या आकाराच्या असतात. पर्वतीय प्रदेशाच्या उताराला अनुसरुन टप्प्यटप्प्यांनी किंवा पायर्यापायर्यांनी रस्ते व घरे असतात. त्यामुळे या वसाहतीचा आकार पायर्यापायर्यांसारखा झालेला दिसतो. भारतातील हिमालयाच्या प्रदेशातील वसाहती याप्रकारच्या आहेत. उदा. सिमला, नैनिताल, दार्जिलिंग इ.

**७) जाळीसदृश्य आकाराच्या नागरी वसाहती :**

काही नगरांच्या मध्यभागामध्ये एखादी धार्मिक किंवा ऐतिहासिक वास्तू असते. त्यामुळे त्या नगरातील रस्ते त्या मध्यवर्ती ठिकाणापासून बाहेर गेलेले असतात. अशा नगरांची रचना कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे दिसते.

**८) मिश्र स्वरुपाची नागरी वसाहती :**

बर्याचदा नगरांचा विकास झाल्यामुळे मूळ नगराचा आकार बदलला जातो. अगोदर नगराला विशिष्ट आकार असतो. परंतु विकास होत जावून तिथे नवीनच आकार दिसू लागतो. म्हणजेच नगरांचा सुरुवातीचा आकार तसाच राहतो आणि विकसित नगरांचा बदललेला आकारही दिसू लागतो. अशा प्रकारे नगराच्या आकाराची सरमिसळ होवून मिश्र आकार पाहावयास मिळतो. उदा. भारतातील जुने हैद्राबाद शहर व विकसित झालेले नवीन हैद्राबाद शहर.

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरी वस्तीची प्रारुपे स्पष्ट करा.



munotes.in

## ४.६ शहरांचे कार्यात्मक वर्गीकरण

कोणत्याही शहरातील जास्तीत जास्त लोक ज्या व्यवसायात गुंतलेले असतात किंवा त्या शहरातून जास्तीतजास्त उत्पादन कोणत्या प्रकारचे होते त्यावरुन त्या शहराचे कार्य ठरविले जाते. म्हणजेच एखाद्या शहराची ओळखच तेथे चालणार्या कार्यावरुन होत असते.

१) प्रशासकीय शहर

२) सांस्कृतिक शहर

३) संरक्षण शहर

४) औद्योगिक शहर

५) दळणवळण शहर

अ) संकलित

ब) विनिमय

६) वाहतूक बंदरे

**१) प्रशासकीय शहर :**

ज्या शहराचे कार्य प्रशासनाशी संबंधित असते अशी शहरे प्रशासकीय शहरे म्हणून ओळखली जातात. अशा शहरांमध्ये शासनाची कार्यालये असतात, परदेशी वकिलाती असतात, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांची कार्यालये असतात. अशी शहरे विशेषत: राज्याच्या किंवा देशाच्या राजधानीची ठिकाणे असतात. उदा. भारताची राजधानी दिल्ली हे प्रशासकीय शहर आहे. तसेच लंडन, व्हिएन्ना, न्युयॉर्क इ. भारतातील नियोजीत शहर चंदीगढ हे प्रशासकीय शहर म्हणूनच वसवले गेलेले शहर आहे. त्याचप्रमाणे गुजरातची राजधानी गांधीनगर हे देखील केवळ प्रशासकीय शहर म्हणून वसवले गेलेले शहर आहे.

**२) सांस्कृतिक शहर :**

विद्यापीठे / शैक्षणिक संस्था याचा समावेश सांस्कृतिक केंद्रामध्ये केला जातो. अशा सुविधा असलेल्या शहरांचा समावेश सांस्कृतिक केंद्रात होतो. अशा केंद्रातून मुख्यत्वेकरुन विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध केलेल्या असतात. सांस्कृतिक घटकांना विशेष प्राधान्य दिले असल्याने अशा सुविधा असलेल्या शहराचा समावेश सांस्कृतिक केंद्रात केला जातो. उदा. प्राचीन भारतात तक्षशिला व नालंदा ही शैक्षणिक केंद्रे होती. आजच्या काळात विद्यापीठे, महाविद्यालये, विज्ञान व तंत्रज्ञान यांचे शिक्षण व संशोधन या कार्यामुळे ऑक्सफर्ड, केंब्रीज तसेच भारतात पुणे, शांतीनिकेतन (कोलकत्ता), वाराणसी (B.H.U.) इ. शैक्षणिक शहरे नावारुपाला आलेली आहेत.

munotes.in

धार्मिक कार्य ज्या शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर चालते अशी शहरे धार्मिक केंद्र म्हणून नावारुपाला आलेली आहेत. उदा. मक्का, रोम, जेरुसलेम, व्हॅटिकन सिटी तसेच भारतातील वाराणसी, मथुरा, नाशिक, कोल्हापूर इ.

अलिकडच्या काळात पर्यटनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे त्याचा परिणाम म्हणून अनेक शहरांची ओळख पर्यटन शहरे म्हणून होवू लागलेली आहे. अशी शहरे तेथील निसर्ग, समुद्रकिनारे, थंड हवा, आधुनिक पर्यटनाच्या सुविधा यामुळे केंद्रे होत आहेत. उदा. स्वित्झर्लंड मधील जिनेव्हा, ऑस्ट्रेलियातील सिडने, सिंगापूर तसेच भारतातील सिमला, दार्जिलिंग, उटी, महाबळेश्वर इ.

**३) संरक्षण शहरे :**

महत्त्वाची बंदरे, नवी केंद्रे, सीमावर्तीय भागाचा संरक्षणाचा प्रश्न सतत भेडसावणारा असतो. अशा सीमावर्तीय भागाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने ज्या विविध वस्त्या अगर शहरे निर्माण झालेली असतात. त्यांना प्रामुख्याने संरक्षण केंद्रे म्हणून ओळखतात. बंदराचे संरक्षण करणे व संरक्षक साधनांच्या उत्पादनांची केंद्रे स्थापन झालेली असतात. उदा. नौदलाच्या सुरक्षित बंदरामुळे विशाखापट्टणम, हवाई छावणीमुळे होनालुलू (हवाई बेटे) ही संरक्षण शहरे आहेत. तसेच भारतातील डेहराडून, खडकवासला ही राष्ट्रीय संरक्षक अकादमीची प्रशिक्षण सोयीनीयुक्त संरक्षण केंद्रे आहेत.

**४) औद्योगिक शहर :**

ज्यामध्ये उद्योग प्रधान शहरांचा समावेश केला जातो. या शहरांचा मुख्य उद्देश औद्योगिक धंद्यामध्ये भरमसाठ वाढ करणे, लघु उद्योग, मोठे उद्योग स्थापन करणे हाच असल्याने या सर्व शहरांचा समावेश औद्योगिक केंद्रात केला जातो. अशा शहरांमध्ये कच्च्या मालापासून पक्का माल तयार केला जातो. येथे अनेक उद्योगांचे केंद्रीकरण झालेले असते. त्यामध्ये लोहपोलाद कारखाने, सुती कापडाचे कारखाने, रासायनिक उत्पादने, अभियांत्रिकी उद्योग इ. विविध प्रकारचे उद्योग येथे चालतात. लोक पोलाद उद्योगामुळे जगशेटपूर, दुर्गापूर, भिलाई कापड उद्योगामुळे मॅचेस्टर, ओसाका, महाराष्ट्रात साखर कारखान्यामुळे वारणानगर इ. शहरे नावारुपाला आलेली आहेत.

**५) दळणवळण शहरे :**

**अ) संकलित केंद्रे :**

खाणकाम, मासेमारी इ. चा समावेश या केंद्रात होतो. प्रामुख्याने प्राथमिक श्रेणीचे व्यवसाय करण्याच्या दृष्टीकोनातून निर्माण झालेल्या वस्त्यांचे झालेले शहरीकरण हे संकलित केंद्रामध्ये समाविष्ट होते.

**ब) विनिमय केंद्र :**

बाजारपेठ शहराचा यामध्ये समावेश होतो. की ज्या ठिकाणी संपूर्णपणे विनिमय अगर देवाणघेवाण करण्याचे व्यवहार अग्रक्रमावर पाहिले जातात. अशा बाजारपेठ शहरांना वितरण केंद्रे म्हणून ओळखतात.

**६) वाहतूक शहरे :**

अशा शहरांचे मुख्य कार्य वाहतूक जंक्शन हे असते. ज्या ठिकाणी एक वाहतूक मार्ग संपून दुसरा वाहतूक मार्ग सुरु होतो तेथे अशा प्रकारची शहरे उदयाला येतात. अशी शहरे विशेषत: बंदरांच्या ठिकाणी किंवा लोहमार्गाच्या ठिकाणी निर्माण होतात. उदा. पॅरीस (फ्रांन्स), बर्लिन (जर्मनी) व भारतातील नागपूर ही वाहतूक शहरे आहेत. येथे अनेक प्रकारचे वाहतूक मार्ग एकत्र येतात. तसेच लंडन, शांघाय भारतातील मुंबई, चेन्नई येथे वाहतुकीचे मार्ग बदलतात त्यामुळे ही शहरे देखील वाहतूक केंद्र म्हणून ओळखली जातात. सिंगापूर हे शहर जगातील एक महत्त्वाचे वाहतूक शहर म्हणून ओळखले जाते. कारण येथे सागरी मार्गाचा महत्त्वाचा थांबा आहे. पूर्वी भारतात वेगवेगळया प्रकारचे रेल्वे मार्ग होते, त्यामुळे एक मार्ग संपून दूसरा मार्ग सुरु होत असे अशा ठिकाणी देखील वाहतूक केंद्र म्हणून शहरांचा विकास झालेला आढळतो. उदा. महाराष्ट्रातील मिरज शहर.

**तुमची प्रगती तपासा :**

१) शहरांचे कार्यात्मक वर्गीकरण द्या.

❖❖❖❖

munotes.in

# ५

# भारतातील नागरी वस्त्या

**घटक संरचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ नागरीकरण व्याख्या

५.३ नागरीकरण प्रक्रियांवर परिणाम करणारे घटक

५.४ नागरी वस्ती विकासाचे घटक

५.५ नागरी वस्तीची वाढ होण्यावर परिणाम करणारे घटक

५.६ औद्योगिकरणपूर्व नागरी वसाहती

५.७ औद्योगिक क्रांती नंतरची नागरी वसाहत

५.८ नागरी वसाहतीच्या समस्या

५.९ नागरी वस्ती नियोजन

५.१० शहरांचा शाश्वत विकास

munotes.in

## ५.० उद्दिष्टे

- नागरीकरणाची व्याख्या व प्रक्रिया समजून घेणे.
- नागरी वस्ती विकासाच्या घटकांचा अभ्यास करणे.
- नागरी वस्तीच्या समस्या लक्षात घेणे.
- नागरी वस्ती नियोजनाच्या अभ्यास करणे.
- शहरांचा शाश्वत विकास अभ्यासणे.

## ५.१ प्रस्तावना

पृथ्वीच्या पृष्ठभागावर नागरी वस्तीची वाढ व विकास दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर होत आहे. वाढते औद्योगिकरण, वाहतुक सोईचा विकास, विविध प्रकारच्या सोई यामुळे शहरी वसाहतींतील लोकसंख्या सतत वाढत आहे. इ.स. १९६५ साली एकूण जागतिक

लोकसंख्ये पैकी फक्त ३० टक्के लोकसंख्या शहरात होती. सध्या एकूण जागतिक लोकसंख्या पैकी ५० टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या शहरात / नगरात आढळते. ग्रेट ब्रिटन, पश्चिम जर्मनी, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना, व कॅलिफोर्निया यासारख्या देशात नागरीकरण क्रिया कमी आढळते. भारतात फक्त २५ टक्के लोकसंख्या शहरात राहते. आधुनिक काळात एखाद्या प्रदेशात नागरीकरण किती प्रमाणात झाले आहे. यावरुन त्या प्रदेशाची प्रगती मोजली जाते. त्यावरुन नागरीकरण हे संस्कृतीचे प्रतिक बनले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ज्या ठिकाणी उद्योगधंद्याची, वाहतुकीची प्रगती मोठ्या प्रमाणात होत राहते व तेथे संपूर्ण जीवनपद्धतीच नवीन तयार होते. त्यास आपण नागरीकरण असे म्हणतो.

## ५.२ नागरीकरण व्याख्या

नागरीकरण ही एक प्रक्रिया आहे अनेक विचारवंतांनी नागरीकरण प्रक्रियेच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यातील काही व्याख्या पुढीलप्रमाणे -

**१) अर्नेस्ट बर्गेल :**

नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे की ज्या प्रक्रियेत ग्रामीण वसाहतीचे नागरी वसाहतीमध्ये रुपांतर होते.

**२) मार्विन ओल्सन :**

नागरीकरण प्रक्रियेत सभोवतालच्या ग्रामीण भागांतून नागरी वसाहतींकडे सतत स्थलांतरीत होणार्या असंख्य लोकांचा समावेश होतो.

**३) डब्ल्यू.एस. थॉमसन :**

शेती व्यवसायाशी संलग्न खेड्यातील लोकसंख्या जेव्हा व्यापार, उद्योग, शासकीय, व्यवहार असलेल्या मोठ्या वसाहतीकडे स्थलांतर करते तेव्हा त्या प्रक्रियेला नागरीकरण असे म्हणतात.

वरील व्याख्यांवरुन असे स्पष्ट होते की शहरी भागाकडे सतत ग्रामीण भागातून लोकांचे स्थलांतर होत असते. कारण शहरामध्ये उद्योगधंदे, विविध व्यवसाय, व्यापार, सुखसोई, शासकीय कार्यालये केंद्रीत झालेले असतात. म्हणून आपणास असे म्हणता येईल की शहरांची / नगरांची लोकसंख्या सतत वाढत असल्याने शहराची वाढ सतत होते. या क्रियेला नागरीकरण प्रक्रिया असे म्हणतात.

नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे की केवळ शहरी जीवनातच परिणाम होतो असे नव्हे तर ग्रामीण भागात देखील या प्रक्रियेचा परिणाम झालेला आढळतो. नागरीकरण प्रक्रियेमुळे पुढील परिणाम घडून येतात.

१) नागरीकरण प्रक्रियेत ग्रामीण वस्तीतून शहराकडे लोक स्थलांतरीत होतात. त्यामुळे नगराची / शहराची लोकसंख्या सतत वाढते.

२) नागरीकरण प्रक्रियेमुळे सामाजिक जीवनामध्ये उत्क्रांती घडून येते.

munotes.in

३) नागरीकरण प्रक्रियेमुळे अनेक घटकात परिवर्तनशीलता घडून येते. आर्थिक व तांत्रिक प्रगतीमुळे समाजामध्ये बदल घडून येतो.

४) नागरीकरण प्रक्रियेमुळे शहराची भरमसाठ वाढ होते.

५) शहराची भरमसाठ वाढ झाल्याने रहात्या जागेचे प्रश्न, प्राण्याचा प्रश्न, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई यासारखे प्रश्न निर्माण होतात.

६) नागरीकरण प्रक्रियेचा केवळ नागरी वसाहतीवरच परिणाम होतो असे नाही तर तो सभोवतालच्या ग्रामीण वसाहतीवर देखील होत असतो.

७) नागरीकरणातून एका गावातून नगराची निर्मिती होते. तर लहान शहराचे मोठ्या शहरात रुपांतर होत जाते. तसेच मोठ्या शहरातूनच हळूहळू महानगरांची निर्मिती होत जाते.

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरीकरणाबद्दल माहिती द्या.

## ५.३ नागरीकरण प्रक्रियेवर परिणाम करणारे घटक

नागरीकरण प्रक्रिया बर्याच वर्षापासून सुरु असली तरी नागरीकरणाला खर्या अर्थाने प्रारंभ औद्योगिक क्रांतीनंतर झालेला दिसून येतो. सध्या बहुतेक देशात नागरीकरण प्रक्रिया प्रकर्षाने जाणवते. कारण नागरीकरण प्रक्रियेवर पुढील घटकांचा परिणाम झालेला आढळतो.

१) वाढते औद्योगिकरण

२) शास्त्रीय तांत्रिक ज्ञानात प्रगती

३) वाहतूक साधनात झालेली प्रगती

४) शहरात व्यापार, शिक्षण, कचेर्या यांचे झालेले केंद्रीकरण

५) शहरातील अधिक सुरक्षित जीवन

६) शहरी प्रदेशात झालेले सुखसोईचे केंद्रीकरण

वरील घटकांचा परिणाम नागरीकरणावर झालेला आढळून येतो. शहरात विविध सुखसोई, करमणूक केंद्रे, रोजगाराची उपलब्धता असल्यामुळे सभोवतालच्या ग्रामीण वसाहतीतून शहराकडे लोकांचा सतत लोंढा सुरु असलेला दिसतो. त्यामुळे दिवसेंदिवस प्रत्येक शहर वाढत आहेत. तर मोठी शहरे अधिकच मोठी होत आहेत. उदा. संयुक्त संस्थानच्या ईशान्य पूर्व भागात एक शहराची मालिकाच तयार झाली आहे.

munotes.in

## ५.४ नागरी वस्ती विकासाचे घटक

नागरी वस्ती विषयीच्या वेगवेगळ्या व्याख्या, कल्पना अनेक भुगोलवेत्यांनी स्पष्ट केलेल्या आढळतात. अशा नागरी वस्तीच्या विकासाचा आढावा घेताना नागरी वस्तीची निर्मिती कोणत्या स्वरुपाची आहे हे अभ्यासावे लागते. नागरी वस्तीची होणारी निर्मिती ही काही वेळा विशिष्ट उद्दिष्टाने असते. तर काही वेळा नागरी वस्ती ऐतिहासिक दृष्टीकोनातून निर्माण झालेली असते. याचा विचार करुन नागरी वस्तीची निर्मिती भेदावरुन नागरी वस्तीचे मुख्य प्रकार पाडले जातात.

१) ग्रामाचा विस्तार होऊन बनलेली नागरी वस्ती

२) विशिष्ट हेतूने बनलेली नागरी वस्ती

**१) ग्रामाचा विस्तार होऊन बनलेली नागरी वस्ती :**

एखाद्या ठिकाणी लहानशी वस्ती निर्माण झाल्यानंतर अशा वस्तीमध्ये रहाणार्या लोकांच्या असलेल्या विविध गरजा भागविण्यासाठी इतर वेगवेगळ्या प्रकारच्या सुविधा निर्माण केल्या जातात. त्यातूनचे अशा वस्तींचे ग्राममध्ये रुपांतर होऊ लागते. अशा निर्माण झालेल्या लोकांची संख्या हळूहळू वाढू लागते. अशा वाढलेल्या लोकांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. प्रकारच्या गरजा भागविण्यासाठी विविध प्रकारच्या सोई कराव्या लागतात. जादा येणार्या लोकांना सामावून घेण्यासाठी मुख्य गावाच्या ठिकाणापासून आजुबाजूच्या क्षेत्राचा विचार केला जातो. याच प्रक्रियेतून त्या गावाचा सतत विस्तार होत जावून ते गाव हळूहळू शहराकडे झुकत जावून शेवटी नगरामध्ये रुपांतरीत पावते. अशाप्रकारे निर्माण झालेल्या नगराचे वर्गीकरण ग्रामाचा विस्तार होऊन बनलेली नागरी वस्ती या प्रकारात करतात.

**२) विशिष्ट हेतूने बनलेली नागरी वस्ती :**

नागरी वस्तीची निर्मिती भेदावरुन भेद करताना हा दुसरा प्रकार पाडला जातो. यामध्ये ज्या नागरी वस्तीची निर्मिती झालेली असते ती एखाद्या विशिष्ट हेतूने केलेली असल्याचे दिसते. उदा. संस्थानिकांचा काळ घेतल्यास त्यामध्ये असणार्या राजे लोकांनी आपल्या राजधानीसाठी विशिष्ट भागाची निवड करुन त्या भागामध्ये आवश्यक सुखसोई निर्माण करण्याच्या दृष्टीने त्या भागाचे नगरात रुपांतर केलेले आढळते. तसेच काही नगरे शैक्षणिक दृष्टीकोनातून स्थापन झालेली असतात. तर काहींची निर्मिती राजकीय तर व्यापारी दृष्टीने झालेली असते. अशा सर्व नागरीवस्त्यांच्या विशिष्ट हेतूने बनवलेली नागरी वस्तीत समावेश करतात.

**नागरी वस्तीची वाढ व नागरी वस्त्यांच्या विकास :**

शहरे जेथे निर्माण होतात तेथील भौगोलिक वैशिष्ट्यांचा त्याच्यावर प्रभाव पडत असतो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर नगरांचा विकास हा फार पूर्वीपासून होत आहे. गेल्या काही शतकात अनेक शहरांची निर्मिती होऊन नागरी वस्त्यांचा विकास झाला आहे.

munotes.in

**तुमची प्रगती तपासा :**

१) वस्तीच्या निर्मिती भेदावरुन तयार झालेले नागरी वस्त्यांचे प्रकार सांगा.

## ५.५ नागरी वस्तीची वाढ व नागरी वस्त्यांच्या विकास होण्यावर परिणाम करणारे घटक

नागरी वस्तीची / शहराची वाढ कोणत्या एका विशिष्ट घटकामुळे झाली हे सांगणे फारच कठीण आहे. कारण काही नागरी वस्तींची वाढ तेथील लोकसंख्येची वाढ झाल्यामुळे तर काही शहरांची वाढ कारखानदारीचा विकास व व्यापारातील वृद्धीमुळे झालेली असते. सर्वसामान्यपणे नागरी वस्तींची वाढ व विकास होण्यावर पुढील घटकांचा परिणाम होतो.

अ) भौगोलिक घटक

ब) सांस्कृतिक घटक

क) ऐतिहासिक घटक

ड) शासकीय व राजकीय घटक

**अ) भौगोलिक घटक :**

नागरी वस्ती केंद्राची वाढ व विकास हा प्रामुख्याने तेथील भौतिक परिस्थितींवर अवलंबून असतो. नगरे स्थापन होताना त्याच्या सभोवताली असणार्या साधन सामुग्रीचा त्याच्या विकासावर परिणाम होत असतो. भौतिक घटकांत पुढील घटकांचा समावेश होतो.

१) भूपृष्ठरचना

२) पाणीपुरवठा

३) हवामान

४) जमीन

५) खनिजसंपत्ती

६) स्थान व स्थिती

**१) भूपृष्ठरचना :**

भुपृष्ठाचा प्रभाव, निवासस्थानास लागणारी जमीन, उद्योगधंदे, कारखाने, इमारती व वाहतुकीसाठी लागणारी जमीन ह्यावर होत असतो. त्यामुळे नागरी वस्तीचा विकास हा पर्वतीय प्रदेशापेक्षा मैदानी भागात जास्त होतो. मैदानी प्रदेशात सपाट भाग, मंद उतार असल्याने विस्तार विकासासाठी भरपूर वाव असतो. याच प्रदेशात वाहतूक मार्गही विकसीत होऊ शकतात. म्हणूनच या प्रदेशात नगराची वाढ व विकास जास्त होतो. उदा. कानपूर, मास्को, मिरज, जयपूर इ. पर्वतीय प्रदेशात शीघ्र उतार व दळणवळणाच्या अपुर्या

munotes.in

सोई यामुळे नगराची वाढ व विकास होऊ शकत नाही. परंतु काही पर्वतीय प्रदेशात थंड हवामान असल्याने व आल्हाददायक असल्याने शहरांची वाढ झाली आहे.

### २) पाणीपुरवठा :

पाणी ही मानवाची मूलभूत अत्यावश्यक गरज आहे. म्हणून पाणीपुरवठ्याच्या साधनां शेजारीच मानवाची वस्ती निर्माण होते. अशा वस्तीचा जास्त विकास होतो. बहुतेक नागरी वस्तींचे स्थान नद्यांच्या, तलावांच्या, सरोवराच्या काठी / जवळपास आढळते. औद्योगिक नगरात कारखान्यांना भरपुर पाणी पुरवठ्याची आवश्यकता लागते. म्हणूनच नद्यांच्या किनार्यावर अनेक शहरांचा विकास झाला. उदा. इंग्लंडमध्ये थेम्स नदीवर लंडन, संयुक्त संस्थानात न्यूयॉर्क शहर, हडसन नदीच्या मुखावर, रशियात मॉस्को शहर व्होल्गा नदीवर, भारतात गंगा नदीच्या तीरावर कानपूर, बनारस, महाराष्ट्रात कृष्णा काठावर वाई, सांगली, कर्हाड यासारखी शहरे विकसीत झाली आहेत.

### ३) हवामान :

नागरी वस्तीच्या वाढीवर व विकासावर हवामानाचा बराच प्रभाव पडलेला दिसतो. अतीथंड व अतीउष्ण हवामान नगराच्या विकासाला प्रतिकूल असते. विषुववृत्तीय प्रदेशात उष्ण, दमट व रोगट हवामान असल्याने तसेच कायम दलदलीचे प्रदेश आढळत असल्याने नागरी विकासाला मर्यादित स्वरुपात वाव मिळतो. उष्ण वाळवंटी प्रदेशात वर्षभर तापमान जास्त असल्याने नगराच्या विकासात अडथळे निर्माण होतात. अतिशीत हवामानात शहरांचा विकास अत्यंत अल्प प्रमाणात झाला आहे. जगातील ६६ टक्के नागरी वस्त्या उष्ण व समशीतोष्ण कटिबंधात आढळतात.

### ४) जमीन :

ज्या प्रदेशात सुपीक जमीन आहे. अशा प्रदेशात शेतीची प्रगती जास्त होते. तेथे उत्पादनात भरपूर वाढ होते. आपोआपच दाट लोकवस्ती आढळते. शेतीवर आधारित कारखाने जेव्हा निर्माण होतात तेव्हा ग्रामीण वसाहतीचे रुपांतर शहरी वसाहतीत होते व त्या शहराचा विकास होत जातो. गंगा नदीचा त्रिभूज प्रदेश, इजिप्तमधील नाईल खोरे, चीनमधील यांगत्सेयांग नदीच्या खोर्यात कृषियोग्य उत्कृष्ट जमीन असल्याने अनेक शहरांची वाढ व विकास झाला आहे.

### ५) खनिजसंपत्ती :

खनिज संपत्तीचा परिणामही नागरी वस्तीच्या वाढीवर / विकासावर होतो. ज्या प्रदेशात खनिज संपत्ती सापडते. तेथे खनिज संपत्तीचे उत्पादन घेतले जाते. व त्यातून शहरांची निर्मिती होते. व कॅलिफोर्निया,ऑस्ट्रेलिया, उ. अमेरिका या प्रदेशात खनिज संपत्तीमुळे अनेक शहरांचा विकास झाला. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, पूर्व संयुक्त संस्थाने या देशात कोळसा सापडत असल्याने अनेक शहरांची निर्मिती कोळशामुळेच झाली आहे. अलिकडील काळात कुवेत, इराक, सौदी अरेबिया या वाळवंटी प्रदेशात खनिज तेल सापडते. त्यातूनच खनिज नागरी वस्त्यांमध्ये निर्मिती झालेली आढळते. खनिज संपत्तीचा अपुरा साठा असल्यास तो

साठा अल्पावधीत संपुष्टात येतो व तेथील शहर निर्जन होते. याला भूत शहर (Ghost Town) असे म्हणतात.

**६) स्थान व स्थिती :**

नागरी वस्तीचा विकास प्रामुख्याने त्याच्या स्थानावर व स्थितीवर अवलंबून असतो. ज्या जागेवर शहरांची निर्मिती होते ते त्या शहराचे स्थान होय व त्याच्या सभोवतालच्या प्रदेश स्थिती होय. शहराचे स्थान हे नदीकाठावर / बेटावर असेल तर त्या शहराची वाढ अधिक होते. भारतात मुंबई, कलकत्ता व मद्रास यांचा विकास प्रामुख्याने त्यांच्या स्थानामुळे झाला आहे. नगरच्या सभोवतालच्या प्रदेश समृद्ध असेल तर त्यांचा परिणामही नगर विकासावर होत असतो.

**ब) सांस्कृतिक घटक :**

नैसर्गिक घटकाबरोबरच सांस्कृतिक / आर्थिक घटकांचा परिणामही नागरी वस्तीच्या वाढीवर किंवा विकासावर होतो. सांस्कृतिक घटकात पुढील घटकांचा समावेश होतो.

१) वाहतुकीच्या सोई

२) उद्योगधंदे

३) धार्मिक केंद्रे

४) शैक्षणिक केंद्रे

**१) वाहतुकीच्या सोई :**

वाहतुक सोईमुळे नागरी वस्तीचा खूपच विकास होतो. वाहतूक प्रकारात बदल होतो. त्या ठिकाणी तसेच दोन किंवा अधिक मार्ग एकत्रित येतात तेथे शहरांची निर्मिती झालेली आढळते. पर्वतीय व पठारी प्रदेशापेक्षा मैदानी प्रदेशात रस्ते, लोहमार्ग यांच्या सोईसाठी अनुकूल भौगोलिक परिस्थिती असल्यामुळे त्यांचा खूप विकास होतो आणि त्याबरोबरच नागरी वस्तीचा देखील विकास होतो. दोन किंवा अधिक व्यापारी मार्ग परस्परांना मिळतात तेथे शहरांची निर्मिती होते. भारतातील आग्रा, नागपूर, उ. अमेरिकेतील सेंटलुईस, शिकागो, युरोपमधील पॅरीस, बर्लिन ही यांची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

**२) उद्योगधंदे :**

उद्योगधंद्यांना आवश्यक असणारे घटक उपलब्ध असल्यास अशा ठिकाणी औद्योगिक केंद्राची निर्मिती होते व अशा केंद्रात अनेक उद्योग निर्माण झाल्याने लोकांना रोजगार उपलब्ध होतो. ग्रामीण भागातील लोकांचा लोढा या भागाकडे आकर्षिला जातो व नगराचा विकास होतो. भारतातील जमशेदपूर, बोकारो, मिलाई, दुर्गापूर, भद्रावती ही प्रमुख शहरे लोह-पोलाद केंद्रामुळे विकसीत झाली. अहमदाबाद, सोलापूर, नागपूर ही नगरे कापसावर चालणार्या कापड गिरण्यांमुळे उभारली गेली. मुंबई, कलकत्ता, मद्रास, बेंगलोर यासारख्या शहरात अनेक औद्योगिक कारखान्यांची निर्मिती झाल्यानेच शहर वसाहतीचा विकास झाला आहे. युरोपमधील प्रदेशात औद्योगिक कारणामुळे अनेक वस्त्यांची निर्मिती व वाढ झाली.

**३) धार्मिक केंद्रे :**

बरीच शहरे / नागरी वस्त्या धर्म भावना व्यक्त करण्यासाठी निर्माण होतात यालाच आपण धार्मिक केंद्रे असे म्हणतो. अशा धार्मिक स्थळाला सभोवतालचे लोक सतत भेटी देत असतात. भारतात अशा शहरांची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली आहे. काशी, हरिद्वार, पंढरपूर, शिर्डी, नाशिक यासारख्या शहरांचा विकास धार्मिक दृष्टीकोनातून झालेला आहे. काही धार्मिक केंद्राच्या ठिकाणी मोठमोठ्या यात्रा व कुंभेमेळे भरतात. त्यामुळे अशा केंन्द्राकडे दरवर्षी हजारो लोक आकर्षित होतात. येणार्या यात्रेकरुंच्या सोई करण्याच्या दृष्टीने अशा शहरांचा विकास अधिक प्रमाणात होतो. पाश्चिमात्य देशात अशा पवित्र शहरांना संडे हाऊस असे म्हणतात. त्याठिकाणी लोक प्रार्थनेसाठी एकत्रीत येतात. परगावाहून येणार्या लोकांच्या राहण्याच्या सुविधा, जेवणाची सोय इ. साठी इतर लोक येऊ लागतात आणि शहरांची निर्मिती होते. उदा. पोपचे वास्तव्य असलेले व्हेटीकन सिटी हे तिर्थक्षेत्र व अरबस्थान मधील मक्का हे मुस्लिम बांधवांचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे.

**४) शैक्षणिक केंद्रे :**

काही शहरी वस्त्यांना शैक्षणिक महत्व असल्याने त्यांची वाढ व विकास होतो. काही शहरात विश्वविद्यालये स्थापन झालेली आहेत. उदा. इंग्लंडमधील ऑक्सफर्ड, केंब्रिज, स्वीडनमध्ये लुंड व उपसाला भारतातील बनारस, शांतीनिकेतन, पुणे ही शैक्षणिक केंद्रे म्हणून प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी विश्वविद्यालयाच्या इमारती, महाविद्यालये, ग्रंथालये यांचा ठसा पहावयास मिळतो. विद्यार्थी व व्याख्याने यांच्या निवासासाठी हॉटेल्स, रेस्टॉरंट उभारली जातात  शहरी वस्त्यांचा विकास होतो.

**क) ऐतिहासिक घटक :**

काही घटक ऐतिहासिक महत्त्व असल्याने तेथे शहरी वस्तीची निर्मिती होते व शहरी वस्तीचा विकास होतो. पानीपत, या शहरी वस्तीचा विकास ऐतिहासिक दृष्टीकोनातून झालेला आहे. अहमदनगर, औरंगाबाद, सातारा, विजापूर, हैदराबाद या शहरांचा विकास होण्यास अनेक ऐतिहासिक घटना कारणीभूत ठरलेल्या आहेत.

**ड) राजकीय घटक :**

इतर घटकांप्रमाणे राजकीय घटकांचा परिणाम ही शहरी वस्तीच्या वाढीवर व विकासावर होतो. देशाच्या किंवा प्रदेशाच्या राजधानीचे ठिकाण असल्यास त्या देशात अनेक शासकीय कार्यालये उभारली जातात. आपोआपच अशा राजधानीच्या शहरांचा विकास होतो. दिल्ली, मुंबई, मॉस्को, टोकियो, लंडन यासारख्या शहराचा विकास होण्यास राज्यधान्यामुळेच झालेला आहे. काही ठिकाणला संरक्षणाच्यादृष्टीने खूपच महत्त्व असल्याने अशा शहरांचा विकास होतो. उदा. भारतातील मिरत ही वसाहत छावण्यामुळेच विकसीत झाली आहेत.

थोडक्यात शहरी वस्तीची वाढ व विकास होण्यास विविध घटकांचा परिणाम होत असतो. काही शहरी वस्तीच्या बाबतीत एखादे दुसरा घटक महत्त्वाचा असतो. तर काही शहराच्या बाबतीत अनेक घटकांचा संयुक्तरित्या परिणाम होत असतो.

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरी वस्तीच्या वाढीस कोणत्या घटकांचा हातभार लागतो ते सांगा.

**नागरीकरणाचा इतिहास :**

नागरीकरणाचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. नागरी वसाहतींची सर्वात प्रथम केव्हा झाली असावी या वादग्रस्त प्रश्न आहे. जेव्हापासून शहरे व नगरांची निर्मिती झाली तेव्हापासून तर आजपर्यंत त्याचे स्वरुप आणि कार्य यात सतत बदल होत आले आहे. अनेक नागरी वसाहती काळाच्या ओघात आपले अस्तित्व गमावून बसल्या आहेत. काही नागरी वसाहतींचा अनेक वेळा जिर्णोद्धार झाला आहे.

औद्योगिक क्रांतीचा नागरी वस्तीवर फार मोठा परिणाम होतो. औद्योगिक क्रांतीपूर्वी शहरीरुप धारण केलेल्या शहरांवर झालेला हा परिणाम लक्षणीय आहे. गिडीऑन सोबर्ग या भूगोलवेत्याने विविध काळातील शहरांचा सखोल अभ्यास करुन काळानुसार शहराचे मुख्य दोन प्रकार पाडले आहेत. ते पुढीलप्रमाणे -

अ) औद्योगिक पूर्व काळातील शहरे

ब) औद्योगिक उत्तर काळातील शहरे

## ५.६ औद्योगिकरण पूर्व नागरी वसाहती / उद्योगपूर्वी नागरी वसाहती :

ज्या नागरी वसाहतींमध्ये उद्योगधंद्यांची वाढ फारशी झाली नाही व औद्योगिक क्रांती अगोदर शहराची निर्मिती झाली. अशा शहरांचा समावेश औद्योगिकरण पूर्व शहरात होतो. १९ व्या शतकात या अगोदर निर्माण झालेल्या वस्त्यांचा समावेश प्रामुख्याने या नगरात होतो. या प्रकारच्या नागरी वस्त्या प्रामुख्याने आशिया, आफ्रिका आणि द. अमेरीका या खंडात मोठ्या प्रमाणात आढळतात. आशिया व आफ्रिका खंडातील बर्याच वस्त्या आणि औद्योगिकरीत्या पूर्व स्थितीत आहेत. चीन मधील पेकींग व चुंगकिंग, थायलंडचे बँकॉक, मलेशियातील कुआलालंपूर, इंडोनेशीयातील जकार्ता नागरी या वर्गात मोडतात. सहारा वाळवंटातील व्यापारी केंद्र टिंबक्टू हे नमुनेदार उदाहरण आहे. वाराणसी, मदुराई, नाशिक, पुरी, अलाहाबाद, अमृतसर अशी धार्मिक स्थाने दिल्ली, आग्रा, लखनौ, पाटना, सातारा, कोल्हापूर यासारखी जुनी राजधानीची शहरे औद्योगिता पूर्व शहर वस्तींची रचना दर्शवितात.

औद्योगिक पूर्व नागरी वस्तीची निर्मिती प्रामुख्याने संरक्षण, व्यापार व राजधानी यासाठी झालेली आढळते. महत्त्वाच्या भौगोलिक रचनेमुळे लष्करी केंद्रे म्हणून काही नगरांच्या जन्म झाला. तेथे व्यक्ती आणि वित्त यांची सुरक्षितता प्राप्त झाल्यामुळे उद्योग, व्यापार आणि संस्कृती यांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. अशी नगरे / शहरे किल्ला / तत्वाची असणारी होती. अमृतसर, सोलापूर, इंदौर, सुरत, झाशी, अहमदनगर ही यांची उत्कृष्ट उदाहरणे होत. चित्तोड, जयपूर, जोधपूर, उदयपूर यासारखी शहरे औद्योगिकरण पूर्व काळात राजधान्याची शहरे म्हणून विकास पावली. १६ व्या व १७ व्या आणि १८ व्या

शतकात उद्योगांचे स्वरुप व वितरण यात बदल झाला. त्याचे नगराचे स्थान व विकासावर परिणाम झाला. लहान नागरी वस्ती कुटीर उद्योग व मोठ्या नगरात उद्योग स्थापन झाले.

**औद्योगिकरणपूर्व नागरी वस्तीची वैशिष्ट्ये :**

१) नागरी वस्ती अवतीभोवतीच्या खेड्यांपेक्षा आकाराने व लोकसंख्येने मोठी असते.

२) बहुतेक औद्योगिकरण पूर्व नागरी वस्त्यातून स्थिरता आलेली असते.

३) बर्याच नागरी वस्त्या संरक्षणासाठी भक्कम तटबंदी असते.

४) नागरी वस्तीचा काही भाग नियोजित असला तरी पुष्कळसा भाग अरुंद रस्ते, गल्ल्या, दाट वस्त्या यांनी अनियंत्रितपणे भरलेला आढळतो.

५) औद्योगिकीकरण पूर्व नागरी वस्तीत घरांची गर्दी झालेली दिसते व घरोघरी रहिवासीही दाटी वाटीने रहातात.

६) गर्दीने वसलेल्या घरांचा विस्तार नियोजीत असतो व त्याची वाढही अनियमित झालेली दिसते.

७) औद्योगिकरण पूर्व नागरी वस्तीचे मुख्य कार्य व्यापार विनिमयाचे होते. परंतु बर्याच शहरी स्थानिक राज्यकर्त्यांची राजधानी असल्याने किंवा ती संरक्षण केंद्रे असल्याने शासन व संरक्षण ही कार्य देखील महत्त्वाचे असते.

८) नागरी वस्तीतही नागरिक विविध प्रकारचे व्यवसाय करतात.

९) या नागरी वस्तीला तटबंदी असल्याने अंतर्गत भागात घरांची वाढ विलक्षण दाटीने झालेली दिसते.

१०) औद्योगिक पूर्व नागरी वस्त्या आकाराने मोठी नव्हती.

११) चर्च, शाळा, अन्य प्रार्थनास्थाने / राजवाडा इ. भव्य वास्तू नागरी वस्तीच्या केंद्रस्थानी असतात.

१२) मोठमोठ्या नागरी वस्तीत उद्याने, कलागृहे, नाट्यगृहे, मैदाने विविध प्रकारची संग्रहालये व विद्यापीठे निर्माण झालेली आढळतात.

१३) औद्योगिकरण पूर्व नागरी वसाहती लहान-मोठ्या कुटीर उद्योगांचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला होता.

१४) औद्योगिकरण पूर्व नागरी वसाहती आजुबाजुच्या ग्रामीण भागावर पूर्णपणे अवलंबून असत. शहरातून भोवतालच्या प्रदेशाकडे वाहतुक मार्ग गेलेले असत.

**तुमची प्रगती तपासा :**

१) औद्योगिकरणपूर्व नागरी वसाहतींची वैशिष्टे स्पष्ट करा.

**भारतातील औद्योगिकरणपूर्व नागरी वसाहती :**

भारतात औद्योगिकरण पूर्व अनेक नागरी वसाहती निर्माण झाल्या होत्या. भारतीय समाज आजही मोठ्या संख्येने ग्रामीण भागात समरस झाला आहे. १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली फारच थोडी शहरे आढळतात. बहुतेक सर्व नागरी वस्त्या सावकाशपणे निर्माण झाल्या. पूर्वी भारतात अनेक लहान-मोठी संस्थाने अस्तित्वात होती. ब्रिटीश लोकांच्या संस्कृतीचा आपल्या देशात अनेक ठिकाणी प्रभाव पडलेला दिसून येतो. बरीच शहरे, राजधान्या व व्यापारी केंद्रे म्हणून उदयास आली. याशिवाय खाणकाम करणारी शहरे उदा. राणीगंज, प्रशासकीय केंद्रे, उदा. नवी दिल्ली, थंड हवेची ठिकाणे. उदा. शिमला, चाहमळ्याची शहरे, उदा. दार्जिलिंग या काळात निर्माण झाली. वाराणसी, मदुराई, नाशिक, अलाहाबाद, अमृतसर यासारखी धार्मिक केंद्रे औद्योगिकरण पूर्व शहरे म्हणून ओळखली जातात.

भारतात औद्योगिकरणपूर्व नागरी वसाहतीची वैशिष्ट्ये आढळतात त्यातील काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१) नागरी वसाहतीच्या मध्यभागी जागा ठेवण्यात येत असे त्या जागेवर बाजार भरणे किंवा इतर महत्त्वाच्या गोष्टींसाठी वापर केला जात असे अशा भागाला चौक असे म्हणतात.

२) या मोकळ्या जागेकडे येणारे रस्ते शहराच्या सर्व भागातून येत असत आणि ते रस्ते रुंद व सरळ होते.

३) बहुतेक शहरात मध्यवर्ती ठिकाणी एखादे देऊळ किंवा मनोरा निर्माण केलेले असते.

४) नागरी वसाहतीच्या इतर भागातील रस्ते अरुंद असून अशा बहुतेक नागरी वसाहती निवासी स्वरुपाच्या होत्या.

५) बर्याच नागरी वसाहतीत लहान आकाराचे लघु व्यवसाय केले जात हाते. अशा शहरातून श्रमिकांच्या वसाहती आढळून येत होत्या.

६) नव्या नागरी वसाहती रस्त्याचे विभाग पूर्वीसारखे धर्म, जात हा वैशिष्ट्यानुसार आढळत नाहीत. परंतु जुन्या शहरात मात्र हे विभाग धर्म जातीप्रमाणे निर्माण झाले आहेत.

७) नागरी वसाहतीतून महत्त्वाच्या व्यापारी विभाग शहराच्या मध्यवर्ती भागात निर्माण झालेला होता.

८) या नागरी वसाहतीची वाढ अनियमीत स्वरुप व आकाराची झाली होती.

**तुमची प्रगती तपासा :**

१) भारतातील औद्योगिकरणपूर्व शहरांची माहिती द्या.

munotes.in

## ५.७ औद्योगिक क्रांती नंतरची नागरी वसाहत

औद्योगिक क्रांतीनंतरच्या नागरी वसाहतीचे स्वरुप पूर्वीच्या वसाहतीच्या मानाने भिन्न आढळते. औद्योगिक क्रांती सर्वात प्रथम इंग्लंडमध्ये सुरु झाली आणि ती प्रथम युरोप खंडाकडे व नंतर झपाट्याने जगभर पसरली. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन, वाहतुक आणि व्यापार यात फारच मोठ्या प्रमाणात वाढ झाली. या सर्वांचा परिणाम हा लोकसंख्या आणि वस्तीवर झाला. औद्योगिक क्रांतीपूर्वीची शहरे ही प्रामुख्याने लोकांच्या निवास स्थानाची शहरे होती. परंतु औद्योगिक क्रांती नंतर औद्योगिक स्वरुपाची केंद्रे निर्माण झाली.

कारखान्याच्या वाढीसाठी विविध प्रकारचा कच्चा माल लागत असे तसेच कारखान्यात निर्माण झालेल्या वस्तू बाजारात विकण्यासाठी रवाना कराव्या लागत. त्यामुळे प्रामुख्याने इंग्लंडमध्ये व नंतर युरोपमध्ये वाहतूक मार्ग वाढू लागले. नद्या, कालवे, लोहमार्ग, राजमार्ग यांची निर्मिती आणि विकास झपाट्याने होऊ लागला. वाहतुकीच्या मार्गावर अनेक नवी शहरे यामुळे निर्माण झाली. येथे विविध मार्ग एकत्र मिळत अशा मार्गावर महत्त्वाची शहरे निर्माण झाली आणि अन्य शहरांपेक्षा फार झपाट्याने ती विकसीत झाली.

नागरी वसाहती उद्योग व्यवसायामुळे तेथील लोकसंख्या फार वेगाने वाढू लागली. प्रथम ग्रामीण भागातील लोक मोठ्या शहरी वस्तीकडे उद्योग मिळवण्यास येत. त्यांना विविध सुखसोई व उच्च जीवनमानातील युरोप, उत्तर अमेरीका, आशिया या खंडातील शहरांची व त्यातील लोकांची संख्या वाढू लागली. अनेक शहरे एकलक्षी शहरे झाली. उदा. मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली, कानपूर, बँगलोर, अहमदाबाद, पुणे, बर्मिंगहॅम, पोर्टसाऊथ, लंडन, लिव्हरपूल इ.

**वैशिष्ट्ये :**

१) औद्योगिक क्रांतीनंतरच्या नागरी वसाहतीच्या आकारात वाढ झाली. त्यातूनच विशाल नगरांची निर्मिती झाली.

२) या नागरी वसाहतीत औद्योगिकीकरणाचा विकास घडून आला. अशी शहरे कारखान्याची केंद्रे बनली.

३) कोणत्याही नगराचे विशिष्ट कार्य न राहता व्यापार व वाहतूक, दळणवळण, व्यवस्थापन, प्रशासन अशा तृतीय स्तरावरील उद्योगासाठी नागरी वस्त्या निर्माण होऊ लागल्या.

४) औद्योगिक क्रांतीनंतरच्या नागरी वसाहतीत लोकसंख्या वाढ झपाट्याने झाली.

५) नागरी वस्तीचा विकास होत जाऊन त्याच्या सभोवताली अनेक उपनगरे निर्माण झाली.

६) औद्योगिक क्रांतीनंतरच्या नागरी वसाहती विविध भागात विशिष्ट कार्य प्रामुख्याने करीत. काही विभाग केवळ शासकीय, औद्योगिक व्यापारी निवासी असे असत.

७) नागरी वसाहतीचे मोठ्या प्रमाणात व्यावसायिकरण होऊ लागले.

munotes.in

८) औद्योगिक क्रांतीनंतरच्या नागरी वसाहती कारखानदारीमुळे भिन्न वर्गाचे लोक तसेच वेगवेगळ्या उत्पन्न गटातील लोक एकत्रित राहू लागले. याचा परिणाम म्हणजे पूर्वीच्या समाजव्यवस्थेचे एकूण स्वरुप पूर्णपणे बदलते.

९) नवीन विकसित झालेल्या नागरी वसाहतीत वेगवेगळ्या प्रकारच्या व्यावसायिक, कार्यालयीन, प्रशासकीय इ. इमारतींची संख्या वाढू लागली.

१०) निर्माण झालेल्या नवीन नागरी वसाहती वेगवेगळ्या भागात अनेक प्रकारचे कारखाने निर्माण झाल्यानंतर व्यवसायाचे केंद्रीकरणही शहरात होऊ लागले.

११) कारखानदारी, व्यापार, वाहतुक आणि प्रशासन इ. कार्यामुळे ही बेसुमार वाढ नागरी वसाहतीत अनेक भागात दिसून आली. ही वाढ अनियमित असल्याने शहराचे आकार, आरोग्य व व्यवस्था अनेक ठिकाणी कोलमडून पडली. अनेक ठिकाणी भर वस्तीत कारखाने सुरु झाले. त्यांचे धूर व सांडपाणी यामुळे हवा व पाणी प्रदूषणात वाढ होऊ लागली. त्यामुळे मानवाचे मानसिक व शारीरिक रोग वाढले.

थोडक्यात औद्योगिक क्रांतीनंतर नागरी वसाहतीचे स्वरुप पूर्णपणे बदलते. नगरांची रचना आणि विकासात फार मोठे बदल झाले. निवास नागरी वसाहतीचे रुपांतर औद्योगिक केंद्रात झाले. अती मोठ्या नागरी वसाहतीतून कारखान्याचे केंद्रीकरण घडून आले. त्यातूनच नागरी वसाहतीचे लोकसंख्या प्रचंड वाढत गेलेली आढळते. त्यातूनच नागरी वसाहतीचा विस्तार वाढत गेला व नागरी समस्या निर्माण झाल्या.

**तुमची प्रगती तपासा :**

१) औद्योगिक क्रांतीनंतरच्या वसाहतींची वैशिष्टे स्पष्ट करा.

## ५.८ नागरी वसाहतीच्या समस्या

२० व्या शतकाच्या सुरुवातीलाच जगातील बहुतेक भागात नागरीकरण वेगाने घडून आले. लहान शहरी वस्तीचे मोठ्या शहरी वस्तीमध्ये रुपांतर झाले तर मोठ्या वस्तींना विशाल, महाकाय नागरी वस्तींचे स्वरुप प्राप्त झाले. आज भारतात मुंबई, दिल्ली, कलकत्ता, हैदराबाद यासारखी मोठी शहरे अतिशय वेगाने वाढत आहेत. अशा मोठ्या शहराचे बाह्य स्वरुप हे मोठे आकर्षक वाटते. कारण नागरी वसाहतीचे जीवन हे बहुतांशी गुंतागुंतीचे असते. तेथे वाहनांची गर्दी, अनेक मजली इमारती, करमणुक साधने व इतर अनेक कारणांमुळे नागरी प्रदेश लोकांना आकर्षित वाटत असते. यांचा परिणाम म्हणजे सध्या ग्रामीण वस्तीतून शहरी वस्तीकडे लोकांचा लोंढा सुरु असलेला दिसून येतो. परंतु त्या वस्ती अंतर्गत भागाचा विचार केला असता ही वस्ती अनेक समस्यांनी पोखरुन निघाली आहेत. साहजिकच आज नगरे मानवी जीवनाला घातक ठरत आहे. तीव्र स्पर्धामुळे लोकांमध्ये सतत संघर्ष निर्माण झालेला दिसतो. मुंबईसारख्या मोठ्या विशाल शहरात कमी जागेतून राहणारे लोक तर दुसर्या बाजूला जास्त जागेमध्ये राहणारे कमी लोक अशी परस्परविरोधी सामाजिक रचना तयार होते. सर्वसामान्य लोकांना जगणेही अशक्य होत आहे.

भारतात गेल्या २०-२५ वर्षात नागरीकरणाचा भरमसाठ वेग वाढला आहे. मुंबई, कोलकत्ता, अहमदाबाद, दिल्ली, चेन्नई, कानपूर, हैदराबाद यासारखी मोठी शहरे अतिशय वेगाने वाढत आहेत. त्यामुळे नागरी वस्तीमध्ये अनेक समस्या निर्माण झालेल्या आढळतात.

**नागरी वस्तीच्या समस्या :**

मोठमोठ्या नागरी वस्तीत अनेक समस्या आढळतात. त्यातील काही समस्या

पुढीलप्रमाणे -

१) वस्तींची अस्ताव्यस्त वाढ व उपनगरांची निर्मिती

२) जमिनीच्या भरमसाठ किंमती

३) वाहतुक समस्या

४) रहात्या जागेचा प्रश्न

५) लोकसंख्येची भरमसाठ वाढ

६) शहरी वस्तीत अती गर्दी

७) रहाण्याचे ठिकाण व कामाचे ठिकाण यामधील अंतर

८) पोलीस यंत्रणेवर ताण

९) पाणी पुरवठ्याच्या समस्या

१०) जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्याच्या समस्या

११) प्रदूषण

१२) औद्योगिकरणाच्या समस्या

१३) गलिच्छ वस्त्या किंवा झोपड्या

**१) अस्ताव्यस्त वस्तींची वाढ व उपनगरांची निर्मिती :**

अलिकडच्या काळात नागरीकरण प्रक्रियेचा वेग लक्षात घेता अनेक लहान मोठ्या शहरांची वाढ झालेली दिसते. यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. शहराचा केंद्रभाग जास्तीत जास्त विकसीत करण्यासाठी तेथील भुमी उपयोजनही खर्चिक बनले आहे. शहराच्या वाढीचा परिणाम हा औद्योगिक क्षेत्राला लागून असलेल्या गलिच्छ वस्तीच्या रुपाने झालेला दिसतो. मोठमोठ्या शहरांच्या सभोवताली उपनगराची निर्मिती होत आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर प्रचंड ताण पडत आहे. शहराचा बाह्यभाग अनियमितपणे वाढत आहे. अनियोजित नागरी वस्त्याची वाढ व उपनगराचे स्वरुप फारच गुंतागुंतीचे होत चालले आहे. हे आपल्याला मुंबई-पुणे शहरावरुन ताबडतोब लक्षात येतो.

munotes.in

**२) जमिनीच्या भरमसाठ किंमती :**

शहरी वसाहतीच्या वाढीबरोबर शहरातील जमिनीला मोठ्या प्रमाणात महत्त्व प्राप्त झाल्याने त्यांच्या किंमती वाढत गेल्या आहेत. श्रीमंत वर्गाला जागेच्या किंमती परवडणार्या असतात. परंतु सर्वसामान्य लोकांना त्या परवडणार्या नसतात. त्यामुळे शहरात सर्वसामान्य लोकांना जमीन विकत घेणे शक्य होत नाही. शहरातील बाह्य भागापासून अंतर्गत भागाकडे जमिनीच्या किंमती भरमसाट वाढलेल्या दिसतात. त्यामुळे झोपडपट्ट्यांची गलिच्छ वस्त्यांची वाढ झालेली दिसते.

**३) वाहतूक समस्या :**

शहरी वसाहतीतून वाढणार्या वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक समस्या ही एक बिकट व तेवढीच गुंतागुंतीची बनेलली आहे. वाहनाच्या प्रचंड गर्दीमुळे अनेकवेळा वाहतुकीत अडथळे निर्माण होतात. प्रत्येक शहरी वसाहतीत दरवर्षी वाहनांच्या संख्येत भर पडत असते. परंतु त्यामानाने रस्त्यांचे स्वरुप कायम असते. रस्त्यांच्या रुंदी करणासाठी जागा उपलब्ध नसल्याने वाजवीपेक्षा जास्त ताण अरुंद रस्त्यावर पडतो. ही समस्या सोडविण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या जातात. शहरातील एकेरी स्वरुपाची वाहतुक काही शहरातून आढळत असली तरी अशी व्यवस्था प्रत्येक शहरात असतेच असे नाही. बहुतेक जुन्या वस्तीतील अरुंद गल्या वाहतूक दृष्टीने अडचणीच्या ठरतात. यामुळे वाहतूक विस्कळीत होते.

**४) रहात्या जागेचा प्रश्न :**

सध्याची नागरी वसाहतीची वाढ लक्षात घेता तसेच ग्रामीण वसाहतीकडून शहरी वस्तीकडे होणारे लोकांचे स्थलांतर पाहता शहरांमध्ये राहत्या घरांचा प्रश्न / कमतरता आढळते. शहरात काम मिळणे शक्य आहे. पण राहण्यासाठी घर मिळविणे अतिशय कठीण आहे. लोकसंख्या वाढीच्या होणार्या तुलनेत शहराचे क्षेत्र मात्र तेवढ्या प्रमाणात वाढू शकत नाही. मोठ्या शहरामध्ये प्रत्येकांला राहते घर उपलब्ध होऊ शकत नाही. कमी उत्पन्न असणारे सामान्य लोक मिळेल त्याठिकाणी झोपडीवजा घरांची बांधणी करतात. यातूनच मोठमोठ्या झोपडपट्यांची निर्मिती होते. यातून मानवी जीवनावर कळत नकळत परिणाम होतो.

**५) लोकसंख्येची भरमसाठ वाढ :**

सध्या शहरी वस्तीतून मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या लोकसंख्येमुळे शहरे म्हणजे लोकवस्तीचे आगरच बनत आहे. शहराच्या एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत लोकसंख्या खूपच जास्त असल्याने तेथे दाट लोकवस्तीच्या समस्या उद्भवलेल्या आहेत. प्रत्येकाच्या वाट्याला येणारे जमिनीचे प्रमाण खूपच कमी होत आहे. तसेच नगरांची लोकसंख्या सतत वाढत असल्याने जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करण्यात ताण पडत आहे.

**६) शहरातील अती गर्दी :**

बहुतेक मोठ्या शहरी वस्तीतून अनेक ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात लोकांचे केंद्रीकरण होते. अशा अतिगर्दीमुळे वेगवेगळ्या प्रकारच्या सुखसोई पुरविणे कठीण होऊन बसते.

सध्याच्या यंत्रयुगात मानवाला जगण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. अतिगर्दीमुळे वाहतुक यंत्रणेवर ताण पडतो. रेल्वेस्टेशन, बस स्थानक इ. ठिकाणी प्रचंड गर्दीमुळे आपले व्यवहार पार पाडणे शक्य होत नाही. अतीगर्दीमुळे अपघात, चोरी / इतर गलिच्छ व्यवसायाला चालना मिळते.

**७) रहाण्याचे ठिकाण व कामाचे ठिकाण यामधील अंतर :**

मोठमोठ्या शहरी वस्तीमध्ये राहण्याचे ठिकाण व कामाचे ठिकाण यामधील अंतर खूपच दूर असल्याने त्याचा परिणाम कामकरी लोकांवर होता. बराचसा वेळ त्यांना कामावर जाण्यासाठी / कामावरुन घरी येण्यासाठी खर्च होतो. आपोआपच जीवन धावपळीचे बनते. कित्येकदा वाहतूक साधने न मिळाल्यास कामावर वेळेवर जाता येत नाही. मुंबईमध्ये बहुतेक कामगार बाह्य क्षेत्रात राहतात. त्यामुळे कामावर जाण्या येण्यासाठी त्यांना दररोज ४-५ तास फुकट खर्च करावे लागतात.

**८) पोलीस यंत्रणेवर ताण :**

शहरी वस्तीच्या फार मोठ्या आकारामुळे परस्परांमधील संबंध फारसा आढळत नाही. अशा प्रचंड लोकसंख्येच्या वस्तीतून अनेक प्रकारच्या गुन्हेगारीचे अस्तित्व तयार होते. एकंदर झोपडपट्यांसारख्या वस्त्यांमधून असंख्य प्रकारचे व्यवसाय व त्या जोडीस गुन्हेगारी प्रवृत्ती तयार होते. सध्याच्या वाढत्या परिस्थितीतून चोरी, लुटमार, दरोडे यासारखे प्रकार घडतात. अशा परिस्थितीत मोठ्या शहरातून सुरक्षितता व्यवस्था कायम ठेवणे आवश्यक असते. हे काम पार पाडणार्या पोलिस यंत्रणेला अनेक प्रकारच्या समस्या हाताळाव्या लागतात. परंतु लोकसंख्येच्या मानाने पोलिस यंत्रणा कमी पडते. सध्याच्या नागरी जीवनात अनेक पातळीवर पोलिस यंत्रणेलाच तोंड द्यावे लागते. भारतासारख्या जातीय दंगली उद्भवणार्या देशात पोलिस यंत्रणेवर ताण पडतो. थोडक्यात आजही शहरे पोलिस यंत्रणेच्या दृष्टीने त्रासदायक ठरली आहे.

**९) पाणी पुरवठ्याच्या समस्या :**

शहरी वस्तीमधील वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठ्याची सोय ही सध्या गंभीर समस्या बनली आहे. जोपर्यंत शहराचे स्वरुप मर्यादित असते तोपर्यंत पाणीपुरवठा करण्यास फारशी अडचण येत नाही. परंतु शहरातील लोकसंख्या व उद्योग व्यवसाय वाढू लागल्यावर त्यांना आवश्यक पाणीपुरवठ्यात अडचणी निर्माण होतात. प्रत्येक नागरीकाला पाणीपुरवठा करणे आवश्यक असते. परंतु भारतातील अनेक शहरी वसाहतीत पाणीपुरवठ्याची अनियमित सोय आहे. सार्वजनिक नळाच्या ठिकाणी कटकटी निर्माण होऊन स्फोटक स्थिती निर्माण होते. हळूहळू पाण्याची कपात वाढवली जाते. शहरातील लोकांना शुद्ध पाणीपुरवठा करणे हा जरी मुलभूत प्रश्न असला तरी व आज अनेक योजना आखल्या तरी त्या अपुर्या पडतात. बरेच लोक अशुद्ध पाणी पिल्याने त्यांचे जीवन धोक्यात येते हे टाळण्यासाठी शासनामार्फत अनेक योजना आखण्यात येतात. परंतु योग्य अंमलबजावणी न झाल्याने ती समस्या भारतातील मोठमोठ्या शहरी वसाहतीत बिकट होत चालली आहे.

munotes.in

**१०) जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्याच्या समस्या :**

शहरी वसाहतीतील लोकांचे जीवन हे वेळोवेळी खरेदी केल्या जाणार्या आवश्यक गोष्टींवर अवलंबून असते. मोठ्या शहरातून प्रचंड लोकसंख्येला या वस्तू मिळण्यात अनेक अडचणी येतात. वाहतुक अडचणी, त्यात येणारे व्यत्यय आणि इतर अकार्यक्षम संघटनेमुळे वाजवी किंमतीत वस्तू उपलब्ध होत नाहीत. त्यातून साठेबाजी, काळाबाजार यासारखे प्रकार उद्भवतात आणि सामान्य लोकांना याची झळ पोचते. नाशवंत वस्तूची जलद वाहतूक सोय नसल्यामुळे शहरी वस्तीतील बहुतांशी लोकांना त्या वस्तू मिळत नाहीत. त्याचप्रमाणे वेगवेगळ्याया वस्तूंमध्ये केली जाणारी भेसळ नागरी जीवनात त्रासदायक ठरते. फार मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करुन आरोग्य विषयक चांगल्या वस्तू खरेदी कराव्या लागतात. त्यामुळे अपुर्या सुखसोई व भेसळयुक्त माल यांचा परिणाम शहरातील बहुसंख्य लोकांच्या आरोग्यावर होतो.

**११) प्रदूषण :**

सध्याच्या औद्योगिक काळात जगातील बहुसंख्य शहरी वस्तींना या समस्येने झपाटले आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे विविध प्रकारचे प्रदूषण, हवा, पाणी, ध्वनी प्रदूषण, मोठमोठ्या शहरातून उग्र स्वरुप धारण करत आहे. कारखान्यातून सोडलेला धूर वाहनातील धूर यामुळे हवा प्रदूषित होत आहे. कारखान्यातील घाण पाणी, सांडपाणी, रसायनयुक्त पाणी यामुळे जलप्रदूषण झाले आहे. तर रेल्वेचा खडखडाट, कारखान्यातील कर्कश भोंगे, वाहनांचे आवाज यामुळे ध्वनी प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे खोकला, फुपोंफसाचे रोग, डोळ्यांचे रोग, पोटाचे विकास, बहिरेपणा यासारखे आजार शहरी प्रदेशात सतत आढळत आहेत. मुंबईतील चेंबूर भागात अनेक कारखाने केंद्रीत झाले आहेत. दररोज मोठ्या प्रमाणात कार्बन हवेमध्ये सोडला जातो. पुणे, मुंबई, कोलकत्ता, चेन्नई यासारखी शहरे प्रदूषणाने ग्रासली आहेत.

**१२) औद्योगिकरणाच्या समस्या :**

सध्याच्या औद्योगिक युगात शहरी वस्त्या ह्या प्रामुख्याने वेगवेगळ्या कारखान्यांची अनेक व केंद्रे बनली आहेत. अनेक कारखान्यांचे केंद्रीकरण शहरात झाले आहे. उद्योगधंद्यात वाढ झाल्याने कामगारांच्या संख्येतही वाढ होते. लोकसंख्या वाढल्याने राहत्या घरांची समस्या बिकट होत आहे. अनेक कारखान्यात कच्च्या मालाचा पुरवठा करणे कठीण होते. वाहतुक व इंधन अडचणीमुळे काही कारखाने आर्थिक दृष्टीने फायदेशीर होत नाही. परिणामी बरेचसे उद्योग बंद पडतात. अथवा स्थलांतरीत होतात. मुंबईसारख्या शहरी वसाहतीत आज अनेक कारखाने आजारी पडले आहेत.

**१३) गलिच्छ वस्त्या किंवा झोपड्या :**

मोठमोठ्या शहरी वसाहतीतील वस्त्यांचा उल्लेख हा नागरी जीवनाला मिळालेला शाप याच स्वरुपात केला जातो. सध्या विकसित व अविकसित राष्ट्रात झोपडपट्यांची समस्या निर्माण झालेली दिसते. भारतातील कलकत्ता, मुंबई, पुणे यासारख्या शहरांमधून झोपडपट्या निर्माण झालेल्या दिसतात. गलिच्छ वस्त्यांमुळे अनेक समस्या निर्माण होतात. परिणामी शहर विकासाला पायबंद बसतो. त्यामुळे एका बाजूला गलिच्छ वस्त्या व दुसर्या



munotes.in

बाजूला गगनचुंबी इमारती अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते. प्रसिद्ध विचारवंत हंटर यांनी असे म्हटले आहे की, गलिच्छ वस्त्या म्हणजे नागरी जीवनाला झालेला व कॅन्सर आहे. फोर्ड यांच्या मते ज्या परिसरातील घरे राहण्यास निकृष्ट, अपुरी, आरोग्यास घातक, संरक्षण, नैतिकता आणि निवासी लोकांच्या दृष्टीने हानीकारक असतात. त्या परिसरास झोपडपट्टी म्हणतात. सर्वसामान्यपणे असे म्हणता येईल की अविकसीत दुर्लक्षित दाट लोकसंख्या असलेल्या मोडकस आलेल्या दुर्लक्षित वस्तीला झोपडपट्टी / गलिच्छ वस्ती असे म्हटले जाते. अशा प्रकारच्या झोपडपट्ट्या अचानक विषमतेच्या प्रतिक ठरतात. झोपडपट्ट्यांमध्ये राहणारे लोक दरिद्री अवस्थेत जगत असतात.

झोपडपट्ट्यांची निर्मिती अनेक कारणांमुळे होते. शहरात उद्योगाचा विकास झाल्याने ग्रामीण लोक रोजगारासाठी शहरात येतात. जागेचा अभाव व जमिनीच्या भरमसाठ किंमती यामुळे हे लोक झोपडपट्यांतून रहातात. झोपडपट्ट्यांत प्राथमिक सोईचा अभाव असतो. अपुरा पाणीपुरवठा, संडासाच्या अपुर्या सोई, सांडपाण्याच्या गैरसोई यामुळे अस्वच्छता निर्माण होते. झोपडपट्यात गुन्हेगारी प्रवृत्ती बळावते. गुंड लोकांचे साम्रज्य असते. अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. या ठिकाणी संस्कारमय जीवन आढळत नाही. याचा परिणाम लहान मुलांवरही होतो. दुर्गंधीचे माहेरघर म्हणून शहरातील झोपडपट्ट्या ओळखल्या जातात. गलिच्छ वस्त्यांतून सामाजिक, आर्थिक, मानसिक, आरोग्यविषयक समस्या उभ्या रहातात.

मुंबईमधील झोपडपट्ट्या आशिया खंडात प्रसिद्ध आहेत. मुंबई शहरात अनेक कारखान्यांचे केंद्रीकरण झालेले आहे. त्यामुळे ग्रामीण वस्तीतील अनेक लोक या शहराकडे स्थलांतरीत होत असून त्यांना शहरात जागा उपलब्ध न झाल्याने लोहमार्गाच्या सभोवताली अत्यंत लहान जागेतून साध्या घरातून हे लोक राहतात. त्यामुळे अनेक झोपडपट्ट्यांची निर्मिती झाली आहे. मुंबईबरोबर कानपूर, दिल्ली, पुणे, कलकत्ता या शहरातून झोपडपट्ट्यांची वाढ दिवसेंदिवस होत आहे.

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरी वस्तीच्या समस्या स्पष्ट करा.

## ५.९ नागरी वस्ती नियोजन / नागरी वस्ती समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना :

मानवी जीवन अधिक गुंतागुंतीचे होत चालले आहे. त्याचबरोबर शहरी वस्तीतील जीवनातील विविध समस्या उत्तरोत्तर वाढत चालल्यामुळे शहर वस्तीच्या नियोजनाचा प्रश्न जागतिक स्वरुपाचा झाला आहे. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे व त्या त्या राष्ट्राच्या शासनातर्फे शहर नियोजनाचे प्रश्न चालू असतात. शहर नियोजन व समाजशास्त्रज्ञ व्यवहारी दृष्टीकोणातून शहरी नियोजन करण्यात सतत प्रयत्नशील असतात. प्रत्येक राष्ट्राची सांस्कृतिक पार्श्वभूमी व आर्थिक दर्जा भिन्न आढळतात. युरोपियन व अमेरिकन राष्ट्रे तसेच ऑस्ट्रेलिया व जपान या श्रीमंत राष्ट्राच्या समस्या वेगळया आहेत. त्यामुळे शहरी लोकसंख्या वाढत असली तरी तिचा आर्थिक दर्जा खालाऊ न देता नगर विकास कसा करावा ही तेथील मुख्य समस्या आहे. भारतात मात्र मोठ्या शहराची होणारी अनिर्बंध वाढ,

नागरी सेवा सोईचा तुटवडा व प्रचंड लोकसंख्या यावरील नियंत्रणाचा खरा प्रश्न आहे. भारतातील मोठी शहरे अधिकच मोठी होत चालली असून या मोठ्या शहरातच अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. भविष्यकाळात नगरातील लोकसंख्या बरीच वाढत जाणार आहे. म्हणूनच खर्या अर्थाने सध्या नगर नियोजनाची आवश्यकता आहे. नगर नियोजनामुळे विविध समस्यांवर मात करुन भविष्यातील होणारा धोका कमी करता येईल नागरी समस्या सोडविण्यासाठी पुढील उपाययोजना करता येतात.

१) लोकसंख्येचे नियोजन

२) राहत्या घरांच्या सोई

३) उघड्या जमिनीवर वनस्पतीचे आच्छादन

४) जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा

५) ग्रामीण भागात रोजगाराच्या सुविधा

६) झोपडपट्ट्यांची सुधारणा

७) शैक्षणिक सामाजिक सुखसोईत वाढ

८) प्रादेशिक नियोजन

९) प्रदूषणावर नियंत्रण

१०) नवीन शहरांचे नियोजन

**१) लोकसंख्येचे नियोजन :**

नागरी वस्तीची लोकसंख्या दिवसेंदिवस जास्तच वाढत आहे. ग्रामीण प्रदेशाकडून शहरी प्रदेशाकडे लोकांचा सतत लोंढा चालू असल्याने नागरी लोकसंख्येत जास्त भर पडत आहे. त्यामुळे बेसुमार गर्दी, आरोग्य, शिक्षण, गुन्हेगारी यासारख्या समस्या वाढत आहेत. ग्रामीण प्रदेशाकडून शहरी प्रदेशाकडे येणारा लोंढा थोपविल्यास भारतात सध्याच्या वेगाने शहराची वाढ होऊ शकणार नाही. यामुळे अनेक समस्यांवर मात करता येईल.

**२) राहत्या घरांच्या सोई :**

घराची टंचाई ही नागरी वस्तीतील मुख्य समस्या होय. यादृष्टीने शासकीय व निमशासकीय पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. कमी खर्चामध्ये घरे बांधण्याच्या योजना हाती घेणे आवश्यक आहे. शासन, नगरपालिका, सामाजिक संस्था यांनी पुढाकार घेऊन राहत्या जागेचा प्रश्न सोडविणे जरुरीचे आहे.

munotes.in

**३) उघड्या जमिनीवर वनस्पतीचे आच्छादन :**

शहराभोवतीच्या टेकड्या त्याचे उतार व शहरातील मोकळ्या जागा या वनश्रीने आच्छादणे आवश्यक आहे. बहुतेक शहरामध्ये प्रदूषण समस्या उग्र स्वरुप धारण करीत आहे. वनस्पतींमुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल व शुद्ध हवेत ही भर पडेल.

**४) जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा :**

शहरी लोकांना योग्य दरात जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा होणे अतिशय गरजेचे आहे. शासनामार्फत सरकारमान्य दुकाने उभारली जातात. परंतु याद्वारे बर्याचदा पुरवठा होत नाही त्यामुळे जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणारी नियंत्रण व्यवस्था चोख असणे आवश्यक आहे.

**५) ग्रामीण भागात रोजगाराच्या सुविधा :**

ग्रामीण वस्तीत कुटीरोद्योग, लघुद्योग यांचा विकास केल्यास शहराकडे येणार्या लोकांचा लोंढा कमी होईल. त्यामुळे शहराची वाढ ही झपाट्याने वाढणार नाही व ग्रामीण प्रदेशाचा विकास साधता येईल.

**६) झोपडपट्ट्यांची सुधारणा :**

झोपडपट्ट्या ही शहराला लागणारी कीड आहे. गलिच्छ वस्त्यांमधील रोगावर प्रतिबंध उपाययोजना करणे, तेथे विविध प्रकारच्या सोई निर्माण करणे गरजेचे आहे. झोपडपट्ट्यांचे निर्मुलन करुन तेथील लोकसंख्या सामाजिक जीवनात सलोखा निर्माण केला पाहिजे. युवक, बालविकास, महिला विकास, मंडळाची स्थापना करणे, आर्थिकदृष्ट्या गरजू लोकांना मदत करण्याच्या संस्था काढणे हे यावरील उत्तम उपाय आहेत.

**७) शैक्षणिक सामाजिक सुखसोईत वाढ :**

नागरी वस्तीत लोकसंख्येच्या मानाने सुखसोइर्ची खुपच कमतरता आढळते. शैक्षणिक सोई, विद्युतपुरवठा, सार्वजनिक संडास, रस्त्यांचे जाळे, कुटुंब कल्याण संस्था, पाणीपुरवठ्याच्या सोईत वाढ करणे, अत्यावश्यक आहे. नागरी वस्तीतील कित्येक अरुंद रस्त्यामुळे कित्येकदा वाहतुकीस अडथळे निर्माण होतात.

**८) प्रादेशिक नियोजन :**

शहरी वस्तीच्या उपनगरे व नवीन शहरीवस्त्या वसविण्याच्या दृष्टीकोनातून प्रादेशिक नियोजन करणे अत्यावश्यक आहे. तसेच नागरी नियोजन हे नगरापुरतेच मर्यादित न ठेवता त्या नगराच्या पूर्ण पार्श्वभूमीचा यात समावेश केला पाहिजे.

**९) प्रदूषणावर नियंत्रण :**

प्रदुषण ही समस्या नागरी वस्तीत उग्र स्वरुप धारण करीत आहे. त्यामुळे त्याच्यावर नियंत्रण केले पाहिजे. मोठमोठे कारखाने शहरी प्रदूषणातून सभोवतालच्या शहराच्या प्रदेशात हालविले पाहिजे. आठवड्यातून एक दिवस वाहतुक साधने बंद ठेवावीत.

munotes.in

कारखान्यातील सांडपाणी नद्यात / समुद्रात सोडण्यापूर्वी त्यातील रासायनिक घटक नाहीसे केले पाहिजेत. कारखान्यातील भोंगे, धुम्रपान यासारख्या गोष्टींवर कायद्याने बंदी करुन कडक शासन करायला पाहिजे. त्यामुळे ही समस्या थोड्या फार प्रमाणात कमी करण्यास मदत होऊ शकेल.

**१०) नवीन शहरांचे नियोजन :**

नवीन शहरी वस्त्या वसविण्यापूर्वी ते नियोजनपूर्वक वसविणे आवश्यक आहे. भारतातील भिलाई-दुर्गापूर यासारखी पोलादी शहरे आणि मुंबई वरील ताण कमी करण्यासाठी उभारली जात असलेली नवी मुंबई या शहराकडे नियोजनाच्या दृष्टीकोनातून लक्ष दिले पाहिजे. अविकसित प्रदेशात नवीन शहराची निर्मिती व वाढ केल्यास त्या प्रदेशाचा विकास होऊ शकेल.

थोडक्यात बहुतेक शहरी वस्त्या अनेक समस्यांनी ग्रासलेल्या आहेत. योग्य नागरी नियोजन केल्यास नागरी समस्या कमी करण्यास मदत होऊ शकेल.

**तुमची प्रगती तपासा :**

१) नागरी वस्त्याचे नियोजन' स्पष्ट करा.

## ५.१० शहरांचा शाश्वत विकास

जगातील अनेक देशात शहरांचा शाश्वत विकास हा प्रादेशिक विकास योजनेचा महत्त्वाचा घटक मानला जातो. शाश्वत शहर अगदी अलिकडची नवी संकल्पना आहे. गेल्या दशकापासून या संकल्पनेवर आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहेत.

नागरी वसाहती / शहरे ही प्रगतीची संधी देणारी, कर्तुत्वाला संधी देणारी, काहीतरी करुन दाखविण्याची जिद्द असलेल्या सामान्यांच्या पखांना बळ देणारी ठिकाणे आहेत. म्हणूनच मुंबई, कलकत्ता, चेन्नई, दिल्ली यासारखी महानगरे सर्वसामान्यांच्या आकर्षणाची केंद्र ठरतात. पण वाढत्या गरजांमुळे मध्यम शहरेही आता मोठ्या शहरांसारखीच भासू लागलेली आहेत. शहरात मध्यवर्ती भागात राहणं परवडत नाही. म्हणून लांब रहायला जाणं आणि वाहन ही गरज बनणं ही मध्यम वर्गीयांची जीवनशैली बनलेली आहे. शहरांच्या मूलभूत सेवा-सुविधा पुरविण्याच्या क्षमतेवर ताण पडत आहे. पाणीपुरवठा, वाहतूक, विजपुरवठा औद्योगिक उत्पादनावर होणारा परिणाम आणि एकूणच पर्यावरणावर परिणाम होत आहे.

जगभरातल्या शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढत आहे. शहरातील सर्वसामान्य माणसांच्या अनेक अपेक्षा असतात. या अपेक्षा त्यांना येणार्या समस्यातून आलेले एकप्रकारचे अनुभवाचे बोल असतात. या सर्वसामान्य माणसांच्या आशाअपेक्षांचा सारासार विचार करुन शहरांचे नियोजन केल्यास ते शाश्वत विकासास पूरक ठरेल यात शंका नाही. याच अनुरोधाने विविध शहरी समस्यांच्या सोडवणूकीसाठी उपाययोजना करुन शहरांचा शाश्वत व चिरंतन विकास साधणे शक्य आहे. शहरातील वाढत्या समस्या सोडविण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या पाहिजेत.

वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी रस्त्यांचे रुंदीकरण केले जावे. केवळ रुंदीकरणातून वाहतूकीची समस्या सुटते असे नाही तर यातून निवासस्थाने व इतर इमारतीचा वेगळाच प्रश्न / समस्या तिथे उभा राहू शकतो. याला पर्याय म्हणून वाहतूकीसाठी उड्डाण मार्गांचा अवलंब केला जावा. विकसीत उड्डाण मार्गांमुळे वाहतूकीची कोंडी कमी होवू शकते तसेच गर्दीचा प्रश्नही कमी होवू शकतो. उड्डाण मार्गाबरोबरच स्कायबस, स्काय वॉक, रोप वे याशिवाय मेट्रो इ. पर्याय वापरले जावेत. वाहतूक साधनांची गर्दी कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहनांचा वापर करावा. तसेच एकाच मार्गावरुन जाणार्या येणार्यांनी सामुदायिक वाहनाचा वापर करावा त्यामुळे वाहतुकीची कोंडी कमी होईलच शिवाय वाहनातून होणारे प्रदूषणही रोखता येईल. यावर अधिक परिणामकारक उपाय म्हणजे आठवड्यातून एक दिवस नो व्हेयीकल डे म्हणजेच वाहन बंद दिवस पाळावा.

शहरातील गर्दी ही प्रामुख्याने कार्यालयांच्या कामकाजाच्या ठराविक वेळेमुळेच उग्र रुप धारण करताना आढळते. कार्यालये सुरु होताना व बंद होताना सर्वच मार्गावर प्रचंड गर्दी होते. त्यातून अनेक समस्या निर्माण होतात. यावर शाश्वत उपाय म्हणून कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेमध्ये ठराविक अंतराने बदल करुन त्या त्या प्रमाणे वेगवेगळ्या वेळात कार्यालयीन कामकाज सुरु ठेवल्यास शहराच्या शाश्वत विकासास तो एक अनोखा हातभार लागेल. शहरातील मोक्याच्या ठिकाणच्या बाजारपेठेतील सेवा सुविधा २४ तास चालू ठेवाव्यात ज्यामुळे काही ठराविक वेळेतच खरेदीसाठी होणारी गर्दी नियंत्रणात येईल. यावर अलिकडे विकसित होत असलेले ऑनलाईन शॉपिंग हा देखील एक उत्तम उपाय होवू शकतो.

शहरामध्ये राहत्या जागेचा प्रश्न नेहमीच सतावत असतो. त्यातूनच होणारी झोपडपट्ट्यांची वाढ ही तर शहरांची गंभीर समस्या आहे. यासाठी झोपडपट्ट्यांचे नियोजन योग्य तर्हेने करुन तितक्याच काटेकोरपणे त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. शक्य असल्यास घरकुल योजनांसारख्या योजना राबवून अशा लोकांना निवासस्थाने उपलब्ध करुन दिली पाहिजेत. मात्र नव्याने शहराकडे येणारे स्थलांतरीतांचे लोंढे थांबविले पाहिजेत.

झोपडपट्ट्यांबरोबरच इतर इमारतींमधुनही निर्माण होणार्या सांडपाण्याचा निचरा सुनियोजित पद्धतीने केला पाहिजे. यासाठी भुयारी गटारी मार्ग हा योग्य पर्याय आहे. तसेच या पाण्यावर शुद्धीकरण प्रकल्प उभारुन त्याही पाण्याचा वापर दुय्यम गोष्टीस करता येईल. किमान मार्गाच्या कडेला, इमारतींच्या आसपास लावलेल्या झाडांना या पाण्याचा पुरवठा करता येईल. यामुळे पाणी प्रदूषणाची समस्या देखील कमी होईल.

वाढत्या शहरांना घरगुती पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. यासाठी प्रत्येक इमारतीवर पडणार्या पावसाचे पाणी साचवून त्याचाही वापर करता येईल. शहरामध्ये निर्माण होणारा दररोजचा कचरा व त्याचे नियोजन हा शहराच्या शाश्वत विकासातील महत्त्वाचा घटक आहे. यातून ओला व सुका कचरा विलग करुन त्यापासून खत निर्मिती, किंवा दुय्यम घटकांची नि|मती करणे शक्य आहे. शहरांची अस्वच्छता आणि त्यातून शहराच्या सौंदर्याला निर्माण होणारी बाधा हा शहराच्या विकासातील तितकाच महत्त्वाचा घटक आहे. यासाठी शहरातील नागरीकांना कडक नियम व कायदे करुन प्रसंगी कठोर होवून त्याची अमंलबजावणी केली पाहिजे. अन्यथा एका बाजूने शहरांचा आधुनिकतेकडे झेपावणारा

विकास करायचा आणि दुसर्या बाजूने शहरातील गलिच्छपणा, असंस्कृतपणा यामुळे विकासात बाधा निर्माण होवू शकते. याबाबतीत सिंगापूर सारख्या छोट्याशा पण जगातील अतिविकसित शहराचा आदर्श घेण्यासारखा आहे. स्वच्छता, वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन, कोपर्या कोपर्यावरील सी सी टिव्ही च्या माध्यमातून होत असलेली टेहाळणी आधुनिक अशा शाश्वत विकासासाठी पूरक अशीच आहे.

मुंबई, दिल्ली, कोलकत्ता, चेन्नई ही शहरे ब्रिटीश व मुगल राजवटीत भारतीय बांधकाम शैलीत विकसीत केलेली आहेत. स्वातंत्र्यपूर्वकाळात अतिशय सुंदर दिसणार्या या शहरांनी आज अतिशय ओंगळ, बेढब स्वरुप धारण केले आहे. महानगरातील अनेक नागरिक अतिशय त्रासदायक जीवन जगत आहेत. शहरांचा शाश्वत विकास करताना उगीचच भरमसाठ माहिती-तंत्रज्ञानाच्या जंजाळात माणसामाणसांना अडकवून त्यांचे जीवन आणखी यांत्रिक करणे योग्य नाही. शाश्वत विकासात मानवी संवेदनेला सुद्धा स्थान द्यायला हवे. योजनाबद्ध आराखड्याद्वारे शहरांची निर्मिती केली पाहिजे. आणि हे करीत असताना नैसर्गिक साधनसंपत्तीचा कमीतकमी विनाश होईल याकडे विशेष लक्ष दिला पाहिजे. शहरांच्या जडणघडणीत शाश्वत विकासात भारतीय मूल्यांना वरचे स्थान असायला हवे. नागरीकांचे प्रश्न, त्यांच्या मनाचा कल व गरजा समजून भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील शहराचा शाश्वत विकास केला पाहिजे.

**तुमची प्रगती तपासा :**

१) शहरांचा शाश्वत विकास कसा होईल ते सांगा.

❖❖❖❖

munotes.in